## गोमंतकाचा भूगोल–भाग २ रा

किंवा

# गोमंतकाची राज्यव्यवस्था

म. ग्रं. सं. ठाणें.
विषय भू. प्रवास
सं. नं.

[redacted]क

[redacted]कटेश पै

म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
सं. क्र. १०८

मत १२ आणे.

[redacted] छापखाना, मडगांव

REFBK-0004045

[redacted]tor—Esvonta Camotim advogado com cursos
complementares de letras e de sciências
do Liceu Central de Nova-Goa.

गोमंतकाचा भूगोल—भाग २ रा

किंवा

# गोमंतकाची राज्यव्यवस्था

लेखक


दत्तात्रय व्यंकटेश पै

संपादक 'हिंदु'



मडगांव-शके १८५१.



REFBK-0004045

REFBK-0004045



'हिंदु' छापखाना-मडगांव.

# प्रस्तावना

पोर्तुगीज हिंदुस्थानच्या राज्ययंत्राची म्हणजे सरकारसंस्थेची समग्र व संकलित माहिती करून द्यावी ह्या मुख्य हेतूनें प्रस्तुत पुस्तक लिहिण्यांत आलें आहे. तथापि त्यांत सरकारयंत्राच्या भागांची तेवढी माहिती न देतां त्या भागांच्या अधिकारकक्षेंत देशाच्या व प्रजेच्या ज्या ज्या अंगांचा अंतर्भाव होतो त्या त्या अंगांचीही संक्षिप्त पण अत्यावश्यक अशी सर्व माहिती देण्यांत आलीआहे.उदाहरणार्थ,'मुलकी व्यवस्था खाते' ह्या सरकार-यंत्राच्या एका भागाची माहिती देतांना त्याच्या अधिकारकक्षेंत येणाऱ्या खानेसुमारी, सरकारी व बिनसरकारी शिक्षणसंस्था, ग्रामसंस्था, धर्मपीठें इत्यादींसम्बन्धींची माहिती सांगण्यांत आली आहे. परन्तु पोर्तुगीज हिंदुस्थानच्या राज्ययंत्राची माहिती परिपूर्ण करावयाची झाली तर तें यंत्र तयार करणाऱ्या पोर्तुगालच्या राज्यकारखान्याची माहितीही द्यावी लागेल. आणि ती नर पुस्तकांत अगदीं अपरिहार्य तेथेंच देण्यांत आली आहे. ह्यामुळें 'गोमंतकाचा भूगोल' ह्या नांवांत समाविष्ट होऊं शकेल त्यापेक्षां अधिक आणि 'पोर्तुगीज शासनसंस्था' ह्या नांवांत अंतर्भूत होऊं शकेल त्यापेक्षां कमी माहिती पुस्तकांत आली आहे असें म्हणावें लागतें. त्याचप्रमाणें पुस्तकाची पृष्ठसंख्या व विषयाचें गांभीर्य हीं लक्षांत घेतल्यास तें मराठी शाळांतील विद्यार्थ्यांच्या आकलनशक्तीस जरा भारी आणि प्रौढ माणसांच्या प्रज्ञतेस जरा हलकें असें झालें आहे.

तथापि हे दोष अज्ञानत: झालेले नाहींत. केवळ विद्यार्थ्यांकरतां आणि केवळ प्रौढ माणसांकरतां अशा स्वरूपांचीं पुस्तकें लिहिलीं तर त्यांच्या छपाईचा खर्चही भागेल कीं नाहीं ह्याचीच शंका उत्पन्न व्हावी अशी आमच्या ह्या प्रांताची आजची स्थिति आहे. आणि ह्या शंकेला भिऊनच वर सांगितलेल्या मध्यम मार्गी धर्तीवर म्हणजे, विद्यार्थ्यांस शाळांतून शिकवण्यासही उपयोगी पडावें आणि मोठ्या माणसांस नित्यव्यव-हाराला लागेल ती सरकारविषयक माहिती मिळवण्यासही उपयुक्त व्हावें

अशा पद्धतीवर प्रस्तुत पुस्तकाची रचना केली आहे. आणि म्हणूनच भाषा अगदीं बालबोध वापरली आहे.

मराठी चौथी व पांचवी या दोन इयत्तांत मिळून पुस्तक पुरें शिकवतां येईल व तेंही विद्यार्थ्यांच्या बुद्धीवर बिलकूल ताण न पाडतां शिकवतां येईल अशी माझी व ज्या कित्येक हुशार शिक्षकांनीं पुस्तक छापण्यापूर्वी वाचून पाहिलें त्यांचीही समजूत आहे. मात्र पहिल्याच खेपेस पुस्तकांतील सर्व विषय विद्यार्थ्यांस झेंपतील असें नाहीं. कारण, एक तर उजळणीशिवाय कोणताच विषय अल्पवयी विद्यार्थ्यांच्या लक्षांत रहात नसतो. शिवाय प्रस्तुत पुस्तकांतील विषयच असे आहेत कीं एकाची माहिती दुसऱ्याच्या माहितीशिवाय पुरी होऊं शकणार नाहीं. ह्यामुळें विद्यार्थ्यांकडून प्रत्येक धड्याची माहिती पूर्ण करून घेण्याची गोष्ट तेव्हांच शक्य होईल कीं जेव्हां पुस्तकांतील तत्संबद्ध इतर धड्याची माहिती त्यांना देऊन ठेवलेली असेल. असो. या बाबतींत विशेष असें आपण होऊन न मांगतां, वाचकांनीं अनुभवानें काय तें ठरवावें इतकेंच मी म्हणतों.

पुस्तक लिहितांना व छापतांना वृत्तपत्रव्यवसायांतील माझे सहकारी श्री. दामोदर अच्युत कारे ह्यांची आणि तत्संबंधींची सामग्री जुळवितांना माझे सुविद्य स्नेही श्री. विठ्ठल सदाशिव सुखठणकर ह्यांची मला बहुमोल मदत झाली, ह्याचा येथें कृतज्ञतापूर्वक उल्लेख केल्याशिवाय माझ्यानें रहवत नाहीं.

शेवटीं, दोनतीन वर्षें रखडत रखडत चाललेलें पुस्तकप्रकाशनाचें हें काम आज तडीस जात असल्याबद्दल परमेश्वराला धन्यवाद देऊन रजा घेतों.

**मडगांव**, ता. १ फेब्रुवारी १९३०.

**दत्तात्रय व्यंकटेश पै.**

# अनुक्रमणिका


| धडा | विषय | पृष्ठ. |
|---|---|---|
| १. | थोडा आवश्यक इतिहास (पूर्वार्ध) | १ |
| २. | ,, ,, ,, (उत्तरार्ध) | २ |
| ३. | हिंदुस्थानांतील इतर पोर्तुगीज प्रदेश. | |
| ४. | सरकार व सरकारी खातीं. | ६ |
| ५. | सरकारी खात्यांचीं कामें (पूर्वार्ध) | |
| | अंतर्गत व्यवस्थाविषयक खातीं | ८ |
| | तज्ज्ञ खाती | ८ |
| | बहिर्गत व्यवस्था खातें | ९ |
| ६. | सरकारी खात्यांचीं कामें (उत्तरार्ध) | |
| | इतर जातींचीं खातीं | ९ |
| | महत्त्वाचीं पोटखातीं | १० |
| ७. | मुलकी व्यवस्था (पूर्वार्ध) | ११ |
| ८. | ,, ,, (उत्तरार्ध) | १३ |
| ९. | खानेसुमारी. | १४ |
| १०. | भाषा व साक्षरता. | १७ |
| ११. | तिसवाडी तालुका. | १९ |
| १२. | बारदेश तालुका. | २१ |
| १३. | सासष्टी तालुका. | २३ |
| १४. | मुरगांव तालुका. | २५ |
| | मुरगांव शहर-सुधारणा मंडळ. | २७ |
| १५. | पेडणें तालुका. | २८ |
| १६. | सांखळी तालुका | २९ |
| १७. | सत्तरी तालुका. | ३१ |
| १८. | फोंडें तालुका. | ३२ |
| १९. | सांगें तालुका. | ३३ |
| २०. | केंपें तालुका. | ३५ |
| २१ | काणकोण तालुका. | ३६ |

| खंड. | विषय. | पृष्ठ. |
|---|---|---|
| २२. | **दमण जिल्हा.** | |
| | दमण तालुका. | ३७ |
| | नगरहवेली तालुका. | ३७ |
| | दमण जिल्ह्याची खानेसुमारी. | ३८ |
| २३. | **दीव जिल्हा.** | ३९ |
| २४. | **नोंदणी खातें** | ४० |
| २५. | **शिक्षण (पूर्वार्ध).** | |
| | सरकारी विद्यालयें. | ४५ |
| | शिक्षण-सल्लागार मंडळ. | ४९ |
| २६. | **शिक्षण (उत्तरार्ध).** | |
| | खासगी विद्यालयें. | ५० |
| | नियतकालिकें. | ५२ |
| | वाचनालयें. | ५३ |
| २७. | **ग्रामसंस्था.** | ५४ |
| २८. | **देवालयें.** | ६० |
| २९. | **धर्मपीठें.** | |
| | हिंदूंचीं. | ६५ |
| | ख्रिश्चनांचीं. | ६६ |
| | मुसलमानांचीं. | ६८ |
| ३०. | **दीन-सहाय्यक संस्था.** | ६८ |
| | तिसवाडी. | ६९ |
| | बारदेश. | ७१ |
| | सासष्टी. | ७२ |
| | केपें. | ७४ |
| | दमण व दीव. | ७४ |
| ३१. | **आरोग्य खातें.** | ७५ |

| धडा | विषय | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| ३२. | **जमाबंदी खातें.** | ७७ |
| | सरकारचें खासगी उत्पन्न. | ७७ |
| | अबकारी. | ७८ |
| ३३. | **जकात खातें.** | |
| | उद्योगधंदे व त्यांत गुंतलेले लोक. | ७९ |
| | आयात-निर्यात. | ८१ |
| | जकात व जकात-नाकीं. | ८७ |
| ३४. | **बांधकाम खातें.** | ८८ |
| ३५. | **शेतकी व जंगल खातें.** | ८९ |
| | शेतकी-पतपेढी. | ९० |
| ३६. | **तार-टपाल खातें.** | ९४ |
| | द्रव्य-संग्राहक पतपेढी. | ९६ |
| ३७. | **जमीनमोजणी व खनिज खातें.** | ९८ |
| ३८. | **मुरगांव बंदर व रेल्वे खातें.** | ९८ |
| ३९. | **लष्कर खातें.** | १०२ |
| ४०. | **नाविक खातें.** | १०४ |
| ४१. | **न्याय खातें.** | १०५ |
| ४२. | **सरकार-सल्लागार मंडळ.** | १०९ |
| ४३. | **गॉव्हर्नादोराचें सल्लागार मंडळ.** | ११४ |
| ४४. | **म्युनिसिपालिट्या.** | ११६ |
| ४५. | **ग्राममंडळें.** | ११९ |
| ४६. | **त्रिबुनाल आद्मिनिस्त्रातीव्हु, फिस्काल इ दश् काँतश्** | १२० |
| ४७. | **सरकारचें उत्पन्न व खर्च** | १२१ |
| ४८. | **सरकारी बड्या कामदारांचे पगार.** | १२५ |
| ४९. | **पुरवणी खानेसुमारी.** | १२६ |

# चुकांची दुरुस्ती

१. पृष्ठ २ वर 'सिद्देश्वर महाल' असें आहे तेथें '**शिवेश्वर महाल**' असें पाहिजे.

२. पृष्ठ ५ वर, दमणचें क्षेत्रफळ '१६४ चौरस मैल' असें आहे तेथें '**१२५ चौरस मैल**' असें पाहिजे

३. पृष्ठ ५ वरच, दीवचें क्षेत्रफळ '१४ चौरस मैल' असें आहे तेथें '**१३ चौरस मैल**' असें पाहिजे.

४. पृष्ठ १० वर, अबकारी पोटखात्याचा समावेश 'जकात खातें या मुख्य खात्यांत केलेला आहे' असें म्हटलें आहे तेथें, त्याचा समावेश '**जमाबंदी खातें** या मुख्य खात्यांत केलेला आहे.' असें पाहिजे.

५. पृष्ठ १५ वर लोकसंख्येचें सर्वांत कमी प्रमाण **सत्तरी** तालुक्यांत आहे असें म्हटलें आहे तेथें तें '**सांगे तालुक्यांत सर्वांत कमी म्हणजे दर चौरस मैलास ६७ रहिवासी आहे**' असें पाहिजे.

६. पृष्ठ २४ वर **सासष्टी** तालुक्यांतील गांवांच्या नांवांत 'शिरावली' आहे तेथें '**सुरावली**' असें पाहिजे.

७. पृष्ठ ३३ व ३५ वर जीं गांवांचीं नांवें दिलीं आहेत त्यांत 'वागुर्वे' आहे तेथें '**वागुर्मे**' पाहिजे.

८. पृष्ठ ३४ वर दिलेल्या गांवांच्या नांवांत 'नेतुर्ली' याऐवजीं '**नेत्रावळी**' असें पाहिजे.

९. पृष्ठ ६८ वर '**घडा २० वा**' याऐवजीं '**घडा ३० वा**' असें पाहिजे.

१०. पृष्ठ ७३ वर 'ओरफीस संस्थेचा कायम फंड सुमारें १३१ हजार आहे' असें आहे तेथें तो '**सुमारें १३१० हजार आहे**' असें पाहिजे.

# गोमंतकाचा भूगोल

## भाग २ रा

४०४५

खंड १ ला

## थोडा आवश्यक इतिहास (पूर्वार्ध)

ज्या प्रदेशास आज 'गोमंतक' अशी संज्ञा आहे तितक्याच प्रदेशास प्राचीन काळींही 'गोमंतक' म्हणत असत असें नव्हे. तर गोवा बेटांत जो गोमांचल पर्वत आहे त्याच्या आसपासच्या प्रदेशासच तेवढें 'गोमंतक' ह्या नांवानें ओळखीत असत असें कांहीं लोक म्हणतात व दापोली तालुक्यापासून उत्तर कर्नाटकापर्यंतच्या कोंकणाच्या भागास 'गोमंतक' असें नांव देत असत, असें दुसऱ्या कित्येकांचें मत आहे.

त्याचप्रमाणें गोव्यांतील तालुक्यांच्या ज्या मर्यादा आज आहेत, त्याच प्राचीन काळीं होत्या असें नव्हे; आणि त्यांपैकीं सर्वांना आजचींच नांवें होती असेंही नव्हे.

आज ज्याला **सांखळी** तालुका म्हणतात त्याच्या उत्तर भागास प्राचीन काळीं **भतग्राम महाल** असें नांव होतें. आजच्या **फोंडें** तालुक्याला प्राचीन काळीं **अंतरूज महाल** असें म्हणत असत.

आज जो प्रदेश **सांगें** व **केंपें** ह्या तालुक्यांत मोडतो त्या प्रदेशाचे प्राचीन काळीं **हेमाडबारशें**, **अष्टाग्रहार**, **बाळ्ळी**, **काकोडें** व **चंद्रवाडी** असे पांच महाल धरीत असत व त्या सर्वांस मिळून **जांबावली महाल** किंवा **पंचमहाल** असें नांव होतें. आज सासष्टी तालुक्यांत मोडत असलेला पारोडें गांव प्राचीन काळीं चंद्रवाडींत गणला जात असे.

आजच्या **काणकोण** तालुक्याला प्राचीन काळीं **अडवट** किंवा **सिंहेश्वर महाल** असें नांव होतें.

कांहीं भागांना लोक अद्याप हीं नांवें लावीत असतात.

---

ज्या प्रदेशाला आजमितीला गोमंतक असें नांव आहे तो सगळा प्रदेश प्राचीन काळीं हिंदु राजांच्या ताब्यांत होता. इसवी सनाच्या १४ व्या शतकाच्या आरंभास गोमंतकाच्या कांहीं भागांत मुसलमानांचा अंमल प्रथमतः स्थापित झाला. पण तो अर्धशतकावर न टिकतां १४ व्या शतकाच्या मध्यास हिंदूंचें राज्य पुनश्च सर्वत्र चालूं लागलें आणि तें एक शतकभर टिकलें. १५ व्या शतकाच्या मध्यास गोव्यांतील कांहीं भागांतून पुन्हा मुसलमानीं राज्य स्थापन झालें. तथापि तें स्थिर असें नव्हतें. कारण १५ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत हिंदुमुसलमानांत सारखीं युद्धें होत असत व आज मुसलमानांच्या ताब्यांत असलेला भाग उद्यां हिंदूंच्या ताब्यांत जाई.

येथून समुद्रमार्गानें सुमारें ७००० मैलांच्या अंतरावर पोर्तुगाल नांवाचा एक देश असून तेथील लोकांस पोर्तुगीज लोक असें म्हणतात. १५ व्या शतकाच्या अखेरीस हे पोर्तुगीज लोक आपल्या हिंदुस्थानांत व्यापाराकरितां म्हणून आले. (हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून काढणारा वास्को ड गामा हा पहिला पोर्तुगीज दर्यावर्दी ता. २० मे १४९८ रोजी कालिकत बंदरास पोंचला.) पण पुढें त्यांना येथें राज्य कमावण्याची इच्छा झाली आणि त्याकरतां ते लढाया करूं लागले.

स. मु. . ९२ 
२६-३-३२



तर सांगितलेंच आहे कीं, त्या समयास गोव्याचा कांहीं भाग हिंदूंच्या व कांहीं भाग मुसलमानांच्या ताब्यांत होता. अर्थात् ते दोन्ही भाग मिळविण्याकरतां पोर्तुगिजांस कांहीं वेळां हिंदूंशीं आणि कांहीं वेळां मुसलमानांशीं युद्धें करावीं लागलीं. ह्या युद्धांत कित्येकदां पोर्तुगिजांस जय मिळत असे, तर कित्येकदां त्यांच्या शत्रूंस म्हणजे मुसलमानांस किंवा हिंदूंस जय मिळत असे. असें होता होतां अखेरीस सन १७८२ सालीं आजचें सर्व गोवें पोर्तुगिजांच्या ताब्यांत स्थायिक स्वरूपांत गेलें व ह्या घटकेपर्यंत तें त्यांच्याच सत्तेंत राहिलेलें आहे !

---

धडा २ रा

# थोडा आवश्यक इतिहास (उत्तरार्ध)

गोव्याचा कोणता भाग कोणत्या वर्षी पोर्तुगिजांनीं आपल्या ताब्यांत कोणाकडून कसा घेतला तें खालीं दिलें आहे:—

**तिसवाडी व लगतचीं बेटें**—हीं मलिक युसफ गुर्गी नांवाच्या युसफ आदिलशहाच्या सरदाराकडून **सन १५१० सालीं** ता. २५ नोव्हेंबरला जिंकून घेतलीं.

**बारदेश व सासष्टी** (मुरगांव तालुका धरून) **महाल**—इब्राहीम आदिलशहा व त्याचा बंधु ह्यांच्यांत गादीबद्दल लढाई लागली असतां बंधुविरुद्ध मदत केल्याच्या बक्षिसादाखल, इब्राहीम आदिलशहाकडून **सन १५४३ सालीं** काबीज केले.

**अंत्रूज व पंचमहाल**—हे सौंदेचे संस्थानिक इमोडी सदाशिवराव ह्यांच्याकडून, त्यांना ठराविक वार्षिक खंडणी देण्याच्या करारानें **सन १७६३ सालीं** मिळविले.

**सिद्धेश्वर महाल**—हाही सौंदेचे संस्थानिक इमोडी सदाशिव-राव ह्यांच्याकडून त्यांना ठराविक वार्षिक खंडणी देण्याच्या करारानें **सन १७६४ सालीं** मिळविला.

**भतग्राम महाल**—हा सावंतवाडीचे राजे भोंसले ह्यांच्याकडून **सन १७८१ सालीं** जिंकून घेतला.

**सत्तरी महाल**—हा सावंतवाडीचे देसाई खेम सावंत ह्यांच्या-कडून **सन १७८२ सालीं** जिंकून घेतला.

**पेडणें महाल**— कोल्हापूरचे छत्रपति भोंसले आणि वाडीचे (सावंतवाडीचे) राजे भोंसले ह्यांच्यांत युद्ध जुंपलें असतां पोर्तुगिजांनी छत्रपतीविरुद्ध वाडकरांस मदत केली. ह्या मदतीच्या भरपाईदाखल कांहीं काळ भोगण्याकरतां म्हणून हा महाल वाडकरांनीं **सन १७८१ सालीं** पोर्तुगिजांच्या स्वाधीन केला. पण पुढें त्याबद्दल तंटे माजले आणि **सन १७८८ सालीं** उभयतांत तह होऊन तो पोर्तुगिजांनी स्वतःस कायम करून घेतला.

गोंव्याचे भाग पोर्तुगिजांच्या ताब्यांत गेल्याचा जो कालानुक्रम वर दिला आहे त्यावरून असें दिसून येतें कीं, तिसवाडी, सासष्टी (मुरगांवसह) व बारदेश हे महाल त्यांनी १६ व्या शतकाच्या पूर्वार्धांत आणि इतर १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात काबीज केले. अर्थात् १६ व्या शतकाच्या उत्तरार्धापासून १८ व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंतच्या दोन शतकांत त्यांनी कांहींच कमाई केली नाहीं. बिनकमाईच्या ह्या दीर्घ कालाला अनुसरून पोर्तुगिजांनीं १६ व्या शतकाच्या पूर्वार्धांत काबीज केलेल्या तिसवाडी, बारदेश, सासष्टी व मुरगांव ह्या ४ तालुक्यांस **जुन्या काबिजादी** व १८ व्या शतकाच्या उत्तरार्धांत काबीज केलेल्या पेडणें, सांखळी, सत्तरी, फोंडें, सांगें, केपें व काणकोण ह्या ७ तालुक्यांस **नव्या काबिजादी** अशीं नावें दिलीं आहेत.

धडा ३ रा

# हिंदुस्थानांतील इतर पोर्तुगीज प्रदेश

गोव्याखेरीज पोर्तुगिजांच्या ताब्यांत हिंदुस्थानांत आणखी तीन प्रदेश आहेत. ते म्हणजे **दमण, दीव** व **अंजनीद्वीप** किंवा आंजेदीव बेट हे होत.

**दमण**—हा प्रदेश गोव्याच्या उत्तरेस गुजराथेंत खंबायतच्या आखातालगत आहे. त्याच्या **सीमा** पुढीलप्रमाणें आहेत:- उत्तरेस सुरत जिल्हा, दक्षिणेस व पूर्वेस धरमपूर संस्थान आणि पश्चिमेस ठाणें जिल्हा व हिंदी महासागरांतील खंबायतचें आखात.. त्याचें **क्षेत्रफळ** १६४ चौरस मैल असून **लोकसंख्या** ४८॥ हजारांवर आहे. दमणांत पर्वत असे नाहींतच. **गंभीरगड** हा एकच डोंगर महत्वाचा असा आहे. दमणच्या दक्षिण भागांत दाट झाडी असून दलदलही पुष्कळ आहे. **दमणगंगा** ही ह्या प्रदेशांतील मुख्य नदी असून ती धरमपूर संस्थानांतील डोंगरांत उगम पावते व दमणांत प्रथम पूर्वपश्चिम व नंतर दक्षिणोत्तर दिशेनें वाहात जाऊन **थोरलें दमण** शहराच्या उत्तरेस हिंदी महासागरास मिळते. हें शहर हीच ह्या जिल्ह्याची राजधानी आहे. ह्या नदीचें मुख हें उत्तम बंदर असून त्याला **दमण बंदर** असें नांव आहे. ह्या नदीच्या उजव्या कांठावर **सां झेरॉनिमु** आणि डाव्या कांठावर **दमण-दुर्ग** असे दोन किल्ले आहेत. हा प्रदेश पोर्तुगिजांनीं सन १५२९ ते १७३९ सालापर्यंत मुसलमानांकडून थोडथोडा हस्तगत केला.

**दीव**—हा प्रदेश दमणच्या वायव्येस काठेवाड प्रांतांत आहे. उत्तरेस जुनागड संस्थान आणि इतर तिन्ही दिशांनीं हिंदी महासागर आहे. **क्षेत्रफळ** १४ चौरस मैल असून **लोकसंख्या** १४ हजारांत कमी आहे.

**दीव** शहर हीं ह्या जिल्ह्याची राजधानी असून तेथें एक किल्ला आहे. हा प्रदेश पोर्तुगिजांनीं सन १५४६ सालीं मुसलमानांकडून जिंकून घेतला.

दमण व दीव ह्या दोन्ही प्रदेशांत, खजुरी, मोहाचीं फुलें, नाचणे व लांकूड हीं मुख्यतः उत्पन्न होतात. नाचणे, तूर, गहूं व बटाटे हें तेथील लोकांचें मुख्य अन्न आहे.

**अंजनीद्वीप**— हें बेट गोव्याच्या दक्षिणेस, व कारवारच्या पश्चिमेस असून तें पोर्तुगिजांनीं **सन १५०५ सालीं** जिंकून घेतलें. ह्याचें क्षेत्रफळ अर्धा चौरस मैल असून मुळची लोकवस्ती अशी नाहींच. तथापि सरकारी अधिकारी व इतर कांहीं लोक मिळून सुमारें ५० ख्रिस्ती इसम तेथें राहात असतात. राज्यकारभाराच्या दृष्टीनें हें बेट गोव्यांतच धरलें जातें.

गोवा, दमण व दीव ह्या तिन्ही प्रदेशांना मिळून **पोर्तुगीज हिंदुस्थान** असें नांव असून सरकारी रीत्या त्याला **इश्तादु दा ईंदिय पुर्तुगेझ** असें म्हणण्यांत येत असतें.

---

## धडा ४ था.

# सरकार व सरकारी खातीं

**संस्था**—एकाच ठराविक हेतूनें एकत्र काम करणाऱ्या मंड-ळीचा समुदाय.

**सरकार**—देशांतील लोकांचें बाहेरच्या शत्रूंपासून रक्षण करून अंतस्थ शांतता राखणारी आणि लोकांच्या स्थावरजंगम मालमत्तेसंबंधीच्या तंट्यांचा निकाल लावून त्यांच्या सुखसोईची व भरभराटीची व्यवस्था करणारी संस्था.

सं.मु.प्र. ९२१
२३.३.३२

**प्रजा**—देशांतील लोकांचें सरकारशीं जें नातें असतें त्या नात्या-च्या दृष्टीनें एकंदर लोकांस देण्यांत येत असलेलें नांव.

**नागरिक**—देशांतील मनुष्याचें सरकारशीं जें नातें असतें त्या नात्याच्या दृष्टीनें प्रत्येक मनुष्यास देण्यांत येत असलेलें नांव.

**कर**—आपण करावयाच्या कामांकरितां येणारा खर्च भागवि-ण्यासाठीं सरकार लोकांकडून घेत असलेलें द्रव्य.

**खातें**—सरकारनें करावयाच्या अनेक कामांपैकीं एक अगर अधिक कामें ज्याच्याकडे सोंपवलेलीं असतात असा सरकार संस्थेचा विभाग.

**राज्यकारभार**—सरकार करीत असलेलीं कार्यें व तीं योग्य रीतीनें चालू राहाण्यासाठीं योजीत असलेले उपाय.

पोर्तुगीज हिंदुस्थानचा राज्यकारभार नीटपणें चालावा म्हणून सर-कारनें पुढील ४ जातींचीं खातीं ठेवलीं आहेतः—

(१) व्यवस्थाविषयक खातीं, (२) लष्कर खातें, (३) नाविक खातें व (४) न्याय खातें.

व्यवस्थाविषयक खात्यांत ९ अंतर्गत व्यवस्थाविषयक खातीं व १ बहिर्गत व्यवस्थाविषयक खातें असून, अंतर्गत व्यवस्थाविषयक नऊ खात्यांपैकीं ३ खात्यांना 'तज्ज्ञ खातीं' अशी संज्ञा आहे. त्याशिवाय बहु-तेक सर्व खात्यांतून कांहीं पोटखातींही आहेत.

त्या सर्व खात्यांच्या मुख्य कचेऱ्या राजधानींत म्हणजे पणजी येथें असतात व त्या प्रत्येकावर एकेक मुख्याधिकारी असतो.

---

## धडा ५ वा

# सरकारी खात्यांचीं कामें (पूर्वार्ध)

### अंतर्गत व्यवस्थाविषयक खातीं

१. **मुलकी व्यवस्था खातें**— प्रजेंत शांतता व सुव्यवस्था राखून तिचें शिक्षण व व्यापार-उदीम ह्यांची व्यवस्था पाहाणें, ग्रामसंस्था, देवस्थानें व इतर सार्वजनिक संस्था ह्यांच्यावर देखरेख करणें, लोकांच्या जननमरणादिकांची नोंद ठेवणें, सरकारी छापखाना व वाचनालय चालवणें, प्रजेला आपत्तींच्या प्रसंगीं मदत देणें वगैरे ह्या खात्याचीं कामें आहेत.

२. **आरोग्य खातें**—प्रजेच्या आरोग्याच्या संरक्षणाकरितां आणि सुधारणेकरितां उपाय योजणें हें ह्या खात्याचें काम आहे.

३. **जमाबंदी खातें**—सरकारनें प्रजेवर बसविलेले कर वसूल करणें, सरकारी नोकरांचा पगार व इतर खर्चाच्या रकमा देणें आणि राज्यकारभाराचा जमाखर्च ठेवणें हीं ह्या खात्याचीं कामें आहेत.

४. **जकात खातें**—आयात व निर्यात मालावर देखरेख ठेवून त्यांच्यावरील कर वसूल करणें हें ह्या खात्याचें काम आहे.

५. **बांधकाम खातें**—नागरिकांच्या सोईकरतां प्रांतिक रस्ते, धक्के, कालवे, पूल इत्यादि बांधणें व ते दुरुस्त ठेवणें हें ह्या खात्याचें काम आहे.

६. **शेतकी व जंगल खातें**—देशांतील शेतीच्या भरभराटीकरतां उपाय योजणें आणि सरकारी रानांची निगा राखणें हें ह्या खात्याचें काम आहे.

### तज्ज्ञ खातीं

१. **तार-टपाल खातें**—लोकांनीं एकमेकांना पाठविलेलीं पत्रें, तारा, पैसे व ठराविक वजनापर्यंत जिन्नस हीं वेळेवर पोंचतीं करणें, तसेंच टेलिफोनची व्यवस्था पाहाणें, हें ह्या खात्याचें काम आहे.

**२. जमीनमोजणी व खनिज खातें**—देशांतील जमिनीची मालकीवार मोजणी करून तिचे व बांधावयाचीं घरें इत्यादिकांचे नकाशे काढून देणें आणि देशांतील धातूंच्या खाणी शोधून त्यांची शुद्धि, विक्री वगैरेंची व्यवस्था करणें हीं ह्या खात्याचीं कामें आहेत.

**३. मुरगांव बंदर आणि पश्चिम हिंदुस्थान पोर्तुगीज रेल्वे खातें**—मुरगांव बंदरांतील एकंदर व्यवहार व गोव्यांतील रेल्वे ह्यांच्यावर देखरेख ठेवणें हें ह्या खात्याचें काम आहे.

### बहिर्गत व्यवस्था खातें

पोर्तुगीज वसाहतमंत्री, परदेशांचीं सरकारें, पोर्तुगाल व इतर देश ह्यांच्या वसाहतींचीं सरकारें आणि पोर्तुगाल व इतर देश ह्यांच्या वकिलाती ह्यांच्याशीं संबंध येणाऱ्या व्यवहारांची निरवानिरव करणें हें ह्या खात्याचें काम आहे.

(प्रत्येक देशाच्या सरकारनें इतर देशांत आपला एकेक प्रतिनिधि, स्वतःच्या हितसंबंधांना जपण्याकरतां, ठेवलेला असतो. त्याला त्या देशाचा **वकील** आणि त्याच्या कचेरीला **वकिलात** अशा संज्ञा असतात.)

---

धडा ६ वा.

# सरकारी खात्यांचीं कामें (उत्तरार्ध)

## इतर जातींचीं खातीं

**१. लष्कर खातें**—प्रजेचें परदेशी शत्रूंच्या हल्ल्यांपासून रक्षण करणें आणि लोकांत शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठीं मुलकी व्यवस्था खात्यांतील अधिकाऱ्यांस मदत करणें हें ह्या खात्याचें मुख्य काम आहे.

**२. नाविक खातें**—धक्के, बंदरें, कालवे, दीपगृहें, लहानमोठ्या

बोटींच्या फेऱ्या, मासळी मारण्याचा धंदा ह्यांच्यावर देखरेख करणें आणि वातावरणांतील फेरबदल पाहाणें हीं ह्या खात्याचीं कामें आहेत.

३. **न्याय खातें**—नागरिकांच्या एकमेकांतील तंट्याभांडणांचा निकाल लावणें हें ह्या खात्याचें मुख्य काम आहे.

## महत्त्वाचीं पोटखातीं

१. **शिक्षण खातें**—देशांतील नागरिकांच्या हरएक प्रकारच्या शिक्षणाची सोय करणें हें ह्या पोटखात्याचें काम आहे.

२. **नोंदणी खातें**—देशांतील लोकांचे जन्म, विवाह, मृत्यु, व्यवसाय, व्यंगें इत्यादींची नोंद ठेवणें हें ह्या पोटखात्याचें काम आहे.

३. **ख्रिस्ती धर्म खातें**—ख्रिस्ती लोकांच्या धार्मिक विधींची व त्यांच्या धर्मशिक्षणाची सोय करणें आणि अन्यधर्मीयांस ख्रिस्ती करून घेणें हें ह्या पोटखात्याचें काम आहे.

ह्या तिन्ही पोटखात्यांचा **मुलकी व्यवस्था खातें** ह्या मुख्य खात्यांत समावेश होत असतो.

४. **अबकारी खातें**—देशांत नारळी, काजू, ऊस व मोहाचीं फुलें ह्यांच्यापासुन जी दारू उत्पन्न केली जाते, तिची गाळणी व विक्री ह्यांच्यावर पोलीस खात्यामार्फत देखरेख ठेवणें हें ह्या पोटखात्याचें काम असून त्याचा समावेश **जकात खातें** ह्या मुख्य खात्यांत केलेला आहे.

५. **पोलीस खातें**—प्रजेंत शांतता राखण्यास मुलकी व्यवस्था खात्यांतील अधिकाऱ्यांस मदत करणें आणि नागरिकांच्या जीवितांचें व मालमत्तेचें संरक्षण करणें हें ह्या पोटखात्याचें काम असून त्याचा समावेश **लष्कर खातें** ह्या मुख्य खात्यांत केलेला आहे.

६. **जमीननोंदणी खातें**—देशांतील जमिनीचा कोणता भाग कोणाच्या मालकीचा आहे ह्याची नोंद ठेवणें हें ह्या पोटखात्याचें काम असून त्याचा समावेश **न्याय खातें** ह्या मुख्य खात्यांत केलेला आहे.

---

संशो.ग्रं. ९२३
२३-३-१२
६२२५



## धडा ७ वा

# मुलकी व्यवस्था (पूर्वार्ध)

मुलकी राज्यकारभाराच्या सोईसाठीं आपल्या पोर्तुगीज सरकारनें पोर्तुगीज हिंदुस्थानचे ३ मोठे विभाग पाडून प्रत्येक विभागाला **जिल्हा** किंवा **दिस्त्रीक्तु** असें नांव दिलें आहे. त्याचप्रमाणें जिल्ह्यांचे विभाग पाडून प्रत्येक विभागाला **तालुका** किंवा **कोंसेल्यु** आणि तालुक्यांचे लहानलहान विभाग पाडून प्रत्येक विभागाला **फ्रेगेझीय** असें नांव दिलें आहे. (प्रत्येक फ्रेगेझींत एक किंवा अधिक गांव असूं शकतात. म्हणून फ्रेगेझीय म्हणजे गांव असें म्हणतां येत नाहीं.)

[हे जिल्हे कोणते व प्रत्येक जिल्ह्यांत किती व कोणते तालुके येतात त्याचा तक्ता पुढें दिला असून फ्रेगेझींविषयींची माहिती त्या त्या तालुक्यासंबंधींच्या धड्यांत सांगितलेली आहे.]

| | जिल्हे | | तालुके |
|---|---|---|---|
| पोर्तुगीज हिंदुस्थान | १ गोवें | जुन्या काबिजादी | १ तिसवाडी |
| | | | २ बारदेश |
| | | | ३ सासष्टी |
| | | | ४ मुरगांव |
| | | नव्या काबिजादी | ५ पेडणें |
| | | | ६ सांखळी |
| | | | ७ सत्तरी |
| | | | ८ फोंडें |
| | | | ९ सांगें |
| | | | १० केपें |
| | | | ११ काणकोण |
| | २ दमण | ................. | १ दमण |
| | | | २ नगर हवेली |
| | ३ दीव | ................. | १ दीव |

जिल्हा, तालुका व एक किंवा अधिक फ्रेगेझींचा गट ह्यांतील मुलकी कारभार पाहाण्याकरतां एकेक अधिकारी असतो.

जिल्ह्यावरील अधिकाऱ्यास **गॉव्हेंर्नादोर** ( म्हणजे सुभेदार ) असें नांव आहे.

तालुक्यावरील अधिकाऱ्यास **आद्मिनिस्त्रादोर** (म्हणजे मामलेदार ) असें नांव आहे.

सत्तरी येथें लष्कराची एक तुकडी असते व तेथील आदमिनिस्त्रादोर हा लष्करी अधिकारीच असावा लागतो. म्हणून सत्तरी महालाला कोंसेल्यु व **कॉमांद् मिलितार** आणि तेथील मामलेदारास आदमिनिस्त्रादोर व **कॉमांदांत मिलितार** असें म्हणतात.

एका फ्रेगेझीवरील किंवा अधिक फ्रेगेझींच्या गटावरील अधिकाऱ्यास **रेजेदोर** ( म्हणजे पाटील ) असें नांव आहे.

सत्तरी महालांतील रेजेदोरही लष्करी लोकच असतात. त्यांना **शॅफि द सिंकुष्क्रिसांव** असें म्हणतात.

गोवा जिल्ह्याच्या गॉव्हेंर्नादोराची सत्ता दमण आणि दीव येथील गॉव्हेंर्नादोरांवरही चालत असते, म्हणून त्याला **गॉव्हेंर्नादोर जराल** ( म्हणजे सरसुभेदार ) असें म्हणतात.

गॉव्हेंर्नादोर जराल हा जरी मुख्यत: मुलकी कारभारावरील अधिकारी असतो तरी लष्कर व इतर सर्व खात्यांचा वरिष्ठाधिकारी तोच मानला जातो.

---

## धडा ८ वा

# मुलकी व्यवस्था (उत्तरार्ध)

पोर्तुगाल देशाच्या सत्तेखालीं ज्याप्रमाणें हिंदुस्थान देशांतील कांहीं प्रदेश आहे त्याप्रमाणें आशिया व आफ्रिका खंडांत मिळून आणखी सात प्रदेश त्याच्या सत्तेखालीं आहेत. ह्या प्रदेशांना पोर्तुगालच्या **वसाहती** किंवा 'कॉलॉनियश्' असें म्हणतात आणि ह्या वसाहती, खुद्द पोर्तुगाल व त्याच्या लगतचीं बेटें ह्या सर्वांना **पोर्तुगीज साम्राज्य** असें नांव देतात. ह्या साम्राज्याचा राज्यकारभार नीटपणें चालावा म्हणून पोर्तुगालच्या सरकारनें, अंतर्गत कारभार खातें, परराष्ट्र खातें, युद्ध खातें, आरमार खातें, जमाबंदी खातें, व्यापार खातें, वसाहत खातें, शिक्षण खातें, न्याय खातें आणि शेतकी खातें अशीं १० खातीं ठेवलेलीं असून प्रत्येक खात्यावर एकेक मुख्याधिकारी नेमलेला आहे. ह्या मुख्याधिकाऱ्याला त्या त्या खात्याचा **प्रधान** किंवा **मंत्री** अशी संज्ञा असून त्या सर्वांना समुच्चयानें **प्रधानमण्डळ** किंवा **मंत्रिमण्डळ** अशी संज्ञा असते. वसाहतींचा कारभार ज्याच्याकडे सोंपवलेला असतो त्याला, अर्थातच, **वसाहतींचा प्रधान** किंवा **वसाहतमंत्री** असें म्हणतात. वसाहतमंत्र्याला सल्लामसलत देण्यासाठीं कित्येक सभासदांचें एक मण्डळ नेमलेलें असतें. त्याला **वसाहतींचें वरिष्ठ मण्डळ** असें नांव असतें.

गॉव्हेर्नादोर जरालची नेमणूक पोर्तुगाल सरकार, वसाहतमंत्र्याच्या शिफारशीवरून आणि प्रधानमंडळाच्या संमतीनें, करीत असतें.

जिल्ह्यांवरील गव्हर्नर आणि सर्व खात्यांचे मुख्याधिकारी ह्यांच्या नेमणुका वसाहतमंत्री करीत असतो. त्याचप्रमाणें लष्कर व नाविक खात्यांतील हुद्देदार आणि न्याय खात्यांतील वरिष्ठाधिकारी ह्यांच्याही नेमणुका वसाहतमंत्रीच करीत असतो.

आदमिनिस्त्रादोरांची नेमणूक गॉव्हॅर्नादोर जराल आपल्या विश्वासांतल्या लायक गृहस्थांतून करीत असतो. आणि रेजेदोरांची नेमणूकही, आदमिनिस्त्रादोरांच्या शिफारशीवरून, गॉव्हॅर्नादोरच करीत असतो. पोर्तुगाल सरकार व वसाहतमंत्री ह्यांच्या अधिकारांतल्या खेरीज करून इतर सर्व खात्यांतील कामगारांच्या नेमणुका, त्या त्या खात्यांच्या मुख्याधिकाऱ्यांच्या शिफारशीवरून गॉव्हॅर्नादोर जराल करीत असतो.

गॉव्हॅर्नादोर जराल, गॉव्हॅर्नादोर, आदमिनिस्त्रादोर व रेजेदोर ह्यांच्या नेमणुका ठराविक मुदतीच्या—तूर्तास ४ वर्षांच्या कालावधीच्या—असतात. पण त्यांची त्याच जागीं पुन्हा नेमणूक करतां येते. आणि इतर बहुतेक सर्व सरकारी नोकरांच्या नेमणुका तहाहयातीच्या असतात. (ज्यांच्या नेमणुका तहाहयातीच्या नाहींत त्यांच्या नेमणुकांच्या मुदती त्या त्या अधिकाऱ्यांसंबंधींच्या माहितींत सांगितल्या आहेत.)

---

## धडा ९ वा

# खानेसुमारी

**खानेसुमारी** किंवा **शिरगणती**—एकाद्या प्रदेशांतील लोकांची लिंग, धर्म, वय, वैवाहिक स्थिति, धंदा, शिक्षण, व्यंग, राष्ट्रीयत्व इत्यादींच्या दृष्टीनें करण्यांत येणारी गणती.

(ही सरकारकडून सामान्यतः दर १० वर्षांनीं करण्यांत येत असते. प्रस्तुत पुस्तकांतील माहिती सन १९२१ सालच्या खानेसुमारीवरून दिली आहे.)

लोकसंख्या दोन प्रकारची असतेः—खरी लोकसंख्या किंवा लोकवस्ती आणि वट लोकसंख्या.

**खरी लोकसंख्या** किंवा **लोकवस्ती**—एकाद्या प्रदेशांत वस्ती करून राहाणाऱ्या लहानमोठ्या सर्व हजर स्त्रीपुरुषांची संख्या.

**वट लोकसंख्या**—एकाद्या प्रदेशांत वस्ती करून राहाणाऱ्या लहानमोठ्या सर्व हजर आणि गैरहजर स्त्रीपुरुषांची संख्या.

( प्रस्तुत धड्यांत जी खानेसुमारी दिली आहे ती फक्त गोमंतकाची आहे. दमण व दीव येथील खानेसुमारी त्या जिल्ह्यांतील तालुक्यांसंबंधींच्या धड्यांत दिलेली आहे. सर्व धड्यांतील खानेसुमारी खऱ्या लोकसंख्येची आहे. )

**गांवें व कुटुंबें**—गोव्याच्या लोकवस्तीचा नक्की आंकडा ४६९४९४ आहे. ही लोकवस्ती १५६ फ्रेगेझींत मिळून ४०० वर गांवें व सुमारें १०८००० कुटुंबें ह्यांत विभागून राहिलेली आहे. सन १९१० सालापेक्षां १९२१ सालीं गोव्याची लोकसंख्या १७२५८ नीं कमी झाली.

**लोकवस्तीचें प्रमाण**— गोव्यांतील लोकवस्तीचें सरासरी प्रमाण दर चौरस मैलास ३८७ रहिवासी असें आहे. हें प्रमाण बारदेश तालुक्यांत सर्वांत अधिक म्हणजे दर चौरस मैलास १२३४ रहिवासी इतकें असून सत्तरी तालुक्यांत सर्वांत कमी म्हणजे दर चौरस मैलास ११० रहिवासी इतकें आहे.

**पुरुष व स्त्रिया**—गोव्याच्या ४६९४९४ लोकवस्तीपैकीं २२१४२९ पुरुष व २४८०६५ स्त्रिया आहेत.

**धर्म**—ह्या लोकवस्तीपैकीं २४५४९९ कॅथोलिक पंथी ख्रिस्ती, २१८२२३ हिंदु, ५४८७ मुसलमान, ५१ प्रॉटेस्टंट पंथी ख्रिस्ती, ३८ जैन, १७ कोणताही धर्म नसलेले, ९ पार्शी, ३ ज्यू व १६७ ज्यांचा धर्म समजलेला नाहीं असे लोक आहेत.

(सन १९१० सालापेक्षां १९२१ सालीं हिंदूंची संख्या ३१४० नीं वाढली व ख्रिश्चनांची २१०४२ नीं घटली. १९२१ सालीं गोव्यांत हिंदूंची लोकसंख्या ख्रिश्चनांपेक्षां २७२७५ नीं जरी कमी होती तरी

एकंदर पोर्तुगीज हिंदुस्थानांत हिंदूंची लोकसंख्या ख्रिश्चनांपेक्षां २६७०९ नीं अधिक होती. आणि १९२८ सालीं ख्रिश्चनांस हिंदु करून घेण्यांत येऊं लागल्यापासून हिंदूंची संख्या आणखी ७-८ हजारांनीं वाढली असून त्याच मानानें ख्रिश्चनांची कमी झालेली आहे. म्हणजे आजमितीस **गोव्यांत** सुमारें २३८ हजार ख्रिश्चन व २२६ हजार हिंदु आणि एकंदर पोर्तुगीज हिंदुस्थानांत २४० हजार ख्रिश्चन व २८१ हजार हिंदु असावेत.)

**वय**—गोव्याच्या ४६९४९४ लोकवस्तीपैकीं ९१३३६ पुरुष व ८८०२५ स्त्रिया मिळून एकंदर १७९३६१ पंधरा वर्षांखालील, ९८९६९ पुरुष व ११९५२६ स्त्रिया मिळून एकंदर २१८४९५ सोळा ते एकुणपन्नास वर्षांचे आणि ३१०८१ पुरुष व ४०४९२ स्त्रिया मिळून एकंदर ७१५७३ एकुणपन्नास वर्षांवरील वयाचे लोक आहेत. ४३ पुरुष व २२ स्त्रिया ह्यांचें वय समजलेलें नाहीं.

**वैवाहिक स्थिति**--ह्या लोकवस्तीपैकीं १२६८७८ पुरुष व १०११३२ स्त्रिया मिळून एकंदर २२८०१० लोक अविवाहित, ८३५२६ पुरुष व ९६७२५ स्त्रिया मिळून एकंदर १८०२५१ लोक विवाहित, १०९७९ विधुर, ५०१७३ विधवा, ४ पुरुष व १० स्त्रिया मिळून १४ लोक काडीमोड केलेले आहेत. ४२ पुरुष व २५ स्त्रिया ह्यांची वैवाहिक स्थिति अज्ञात आहे.

**जनन-मरण**—गोव्यांत सन **१९२७** सालीं ख्रिश्चनांत ३२८१ मुलगे व ३०५० मुली मिळून एकंदर ६३३१, आणि ख्रिश्चनेतरांत २४४३ मुलगे व २०१२ मुली मिळून एकंदर ४४५५ **जन्म** झाले. ह्याच सालीं ख्रिश्चनांत २८२२ पुरुष व २९९२ स्त्रिया मिळून एकंदर ५८१४ आणि ख्रिश्चनेतरांत २२३५ पुरुष व २०२३ स्त्रिया मिळून एकंदर ४२५८ **मृत्यु** झाले. (खास हिंदूंच्या जननमरणाचे आंकडे निराळे मिळत नाहींत.)

## धडा १० वा

# भाषा व साक्षरता

गोमन्तकांतील बहुतेक सर्व लोक 'कोंकणी' भाषा बोलतात. ही भाषा मराठीचाच एक प्रकार किंवा तिची एक 'बोली' आहे असें कित्येक विद्वान् लोक म्हणतात; तर, ती मराठीहून समूळ भिन्न आहे असें दुसरे कित्येक म्हणतात. आणि, कित्येकांचें असें मत आहे कीं, आज ज्यांना कोंकणी व मराठी अशीं नांवें देतात त्या दोन्ही भाषा मागें एकच होत्या, व ह्या सामान्य भाषेस आज आलेलें वाङ्मयात्मक व विकसित रूप म्हणजे मराठी होय.

गोव्यांतील चित्पावन व कऱ्हाडे ब्राह्मण हे इतरांशीं कोंकणींतूनच बोलत असले तरी आपापल्या घरीं 'कोंकणी स्वराची मराठी' बोलत असतात. त्याचप्रमाणें, गोव्यांतील मुसलमान धर्मी लोकही बाह्य व्यवहारांत कोंकणीच वापरीत असले तरी घरांत व परस्परांत हिंदुस्थानी भाषा बोलत असतात. गोव्यांतील कांहीं ख्रिश्चनांनीं घरांत व एकमेकांत पोर्तुगीज बोलण्याचा प्रघात पाडला असून कांहीं ख्रिश्चनांनीं इंग्रजी बोलण्याची चाल उचलली आहे. जे लोक गोमंतकांत येऊन फार काल झाला नाहीं ते आपापली जन्मभाषा बोलत असतात. अशा लोकांत मराठी व पोर्तुगीज बोलणाऱ्यांची संख्या विशेष असून त्यांच्या खालोखाल कानडी बोलणाऱ्यांची आहे.

गोव्यांतील सर्व हिंदु लोक आपलें घरगुती लेखनवाचन देवनागरी लिपि व मराठी भाषा ह्यांतून करीत असतात; कांहीं ख्रिश्चन लोक तें रोमन लिपि व कोंकणी भाषा ह्यांतून करीत असतात, तर इतर कांहीं रोमन लिपि व पोर्तुगीज किंवा इंग्रजी भाषा ह्यांतून करीत असतात. आणि मुसलमान लोक तें आरबी लिपि व हिंदुस्थानी भाषा ह्यांतून करीत असतात. ही लिपि देवनागरी किंवा रोमन लिपीप्रमाणें डावीकडून उजवीकडे न लिहितां उजवीकडून डावीकडे लिहिण्यांत येते. गोव्याच्या

राज्यकारभाराची भाषा पोर्तुगीज असल्यानें सर्व धर्मांचे कांहीं लोक ती भाषा शिकले असून तिच्यांतून लेखनवाचनही करीत असतात.

दमण व दीव येथील मुख्य भाषा गुजराथी आहे. पण उभय ठिकाणचे कांहीं ख्रिश्चन पोर्तुगीज तर कांहीं इंग्रजी आणि, मुसलमान हिंदुस्थानी भाषा घरगुती व्यवहारांत वापरीत असतात. दमण येथें मराठी भाषा बोलणारेही कांहीं लोक आहेत. तेथें हिंदु लोक देवनागरी, ख्रिश्चन रोमन आणि मुसलमान आरबी लिपि उपयोगांत आणीत असतात. देवनागरीचें गुजराथी रूप तिच्या मराठी रूपाशीं बरेंच सदृश आहे.

गोवें, दमण व दीव येथील ख्रिस्ती समाजांत पुरुषांप्रमाणेंच कित्येक स्त्रियाही आपलें लेखनवाचन पोर्तुगीज किंवा इंग्रजी भाषेंतून करीत असलेल्या आढळतात. पण हिंदु आणि मुसलमान समाजांत एकही स्त्री आपलें लेखनवाचन पोर्तुगिजींत किंवा इंग्रजींत करणारी नाहीं. गोव्यांतील हिंदु स्त्रियांत फार तर शेंशंभर पोर्तुगीज किंवा इंग्रजी भाषा शिकलेल्या असतील. पण मुसलमानांत ही संख्या चारपांचांवर जाईल कीं नाहीं ह्याबद्दल शंका आहे.

**साक्षरतेचें प्रमाण**—सन १९२१ सालीं केलेल्या खानेसुमारी-प्रमाणें गोव्यांत जी ४६९४९४ लोकवस्ती आहे तींत ३७९३८ पुरुष व १७३५७ स्त्रिया मिळून एकंदर ५५२९५ लोक साक्षर, म्हणजे कोणत्या तरी एका भाषेंतून लेखनवाचन करतां येणारे, असून १८३४९१ पुरुष व २३०७०८ स्त्रिया मिळून ४१४१९९ लोक निरक्षर आहेत! गोव्यांतील एकंदर पुरुषसंख्येशीं साक्षर पुरुषांचें प्रमाण शेंकडा १७ व एकंदर स्त्रीसंख्येशीं साक्षर स्त्रियांचें प्रमाण शेंकडा ७ असून एकंदर लोकसंख्येशीं साक्षर लोकांचें प्रमाण शेंकडा १२ हून किंचित् कमी आहे.

तथापि, एकाद्या प्रदेशांतील साक्षरतेचें खरें प्रमाण पाहावयाचें असलें तर तें एकंदर लोकसंख्येशीं न काढतां तिच्यांतून ७ वर्षांखालील

वयाचीं मुलें वजा करून राहाणाऱ्या संख्येशीं काढणेंच बरोबर असतें. कारण ७ वर्षांखालील मुलें स्वभावतःच साक्षर न होण्यासारखीं असतात. असें प्रमाण काढलें तर तें पुरुषांत शेंकडा २१ पेक्षां किंचित् अधिक आणि स्त्रियांत ८॥ व गोळावेरजेंत १५ हून किंचित् कमी येतें. मागील दहा वर्षांपेक्षां हें प्रमाण पुरुषांत २॥ नीं कमी झालें असून स्त्रियांत ०॥० नें वाढलें आहे.

गोव्यांतील साक्षरांचें धर्मवार, म्हणजे कोणत्या धर्माचे किती लोक साक्षर आहेत तें, व भाषावार, म्हणजे कोणत्या भाषांतून किती साक्षर आहेत तें, प्रमाण निश्चित समजत नाहीं. तथापि गोव्यांतील ख्रिश्चनांपेक्षां हिंदूंतील आणि पोर्तुगिजीपेक्षां मराठी आदि इतर भाषांतील साक्षरताच अधिक असावी असें म्हणतात.

(दमण व दीव येथील साक्षरतेचें प्रमाण त्यांच्या तालुक्यांसंबंधींच्या धड्यांत दिलें आहे.)

---

## धडा ११ वा.

# तिसवाडी तालुका (कोंसेल्यु दज् ईल्यश्)

**सीमा व क्षेत्रफळ**—ह्या तालुक्याच्या उत्तरेस मांडवी नदी, दक्षिणेस जुवारी किंवा अघनाशिनी नदी, पूर्वेस मडकईची नदी किंवा कुंभारजुवेंचा कालवा आणि पश्चिमेस आरबी समुद्र असून त्याचें क्षेत्रफळ ५४॥ चौरस मैल आहे.

**लोकवस्ती व साक्षरता**—ह्या तालुक्याची लोकवस्ती ५७२६३ असून तिचें प्रमाण दर चौरस मैलास १०५० रहिवासी असें आहे. ह्या लोकवस्तींत २८१०२ पुरुष व २९१६१ स्त्रिया असून पुरुषांपैकीं ५९६३ व स्त्रियांपैकीं ३२२३ लोक साक्षर आहेत. साक्षरतेचें प्रमाण पुरुषांत २१, स्त्रियांत ११ व गोळावेरजेंत १६ आहे.

ह्या तालुक्यांत पुढीलप्रमाणें १८ फ्रेगेझी व ४९ गांवें आहेत:—

| फ्रेगेझी | गांवें |
| --- | --- |

**आघशी**—आघशी व मेरकुर.

**भाटी**—भाटी, गांशीं, गौळ्यां-मौळा व सांतानाची तळावली.

**करंबळी**—करंबळी व खोर्ली.

**थोरलें गोवें**—थोरलें गोवें, शिर्दोव (श्रीधन) व कुंकें.

**ग्रास**—धाकटें चोडण बेट.

**मेर्से**—थोरली मोरंबी, धाकटी मोरंबी, मुर्डा व रेनावडें.

**नेवरें**—थोरलें नेवरें व धाकटें नेवरें.

**मंडूर**—मंडूर व आजोशी.

**पणजी**—पणजी.

**पियॅदाद**—गळटी व नावेली.

**रायबंदर**—रायबंदर व चिंबल.

**सां बार्तोलोमेव**—थोरलें चोडण बेट, कारंइ व आंबाडी.

**सां ब्राज**—गंडाव्ळी, कुंभारजुवें व वांटसा बेट.

**सांत इश्तेव्हांव**—जुवें बेट व आखाडा बेट.

**सां मातीयश्**— मालार, नार्वे व कापांव किंवा वासीं बेट.

**सां पेद्रु**—पानवेल, जुनें गोवें, वायंगिणी, यॅला व धावजी.

**सांत क्रूझ**—कालापूर, कुजरा व बांबोळी.

**ताळगांव**—ताळगांव, सांत इनेज, करंजाळें, दोना पावूल व काबु.

**पणजी** शहर हें ह्या तालुक्याचा कसबा म्हणजे राजधानीचें ठिकाण असून गोवा जिल्हा व पोर्तुगीज हिंदुस्थान ह्यांची राजधानी हेंच शहर आहे.

प्राचीन काळीं, म्हणजे पोर्तुगीज लोक हिंदुस्थानांत आले त्या समयास, 'जुनें गोवें' हें अत्यंत भरभराटलेलें शहर होतें. आणि म्हणूनच त्यांनी तें जिंकून तेथेंच आपली राजधानी केली. पण १९ व्या शतकाच्या

मध्यास तेथें एकाएकीं भयंकर सांथ उद्भवली व शहराचें आरोग्य कायमचें बिघडलें. त्यामुळें राजधानी तेथून हलवून सन १८४३ सालीं ती ताळगांवांतील पणजी वाड्यावर आणली. त्या वेळीं ह्या ठिकाणीं मुख्यतः कोळी लोकांची वस्ती होती. पण तेथें राजधानी केल्यामुळें लोकसंख्या वाढूं लागली, आणि इतर सुधारणाही होऊं लागल्या. आज, 'पणजी'चें वाड्याचें रूप जाऊन त्याला सुंदर शहराचें रूप प्राप्त झालें आहे. मूळ राजधानीचें नांव जुनें गोवें होतें म्हणून ह्या नव्या राजधानीला **'नवीन गोवें'** असें म्हणूं लागले व आजही तें नांव चालू आहे.

---

धडा १२ वा.

## बारदेश तालुका

**सीमा व क्षेत्रफळ**—ह्या तालुक्याच्या उत्तरेस तिळार किंवा कोलवाळची नदी, दक्षिणेस मांडवी नदी, पूर्वेस सांखळी तालुका व पश्चिमेस आरबी समुद्र असून त्याचें क्षेत्रफळ ८१ चौरस मैल आहे.

**लोकवस्ती व साक्षरता**—ह्या तालुक्याची एकूण लोकवस्ती ९९९२५ असून तिचें प्रमाण दर चौरस मैलास १२३४ रहिवासी असें पडतें. ह्या लोकवस्तींत ४१३६७ पुरुष व ५८५५८ स्त्रिया असून त्यांपैकीं ९८५९ पुरुष व ६५२३ स्त्रिया साक्षर आहेत साक्षरतेचें प्रमाण पुरुषांत शेंकडा २३॥, स्त्रियांत ११ व एकंदरींत १६॥ आहे.

ह्या तालुक्यांत पुढीलप्रमाणें २६ फ्रेगेझी व ४८ गांवें आहेत:—

**फ्रेगेझी** **गांवें**

**हळदोणें**—हळदोणें.

**हणजूण**—हणजूण.

**आसगांव**—आसगांव.
**अस्नोडें**—अस्नोडें.
**कळंगूट**—कळंगूट.
**कांदोळी**—कांदोळी व लिंज्यारिश्.
**कोलवाळ**—कोलवाळ व कामुर्ली.
**गिरीं**—गिरी व सांकोर्डें.
**म्हापसें**—म्हापसें, खोर्ली व कुचेली.
**मइडें**— मइडें.
**नागवें**—नागवें, हडफडें व वाग.
**नेरूल**—नेरूल.
**नाचनोडें**—नाचनोडें.
**ओडशेल**—ओडशेल व वागाळी.
**पारां**—पार्रा, काणकें व वेलें.
**पिळर्ण**—पिळर्ण व मार्रा.
**पोंवुर्पे**—पोंवुर्पें, ओळावली व वेळोटी.
**पेंज्य द फ्रांस**—पेंज्य द फ्रांस (एकोशी).
**रैजमाग**—रैजमाग.
**रेवोडें**—रेवोडें, नादोडें व पीर्ण.
**साळगांव**—साळगांव.
**शिवोली**—शिवोली, मार्ना व वाडी.
**सोकोरु**—सोकोरु.
**साल्व्हादोर दु मून्दु**—साल्व्हादोर दु मून्दु (बिठ्ठोण).
**थिवीं**—थिवीं, शिरसई व बडें.
**उसकई**—उसकई, पाळयें, पुनोळें व बस्तोडें.
**म्हापसें** उपनगर हें ह्या तालुक्याचा कसबा आहे.

धडा १३ वा

# सासष्टी तालुका

**सीमा व क्षेत्रफळ**—उत्तरेस मुरगांव तालुका व जुवारी नदी, दक्षिणेस केपें तालुका, पूर्वेस जुवारी नदी व केपें तालुका आणि पश्चिमेस आरबी समुद्र अशा ह्या तालुक्याच्या सीमा असून त्याचें क्षेत्रफळ ९५॥ चौरस मैल आहे.

**लोकवस्ती व साक्षरता**—ह्या तालुक्याची एकंदर लोकवस्ती १००८४२ असून तिचें प्रमाण दर चौरस मैलास १०५६ रहिवासी इतकें पडतें. ह्या लोकवस्तींत ४६०७२ पुरुष व ५४७७० स्त्रिया असून त्यांपैकीं ८७४९ पुरुष व ४२९५ स्त्रिया साक्षर आहेत. साक्षरतेचें प्रमाण पुरुषांत १९ व स्त्रियांत ८ असून एकंदरींत १३ आहे.

ह्या तालुक्यांत खालीं दिल्याप्रमाणें २४ फ्रेगेझी व ५० गांवें आहेत:—

**फ्रेगेझी** — **गांवें**

**असोळणें**—असोळणें.
**वाणावली**—अडसुली, वाणावली व काणें.
**वेताळभाटी**—वेताळभाटी व गणसुव.
**कर्मणें**—कर्मणें व शूद्र-केळशी.
**चांदर**—कवडी, चांदर व गिर्डोली.
**चिंचोणें**—चिंचोणें, देवसुव, धर्मापूर, सार्जोडें व शिर्ली.
**कोलवें**—कोलवें, गंडावळी, सेर्नाभाटी व वानेली.
**कुंकळ्ळी**—कुंकळ्ळी, तळवडें व वेरोडें.
**कुडतरी**—कुडतरी.

**लोटली**—लोटली.

**माखजन**—माखजन.

**माजोर्डें**—कालट, माजोर्डें व उतर्डें.

**मडगांव**—मडगांव.

**नावेली**—आकें, दवर्ली, दिकार्पाल, नावेली व तळावली.

**नुवें**—नुवें.

**ओडली**—ओडली.

**पारोडें**—पारोडें व मुळे.

**रायतूर**—रायतूर.

**राय**—राय व कामुर्ली.

**सां झ्युझे दु आरेयाल**—सां झ्युझे दु आरेयाल.

**शिरावली**—दुकळ्ळी व शिरावली.

**वार्कें**—वार्कें.

**वेळ्ळी**—आंबेली व वेळ्ळी.

**वेर्णें**—नागवें व वेर्णें.

ह्या तालुक्याचा कसबा **मडगांव** उपनगर हें आहे. पूर्वी ह्या तालुक्यांत ६६ गांव होते व गांवांच्या ह्या संख्येवरूनच त्याला सासष्टी महाल हें नांव पडलें होतें. पण पोर्तुगीज सरकारनें सन १९१७ साली ह्या ६६ गांवांपैकीं १६ गांव निराळे काढून त्यांचा 'मुरगांव तालुका' ह्या नांवाचा एक स्वतंत्र तालुका बनविल्यामुळें राहिलेले ५० गांवच आतां सासष्टी तालुक्यांत गणले जातात.

धडा १४ वा

# मुरगांव तालुका

**सीमा व क्षेत्रफळ**—ह्या तालुक्याच्या उत्तरेस व पूर्वेस जुवारी नदी, दक्षिणेस आरबी समुद्र व साष्टी तालुका आणि पश्चिमेस आरबी समुद्र असून त्याचें क्षेत्रफळ २५॥ चौरस मैल आहे. गोव्यांतील एकंदर तालुक्यांत हा सर्वांत लहान आहे.

**लोकवस्ती व साक्षरता**—ह्या तालुक्याची एकंदर लोकवस्ती २०२५७ आहे. लोकवस्तीचें प्रमाण दर चौरस मैलास ७९४ रहिवासी इतकें पडतें. ह्या लोकवस्तींत १०७८८ पुरुष व ९४६९ स्त्रिया असून त्यांपैकीं २५२४ पुरुष व ९३० स्त्रिया साक्षर आहेत. साक्षरतेचें प्रमाण पुरुषांत २३॥, स्त्रियांत १० व एकंदरींत १७ पडतें.

ह्या तालुक्यांत खालीलप्रमाणें ५ फ्रेगेझी व १६ गांवें आहेत:—

**फ्रेगेझी** — **गांवें**

**चिखली**—चिखली, चिकोळण, दाबोली व सां ज्यासींतु वेट.

**कुठ्ठाळ**—कुठ्ठाळ, केळशी व सांखवाळ.

**सां तॉमॅ**—आरोसी, कांसावली व कुवेली.

**व्हाष्कु द गाम**—मुरगांव बंदर, व्हाष्कु द गाम व वाडें.

**वेळसांव**—इसर्शी, पाल व वेळसांव.

**व्हाष्कु द गाम** शहर हा ह्या तालुक्याचा कसबा आहे.

## मुरगांव शहर-सुधारणा-मंडळ

मुरगांव हें जगांतील उत्तमांपैकीं एक बंदर करतां येणें शक्य असल्याचें दिसून आल्यावरून पोर्तुगाल सरकारनें एका इंग्रजी कंपनीच्या

साह्यानें सन १८८१ सालापासून तेथें बोटी नांगरण्यास व त्यांतून माल भरण्या-उतरण्यास उपयुक्त होतील अशा सोई करण्यास प्रारंभ केला आणि तेथून रेल्वेचा एक फाटा काढून तो इंग्रजी हिंदुस्थानांतील रेल्वेस मिळविण्याचें काम सन १८८८ सालीं पुरेंही केलें. ह्यामुळें मुरगांव बंदरांतील रहदारी वाढूं लागली आणि तेथें एक चांगलें शहर निर्माण होण्याचा संभव दिसूं लागला. वरून पोर्तुगाल सरकारनें सन १९१७ च्या सप्टेंबरांत गोवा सरकारास फर्मावलें कीं, मुरगांव हा एक स्वतंत्र तालुका करावा आणि मुरगांव व व्हाक्कु द गाम मिळून 'व्हाक्कु द गाम' ह्या नांवानें एक चांगलें शहर वसवितां येईल ह्यासाठीं जमिनीचे विभाग पाडून त्यांत इमारती वगैरे बांधण्याकरितां अवश्य असेल ती व्यवस्था घडवून आणावी. सदर व्यवस्थेकरितां ५०००० रुपयांचें कर्ज उभारण्याची परवानगी आणि व्हाक्कु द गाम येथील जमिनीच्या मालकांकडून सरकार दाखवील त्या नमुन्याचीं घरें बांधून घेण्याचा व त्यांनीं न बांधल्यास सरकार कायद्यानुसार ठरवील त्या किंमतीस त्यांना आपल्या जमिनी विकण्यास लावण्याचा अधिकार पोर्तुगाल सरकारनें गोवा सरकारास दिला होता. त्यास अनुरून गोवा सरकारनें त्याच सालच्या डिसेंबरांत कर्ज उभारलें आणि जमीन-मोजणी खात्यानें भावी शहराचा नकाशा तयार करावा आणि इमारती, रस्ते, बगीचे वगैरे बांधण्याचें व पाणी, प्रकाश इत्यादि पुरविण्याचें काम बांधकाम खात्यानें करावें असें फर्मावलें. पण एकदोन वर्षांच्या अनुभवानें, हीं कामें बांधकाम खात्याकडून करून घेण्यापेक्षां 'मुरगांव बंदर व प.हि.पो.रेल्वे' ह्या तज्ज्ञ खात्याचा जो कामगार वर्ग तेथेंच असतो त्याच्याकडून करून घेणें सोइस्कर व स्वस्तही पडेल, असें वाटल्यावरून सन १९१९ सालच्या सप्टेंबरपासून करूं घातलेलीं नवीन कामें सरकारनें सदर तज्ज्ञ खात्याच्या हवालीं केलीं.

ह्याच समयास असें आढळून आलें कीं, शहरास साजतील अशीं कामें करून घेण्यास ५०००० रुपयांचें कर्जाऊ घेतलेलें भांडवल अपुरें

आहे आणि शहरसुधारणेसाठीं एक स्वतंत्र मंडळ असणें अधिक फायदे-शीर आहे. सबब १९१९ च्या नोव्हेंबरांत सरकारनें **'मुरगांव शहर-सुधारणा-मंडळ'** ह्या नांवानें खास गव्हर्नरांच्या देखरेखीखालीं काम करणारें एक स्वतंत्र मंडळ निर्माण केलें आणि आयातनिर्यात मालावर कांहीं जादा जकात बसवून तिचें व सरकारकडून विकल्या जाणाऱ्या किंवा भाड्यानें अगर खंडानें दिल्या जाणाऱ्या जमिनींचें उत्पन्न निराळें काढून तें त्याच्या स्वाधीन केलें. '**कुडचडें**' उपनगरांत करावयाच्या कामाची देखरेखही ह्याच मंडळाकडे सोंपवण्यांत आली. ह्याप्रमाणें शहर-सुधारणेसाठीं म्हणून जरी स्वतंत्र मंडळ नेमण्यांत आलें असलें तरी त्याच्या दिमतीखालील बहुतेक कामगार वर्ग मुरगांव बंदर व रेल्वे खातें आणि बांधकाम खात्याची मुरगांव येथील शाखा ह्यांतील कामगारांनींच बनलेला आहे.

शहर-सुधारणा-मंडळास, तें निर्माण करण्यांत आल्या वेळीं, सरकारनें जकातीचें जादा उत्पन्न तोडून दिलें खरें, पण ह्या तोडून देण्याच्या पद्धतीमुळें वसुलांत व जमाखर्चांत घोटाळे माजतात असें आढळून आलें. सबब १९२४ च्या जानेवारींत असें ठरलें कीं, सदर उत्पन्न सरकारनेंच वसूल करावें व त्याच्या मोबदला त्यानें स्वतःच्या तिजोरींतून मंडळाला दरसाल १॥ लक्ष रुपये द्यावे.

मंडळाची घटना एकदोन वेळां बदलण्यांत आली. सध्या त्यांत (१) मुरगांव बंदर व रेल्वे खात्याचे मुख्याधिकारी, (२) नाविक खात्याचे मुरगांव येथील प्रतिनिधि, (३) न्याय खात्यांतील सरकारी वकील, (४) आरोग्य खात्याचे प्रतिनिधि, (५) जमाबंदी खात्याचे मुरगांव शाखेचे वरिष्ठाधिकारी, (६) केपें मुनिसिपालिटीचे अध्यक्ष, (७) गोव्यांतील व्यापाऱ्यांचे एक प्रतिनिधि, (८) गोव्यांतील जमीनदार व शेतकरी ह्यांचे एक प्रतिनिधि आणि (९) मुरगांव तालुक्याचे **दोन** प्रतिनिधि असे १० सभासद असून मु. बं. व रेल्वे खात्याचे वरिष्ठाधिकारी हे त्याचे अध्यक्ष

आहेत. चारही प्रतिनिधींची नेमणूक दोनदोन वर्षांपुरती आहे.

म्हाप्कु द गाम व कुडचडें येथें नवे उद्योगधंदे उत्पन्न करावे व जुन्यांस साह्य देऊन त्यांची भरभराट करावी ह्यासाठीं सदर मंडळानें प्रतिवर्षी ४० हजार रुपयांपर्यंत रक्कम गुंतवावी अशी शिफारस सरकारनें त्याला केली आहे. मंडळाचें एकंदर वार्षिक उत्पन्न, सरकार देत असलेली १॥ लक्षाची रक्कम धरून, २॥। लक्ष रुपयांवर असून तितकाच त्याचा खर्च आहे.

---

खंड १५ वा

# पेडणें तालुका

**सीमा व क्षेत्रफळ**—ह्या तालुक्याच्या उत्तरेस तेरेखोलची नदी, दक्षिणेस तिळार किंवा कोलवाळची नदी, पूर्वेस सावंतवाडी संस्थान व पश्चिमेस आरबी समुद्र असून त्याचें क्षेत्रफळ ८७ चौरस मैल आहे.

**लोकवस्ती व साक्षरता**—ह्या तालुक्याची लोकवस्ती ३६३७८ असून तिचें प्रमाण दर चौरस मैलास ४१८ रहिवासी असें आहे. ह्या लोकवस्तींत १६८४९ पुरुष व १९५२९ स्त्रिया असून त्यांपैकीं १८६३ पुरुष व ३८० स्त्रिया साक्षर आहेत. साक्षरतेचें प्रमाण पुरुषांत ११, स्त्रियांत २ व एकंदरींत ६ आहे.

ह्या तालुक्यांत पुढील २१ फ्रेगेझी व २७ गांवें आहेत:—

**फ्रेगेझी** — **गांवें**

**आगरवाडा**—आगरवाडा व चोपडें.

**हळर्ण**—हळर्ण व कांसारवर्णें.

**आंबेडें**—आंबेडें व परसकडें.

**हरंबल**—हरंबल.

**पेडणें**—पेडणें.
**खाजनें**—खाजनें व वरकंड.
**चंदेल**—चंदेल व मोप.
**कोरगांव**—कोरगांव.
**धारगळ**—धारगळ.
**इब्रामपूर**—इब्रामपूर.
**मांद्रें**—मांद्रें.
**मोर्जी**—मोर्जी.
**वझरी**—वझरी व तुयें.
**पालयें**—पालयें.
**केरी**—केरी.
**पार्से**—पार्से.
**तांबोशें**—तांबोशें.
**तेरेखोल**—तेरेखोल.
**तोरशें**—तोरशें.
**उगें**—उगें.
**विर्नोडें**—विर्नोडें.
**पेडणें** गांव हा ह्या तालुक्याचा कसबा आहे.

---

### धडा १६ वा

## सांखळी तालुका

**सीमा व क्षेत्रफळ**—ह्या तालुक्याच्या उत्तरेस तिळार किंवा कोलवाळची नदी, दक्षिणेस मांडवी नदी, पूर्वेस सावंतवाडी संस्थान व सत्तरी तालुका आणि पश्चिमेस बारदेश तालुका असून त्याचें क्षेत्रफळ ८७ चौरस मैल आहे.

**लोकवस्ती व साक्षरता**—ह्या तालुक्याची लोकवस्ती २९७६५ असून तिचें प्रमाण दर चौरस मैलास ३४२ रहिवासी इतकें पडतें. ह्या लोकवस्तींत १४५६८ पुरुष व १५१९७ स्त्रिया असून त्यांपैकीं २४२७ पुरुष व ३७१ स्त्रिया साक्षर आहेत. साक्षरतेचें प्रमाण पुरुषांत १६॥, स्त्रियांत २॥ व एकंदरींत ९ इतकें पडतें.

ह्या तालुक्यांत पुढीलप्रमाणें १८ फ्रेगेझी व ३० गांवें आहेत:—

**फ्रेगेझी** **गांवें**

**आमोणें**—आमोणें व पिर्डी.

**हरवळें**—हरवळें व कावळिंगें.

**हातुर्ली**—हातुर्ली व मायंगिणी.

**वडें**—वडें व लामगांव.

**कारापूर**—कारापूर व सारवण.

**डिचोली**—डिचोली.

**सांखळी**—सांखळी.

**कोठंब**—कोठंब व सुर्ले.

**कुडणें**—कुडणें.

**लाटंबार्शें**—अडवलपाल व लाटंबार्शें.

**मयें**—मयें.

**मेणकुरें**—दुमाशें व मेणकुरें.

**नावेली**—नावेली.

**पिळगांव**—पिळगांव व नार्वे.

**साळें**—साळें.

**शिरगांव**—मुळगांव व शिरगांव.

**उसगांव**—गांजें व उसगांव.

**वेळगें**—पाल व वेळगें.

**सांखळी** हा ह्या तालुक्याचा कसबा आहे.

## धडा १७ वा

# सत्तरी तालुका

**सीमा व क्षेत्रफळ**—ह्या तालुक्याच्या उत्तरेस सावंतवाडी संस्थान व बेळगांव जिल्ह्यापैकीं जांबोटी, दक्षिणेस सांगें तालुका, पूर्वेस जांबोटी व पश्चिमेस सांखळी तालुका असून त्याचें क्षेत्रफळ १५७॥ चौरस मैल आहे.

**लोकवस्ती व साक्षरता**—सत्तरी तालुक्याची लोकवस्ती १७३१३ असून तिचें प्रमाण दर चौरस मैलास ११० रहिवासी इतकें पडतें. ह्या लोकवस्तीपैकीं पुरुषांची संख्या ८९७९ व स्त्रियांची संख्या ८३३४ असून ५३८ पुरुष व १३८ स्त्रिया साक्षर आहेत. साक्षरतेचें प्रमाण पुरुषांत ६, स्त्रियांत १॥ व एकंदरींत ४ पडतें.

ह्या तालुक्यांत पुढें दिल्याप्रमाणें ६ फ्रेगेझी व ८५ गांवें आहेत:—

**फ्रेगेझी** **गांवें**

**करंजोळ**—असोडें, करंजोळ, करंबळी बुद्रुक, कडवळ, पेंद्राल, सांवडें, शिरांगुळी व शिरसोडें.

**कोडाळ**—आंब्याची गवळ, कोडाळ, देरोडें, माळोली, नानोडें, सातोडें, सोनाळ, सुर्ले, उष्टें, वांगुर्ये, शेळप बुद्रुक व झाडाणी.

**कोठरें**—आंबेली, भिरोंडें, कणकिरें, कोठरें, दामोशें, गोवणें, गुळेली, मालपण, मेळावली, वांटें व शेळप खुर्द.

**होंड**—भुईपाल, कडयें, मोर्लें, होंड, पिसुर्लें, पणशें, पर्यें, पडेंश, सालेली, शिगोणें, सोनूज व वागर्यें.

**केरी**—हणजुणें, चोरावडें, कुडचिरें, गवळुली, गोंटेली, गुळुलें, इवरें बुद्रुक, इवरें खुर्द, वन, मावळिंगें, पणसुली, केळावडें, केरी, रावण व शिरोली.

**वाळपई**--अडवई, आंवेडें, असोलें, बोंवेडें, बखळ, कर्मळी-ब्रह्मा, कडकी, कुडणें, कुमारखंड, खोंपर्डें, धावें, धावें, हेदोडें, मासोर्डें, माऊस, नागवें, नानेली, नानूज, नगरगांव, पाल, रिवें, सांवर्शे, सातोडें, ठाणें, वेळगें, वेळूज व झर्मे.

**वाळपई** हा ह्या तालुक्याचा कसबा आहे.

---

## धडा १८ वा

# फोंडें तालुका

**सीमा व क्षेत्रफळ**—ह्या तालुक्याच्या उत्तरेस मांडवी नदी, दक्षिणेस जुवारी नदी व केंपें तालुका, पूर्वेस मांडवी नदीचा खांडेपारची नदी हें नांव असलेला भाग व सांगें तालुका आणि पश्चिमेस मडकईची व जुवारी ह्या नद्या आहेत. क्षेत्रफळ ९१ चौरस मैल आहे.

**लोकवस्ती व साक्षरता**—तालुक्याची एकंदर लोकवस्ती ४७३९५ असून तिचें प्रमाण दर चौरस मैलास ५२१ रहिवासी असें आहे. तिच्यापैकीं पुरुष २३८४५ व स्त्रिया २३५५० असून २७१२ पुरुष व ५६० स्त्रिया साक्षर आहेत. साक्षरतेचें प्रमाण पुरुषांत ११, स्त्रियांत २ व एकंदरींत ७ आहे.

ह्या तालुक्यांत पुढीलप्रमाणें १७ फ्रेगेझी व २८ गांवें आहेतः—

**फ्रेगेजी** **गांवें**

**बांदोडें**--बांदोडें.

**बोरी**—बोरी.

**बेतकी**—बेतकी व खांडोळें.

**खांडेपार**—खांडेपार व कोडार.
**कोनशें**—कोनशें व निरंकाल.
**कुंडई**—कुंडई व भोम.
**कुर्टी**—कुर्टी व वेतोडें.
**मडकई**—मडकई.
**वरगांव**—वरगांव, तिवरें व हडकोळण.
**पंचवाडी**—पंचवाडी.
**प्रियोळ**—प्रियोळ.
**केरी**—केरी व कुंकळयें.
**शिरोडें**—शिरोडें.
**कवळें**—कवळें.
**तळावली**—तळावली व वाडी.
**वेलिंग**—वेलिंग.
**वेरें**—वेरें, वळवई व वागुर्वे.
**फोंडें** हा त्या तालुक्याचा कसबा आहे.

---

### धडा १९ वा

# सांगें तालुका

**सीमा व क्षेत्रफळ**—त्या तालुक्याच्या उत्तरेस सांखळी व सत्तरी हे तालुके, दक्षिणेस काणकोण तालुका, पूर्वेस कारवार जिल्ह्यापैकी सुपें व पश्चिमेस फोंडें व केपें हे तालुके असून त्याचें क्षेत्रफळ २९३ चौरस मैल आहे. गोव्यांतील इतर सर्व तालुक्यांपेक्षां हा तालुका क्षेत्रफळानें मोठा आहे.

**लोकवस्ती व साक्षरता**—ह्या तालुक्याची एकंदर लोकवस्ती १९६९६ असून तिचें प्रमाण दर चौरस मैलास ६७ रहिवासी असें पडतें. ह्या लोकवस्तींत १०३५७ पुरुष व ९३३९ स्त्रिया असून त्यांपैकीं ९८९ पुरुष व ३३१ स्त्रिया साक्षर आहेत. साक्षरतेचें प्रमाण पुरुषांत ९॥, स्त्रियांत ३॥ व एकंदरींत ६॥ आहे.

ह्या तालुक्यांत खालीलप्रमाणें १० फ्रेगेझी व ५४ गांवें आहेतः—

**फ्रेगेझी** गांवें

**भाटी**—नायकिणी, डोंगर, शिगोणें, भाटी, विळयेण व कुंभारी.

**कालें**—दुधाळ, मावळिंगें, कालें, ओडशेल, डोंगर्ली व भोम.

**कुर्डी**—कुर्डी व कुर्पे.

**धारवांदोडें**—धारबांदोडें व पाल्यें.

**मळें**—मळें, करंजोळ, सोनावळी, कुळें, सांगोद व शिगांव.

**नेतुर्ली**—नेतुर्ली, विचुंद्रें, ज्याकिनुलें, वेर्लें, साळगिणें, तुडव, कुणगें व विळयें.

**किर्लपाल**—वांडोळ, कोडली, कामरखंड, मैसाळ, कर्मणें, सांतोन, रुमडें, कणगिणी व सांवर्डें.

**रिवण**—रिवण व कोळंब.

**सांकोर्डें**—सांकोर्डें, आगलोट व सुर्ल.

**सांगें**—कोटार्ली, शेळपें, स्वाळावली, उगें, पाटयें, पांचोडें किंवा पत्रें, तुळसथड, कष्टी, मुगुळी व कौंप्रय.

**सांगें** गांव हा ह्या तालुक्याचा कसबा आहे.

## धडा २० वा

# केपें तालुका

**सीमा व क्षेत्रफळ**—ह्या तालुक्याच्या उत्तरेस सासष्टी, फोंडें व सांगें हे तालुके, दक्षिणेस काणकोण तालुका, पूर्वेस सांगें तालुका आणि पश्चिमेस सासष्टी तालुका व आरबी समुद्र असून त्याचें क्षेत्रफळ १२४॥ चौरस मैल आहे.

**लोकवस्ती व साक्षरता**—ह्या तालुक्याची लोकवस्ती २१२०९ असून तिचें प्रमाण दर चौरस मैलास १७० रहिवासी इतकें पडतें. ह्या लोकवस्तींत पुरुष १०७१३ व स्त्रिया १०४९६ असून त्यांपैकीं ११६१ पुरुष व २८६ स्त्रिया साक्षर आहेत. साक्षरतेचें प्रमाण पुरुषांत ११ व स्त्रियांत ३ असून एकंदरींत ७ येतें.

केपें तालुक्यांत पुढीलप्रमाणें १५ फ्रेगेझी व ४२ गांवें आहेत:—

**फ्रेगेझी** **गांवें.**

**आमोणें**—आमोणें व शिरवई.

**आराळी**—आराळी, दाबें, नाकेरी, किटोळ व वागुबें.

**असोळडें**—असोळडें.

**अवेडें**—अवेडें.

**बाळ्ळी**—बाळ्ळी, अडणें, बेंदोर्डें, कोर्डें, फातर्पें व मोरपिलें.

**बार्सें**—बार्सें, पाईी, केडें व निलवंटळी.

**काकोडें**—काकोडें.

**कोठंबी**—कोठंबी व चायफी.

**कुस्मण**—कुस्मण.

**कुडचडें**—कुडचडें.

**माईण-सुळकण**—कांवरें, कोलें, काजूर-गोकळडें, माईण-
-मांगाळ, पिर्लें, क्रिस्कण व सुळकण.

**मळकर्णें**—मळकपण, मळकर्णें, नागवी, उंडर्न व जानोडें.

**होडर**—चिक-शेळवण, होडर व शेळवण.

**केपें**—आंवोलें व केपें.

**शेळडें**—शेळडें.

**केपें** हा ह्या तालुक्याचा कसवा आहे. ह्या तालुक्यांतील **कुडचडें** गांवांत वंदर व रेल्वेस्टेशन असल्यामुळें तेथील व्यापार व लोकवस्ती हीं वाढत चालली आहेत. ह्यासाठीं सन १९२२ सालीं सरकारनें त्याला 'उपनगर' नांव देऊन तेथें त्याला साजतील अशा सोई निर्माण करण्याचा बेत केला आहे.

---

## धडा २१ वा

# काणकोण तालुका

**सीमा** व **क्षेत्रफळ**—ह्या तालुक्याच्या उत्तरेस केपें व सांगें हे तालुके, दक्षिणेस आरबी समुद्र व कारवार जिल्हा, पूर्वेस सुपें व कारवार हे जिल्हे आणि पश्चिमेस आरबी समुद्र आहे. क्षेत्रफळ १२५ चौरस मैल आहे.

**लोकवस्ती** व **साक्षरता**—ह्या तालुक्याची लोकवस्ती १९४५१ असून तिचें प्रमाण दर चौरस मैलास १५६ रहिवासी इतकें आहे. ह्या लोकवस्तीपैकीं पुरुष ९७८९ व स्त्रिया ९६६२ असून ११५३ पुरुष व ३२० स्त्रिया साक्षर आहेत. साक्षरतेचें प्रमाण पुरुषांत १२, स्त्रियांत ३ व एकंदरीत ७॥ असें पडतें.

ह्या तालुक्यांत पुढें दिल्याप्रमाणें ६ फ्रेगेझी व ११ गांवें आहेत:-

**फ्रेगेझी** **गांवें**

**आंजेदीव**—आंजेदीव.

**काणकोण**—काणकोण व नगर्से-पालोलें.
**खोल**—खोल, आगोंद, मळोरें व शिरोटी.
**खोतीगांव**—खोतीगांव व गांवडोंगॅर.
**लोलयें**--लोलयें-पोळें.
**पैंगिणी**--पैंगिणी.

**काणकोण** गांवाचा **चावडी** हा भाग ह्या तालुक्याचा कसबा आहे.

---

### धडा २२ वा

# दमण जिल्हा

## दमण तालुका

**सीमा व क्षेत्रफळ**—ह्या तालुक्याच्या उत्तरेस व पूर्वेस सुरत जिल्हा, दक्षिणेस ठाणें जिल्हा व पश्चिमेस हिंदी महासागर असून त्याचें क्षेत्रफळ २०॥ चौरस मैल आहे.

**लोकवस्ती व साक्षरता**—दमण तालुक्याची लोकवस्ती १७५६६ असून तिचें प्रमाण दर चौरस मैलास ८५७ रहिवाशी असें येतें. ह्या लोकवस्तीपैकीं पुरुषांची संख्या ८४७७ व स्त्रियांची संख्या ९०८९ असून ११८४ पुरुष व ४८९ स्त्रिया साक्षर आहेत. साक्षरतेचें प्रमाण पुरुषांत १३॥, स्त्रियांत ५ व एकंदरींत ९ पडतें.

ह्या तालुक्यांत २ फ्रेगेझी असून **दमण** शहर हा त्याचा कसबा आहे.

## नगर हवेली तालुका

**सीमा व क्षेत्रफळ**—ह्या तालुक्याच्या उत्तरेस सुरत जिल्हा, दक्षिणेस व पूर्वेस धरमपूर संस्थान व पश्चिमेस ठाणें जिल्हा असून त्याचें क्षेत्रफळ १०४ चौरस मैल आहे.

**लोकवस्ती व साक्षरता**—ह्या तालुक्याची लोकवस्ती ३१०४८ असून तिचें प्रमाण दर चौरस मैलास २९८ रहिवासी इतकें येतें. ह्या लोकवस्तींत पुरुष १६००८ व स्त्रिया १५०४० असून त्यांपैकीं ५७७ पुरुष व १०९ स्त्रिया साक्षर आहेत. साक्षरतेचें प्रमाण पुरुषांत ३॥, स्त्रियांत ·॥· व एकंदरींत २ आहे.

ह्या तालुक्यांत १० फ्रेगेझी असून **सिल्व्हासा** हा त्याचा कसबा आहे.

## दमण जिल्ह्याची खानेसुमारी

**लोकवस्ती व साक्षरता**—ह्या जिल्ह्याची एकंदर लोकवस्ती ४८६१४ असून तिचें प्रमाण दर चौरस मैलास ३८९ रहिवासी इतकें पडतें. ह्या लोकवस्तीपैकीं पुरुष २४४८५ व स्त्रिया २४१२९ असून १७२१ पुरुष व ५९८ स्त्रिया साक्षर आहेत. साक्षरतेचें प्रमाण पुरुषांत ७, स्त्रियांत २॥ व एकंदरींत ५ येतें.

**धर्म**--दमण जिल्ह्याच्या लोकवस्तीपैकीं १७५१ कॅथोलिक पंथी ख्रिस्ती, ४३३८५ हिंदु, ३११२ मुसलमान, २९३ पारशी, ७० जैन व ३ कोणताही धर्म नसलेले लोक आहेत.

**वय**--दमणच्या एकंदर ४८६१४ लोकवस्तीपैकीं ११२०६ पुरुष व १०४१३ स्त्रिया मिळून २१६१९ लोक पंधरा वर्षांखालील वयाचे, १०५६२ पुरुष व १०९९७ स्त्रिया मिळून २१५५९ लोक सोळा ते एकुणपन्नास वर्षे वयाचे आणि २७१७ पुरुष व २७१९ स्त्रिया मिळून ५४३६ लोक एकुणपन्नास वर्षावरील वयाचे आहेत.

**वैवाहिक स्थिति**—ह्या लोकवस्तीपैकीं १३०८८ पुरुष व १०५८९ स्त्रिया मिळून २३६७७ लोक अविवाहित, १०१४८ पुरुष व ११००९ स्त्रिया मिळून २११५७ लोक विवाहित, १२४५ विधुर, २५२२ विधवा आणि ३ काडीमोड केलेल्या स्त्रिया आहेत. ४ पुरुष व ६ स्त्रिया ह्यांची वैवाहिक स्थिति समजलेली नाही.

**जनन-मरण**—दमण जिल्ह्यांत **सन १९२७** सालीं ख्रिश्चनांत ३१ मुलगे व ३५ मुली मिळून ६६, व ख्रिश्चनेतरांत ७२७ मुलगे व ६८७ मुली मिळून १४१४ **जन्म** झाले; आणि ख्रिश्चनांत २० पुरुष व ७ स्त्रिया मिळून २७, व ख्रिश्चनेतरांत ५३१ पुरुष व ५११ स्त्रिया मिळून १०४२ **मृत्यु** झाले.

---

## धडा २३ वा

# दीव जिल्हा

ह्या जिल्ह्यांत '**दीव**' हा एकच तालुका आहे. ह्याच्या सीमा, क्षेत्रफळ, राजधानी वगैरे माहिती ३ ऱ्या धड्यांत दिलेली आहे. ह्या तालुक्यांत ६ फ्रेगेझी आहेत.

**लोकवस्ती व साक्षरता**—दीवची लोकवस्ती १३८४४ असून तिचें प्रमाण दर चौरस मैलास १०६५ रहिवासी इतकें आहे. ह्या लोकवस्तीपैकीं पुरुषांची संख्या ६१८२ व स्त्रियांची संख्या ७६६२ असून ८८९ पुरुष व २६१ स्त्रिया साक्षर आहेत. साक्षरतेचें प्रमाण पुरुषांत १४, स्त्रियांत ३ व एकंदरींत ८ असें आहे.

**धर्म**—वरील एकंदर लोकवस्तीपैकीं २२८ लोक कॅथोलिक पंथी ख्रिस्ती, १२५७९ लोक हिंदु, ८२१ मुसलमान, ७४ पारशी आणि १४२ जैन आहेत.

**वय**—दीवच्या एकंदर लोकवस्तीपैकीं ३१६६ पुरुष व ३३३० स्त्रिया मिळून ६४९६ लोक पंधरा वर्षांखालील वयाचे, २३८३ पुरुष व ३४७३ स्त्रिया मिळून ५८५६ लोक सोळा ते एकुणपन्नास वर्षे वयाचे आणि ६३० पुरुष व ८५७ स्त्रिया मिळून १४८७ लोक एकुणपन्नास वर्षांवरील वयाचे आहेत. ३ पुरुष व २ स्त्रिया ह्यांचें वय समजलेलें नाहीं.

**वैवाहिक स्थिति**—दीवच्या लोकवस्तीपैकी ३६०२ पुरुष व ३३१२ स्त्रिया मिळून ६९१४ लोक अविवाहित, २३१० पुरुष व ३०७० स्त्रिया मिळून ५३८० लोक विवाहित, २७० विधुर, १२७८ विधवा व २ काडीमोड केलेल्या स्त्रिया आहेत.

**जनन-मरण**—दीवमध्यें सन **१९२७** साली ख्रिश्चनांत ४ मुलगे व २ मुली मिळून ६, व ख्रिश्चनेतरांत ४४५ मुलगे व ४२४ मुली मिळून ८६९ **जन्म** झाले; आणि ख्रिश्चनांत २ मुलगे व ३ मुली मिळून ५, व ख्रिश्चनेतरांत २१० मुलगे व १९२ मुली मिळून ४०२ **मृत्यु** झाले.

---

## धडा २४ वा

# नोंदणी खातें

देशांत जे जन्म, मृत्यु, विवाह, घटस्फोट व दत्तविधि होतात ते त्यांच्याशीं संबंध येणाऱ्या नागरिकांनीं सरकारांत नोंदलेच पाहिजेत, असा कायदा आहे. ह्या संस्कारांची नोंद राखण्यासाठीं मुलकी व्यवस्था खात्यांत एक खास पोटखातें ठेवलेलें आहे. त्याला 'कॉसॅर्व्हातॉर्यु जराल दु रेजीश्तु सिव्हील' असें नांव आहे. आपण त्याला 'नोंदणीची मुख्य कचेरी' असें म्हणूं. ह्या मुख्य कचेरीच्या देखरेखीखालीं नवीन गोवें, म्हापसें, मडगांव, दमण व दीव ह्या कसब्यांत एकेक 'दुय्यम कचेरी' ठेवलेली आहे. तिला 'कॉसर्व्हातॉर्यु दु रेजीश्तु सिव्हील' असें म्हणतात. पहिलीच्या क्षेत्रांत तिसवाडी व फोंडें; दुसरीच्या क्षेत्रांत बारदेश, पेडणें, सांखळी व सत्तरी; तिसरीच्या क्षेत्रांत सासष्टी, मुरगांव, केपें, सांगें व काणकोण; चौथीच्या क्षेत्रांत दमण व नगर हवेली आणि पांचवीच्या क्षेत्रांत दीव ह्याप्रमाणें तालुके समाविष्ट होत असतात. ह्या कचेऱ्यांच्या देखरेखीखालीं,

वरील पांच कसबे वगळून उरणाऱ्या इतर ९ कमव्यांत एकेक 'तिघ्यम कचेरी' आहे. तिला 'रॅपार्तिसांव दु रेजीश्तु सिव्हील' असें नांव दिलें आहे. दुय्यम किंवा तिय्यम कचेऱ्या ह्यांच्या देखरेखीखालीं कांहीं फ्रेगेझींत एकेक 'पोटकचेरी' ठेवलेली आहे तिला 'पोश्तु दु रेजीश्तु सिव्हील' असें म्हणतात.

मुलकी व्यवस्था खात्याचा मुख्याधिकारी हाच नोंदणीच्या मुख्य कचेरीचा अधिकारी असतो. त्या नात्यानें त्याला 'कॉसॅव्हांदोर जराळ' म्हणतात. दुय्यम कचेऱ्यांचे अधिकारी हे पोर्तुगालांतील कायद्याचें वरिष्ठ शिक्षण घेतलेले म्हणजे बाशारॅल झालेले किंवा तत्सम असावे लागतात. त्यांना 'कॉसॅव्हांदोर' असें म्हणतात. तिय्यम कचेऱ्यांचे अधिकारी नवीन गोव्याच्या लिसेव सेंत्रालांतील ७ इयत्तांचें म्हणजे दुय्यम शिक्षण पूर्ण केलेले असावे लागतात.त्यांना 'ओफिसियाल' असें नांव आहे. पोटकचेऱ्यांचे अधिकारी प्राथमिक शिक्षण पुरें केलेले असले तरी चालतात. त्यांना 'आश्युदान्त' असें म्हणतात. कॉसॅव्हांदोर जरालशिवाय बाकी सर्व अधिकाऱ्यांच्या नेमणुका गॉव्हॅर्नादोर जराल करीत असतो.

सत्तरी तालुक्यांतील पोटकचेऱ्या तेथील 'शॅफिश् द सिर्कुंष्किसांव' आणि सांगें व काणकोण तालुक्यांतील पोटकचेऱ्या तेथील रेजेदोर ह्यांच्याकडे सोंपवलेल्या आहेत.

वर सांगितलेल्या संस्कारांची जी वर्दी द्यावयाची असते ती, देणाऱ्याचा गांव ज्या कचेरीच्या क्षेत्रांत येत असेल त्या दुय्यम, तिय्यम किंवा पोटकचेरींत द्यावी लागते. मृत्यूची वर्दी नोंदणीकचेरींत न देतां तिच्या क्षेत्रांत अंतर्भूत होणाऱ्या फ्रेगेझीच्या रेजेदोराकडेही दिल्यास चालते. वर्दी देतांना कांहीं पत्रकें भरून द्यावी लागतात व साक्षीदारही दाखवावे लागतात. जन्माची नोंद तो झाल्यापासून ३० दिवसांच्या आंत, मृत्यूची नोंद तो घडल्यानंतर लगेच आणि लग्न व दत्तविधान ह्यांची नोंद तीं होण्यापूर्वीं करावी लागते.

सत्तरी, सांगें, काणकोण व नगर हवेली ह्या महालांत जन्माच्या नोंदीस ४ आणे, मृत्यूच्या नोंदीस २ आणे व विवाहाच्या नोंदीस २॥ रु. ह्याप्रमाणें वेतन द्यावें लागतें. शिवाय सरकारी स्टँपांचे पैसे द्यावे लागतात. इतर महालांत जन्माच्या नोंदीस ८ व मृत्यूच्या नोंदीस ४ आणे द्यावे लागतात आणि विवाहाच्या नोंदीस जरी २- रुपये द्यावे लागले तरी पुरावे दाखवण्याचा व इतर खर्च वधूवरांस करावा लागतो. वरदक्षिणेच्या रकमेप्रमाणें ही फी अधिक द्यावी लागते. संस्कार नोंदल्याबद्दल व फी दिल्याबद्दल नोंदणी-कामगाराकडून पावती मिळत असते.

गोव्यांतील कोणत्या महालांत कसकशा नोंदणी-कचेऱ्या आहेत, तें पुढील तक्त्यांत दिलें आहे.

| कँसॅल्हार्तॉयु | रॅपार्तिसांव | पोस्तु | सामावणाऱ्या फ्रेगेझी |
|---|---|---|---|
| **नवीन गोवें** | — | — | मेर्से, पणजी, रायबंदर, सांत क्रूझ, सां पेद्रु व ताळगांव. |
| | | **जुनें गोवें** | आघशी, भाटी, नेवरें, जुनें गोवें व मंडूर. |
| | | **सां ब्राज** | सांत इस्तॅव्हांव, सां ब्राज व करंबळी. |
| | | **पियॅदाद** | सां मातीयश्, सां बार्तॉलॉमेव व ग्रास. |
| | **फोंडें** | — | कुर्टी, वांदोडें, कवळें, तळावली, बोरी व कोनशें. |
| | | **प्रियोळ** | केरी, प्रियोळ, कुंडई, वेलिंग, खांडेपार व मडकई. |
| | | **शिरोडें** | शिरोडें व पंचवाडी. |
| | | **वरगांव** | वेतकी, वरगांव व वेरें. |

| कॉसॅल्होतॉर्यु | रॅपार्तिसांव | पोस्तु | सामावणाऱ्या फ्रेगेझी |
|---|---|---|---|
| म्हापसें | — | — | म्हापसें, पार्रा, गिरें, उसकई व आसगांव. |
| | | थिवीं | थिवीं, अस्नोडें, कोलवाळ व रेवोडें. |
| | | कळंगूट | साळगांव, कळंगूट, कांदोळी व नागवें. |
| | | हळदोणें | हळदोणें, मइडें व नाचनोडें. |
| | | शिवोली | ओडशेल, शिवोली व हणजूण. |
| | | रैंजमाग | नेरूळ, रैंजमाग व पिळर्ण. |
| | | विठ्ठोण | पोंबुर्पे, सोकोरें, विठ्ठोण व एकोशी. |
| | पेडणें | — | कोरगांव, पेडणें, खाजनें, आंबेडें, उगें; तोर्शे, विर्नोडें व तांबोशें. |
| | | मोर्जी | आगरवाडा, मोर्जी व मांद्रें. |
| | | धारगळ | धारगळ, पार्से व वझरी. |
| | | हरंबल | तेरेखोल, केरी, पालयें व हरंबल. |
| | | हळर्ण | चंदेल, इब्रामपूर व हळर्ण. |
| | सांखळी | — | सांखळी, हरवळें, आमोणें, कुडणें व कारापूर. |
| | | डिचोली | शिरगांव, मयें, वडें, डिचोली, हातुर्ली व पिळगांव. |
| | | कोठंब | उसगांव, नावेली, वेळगें व कोठंब. |
| | | लाटंबार्शे | साळें, मेणकुरें व लाटंबार्शे. |

| कॉंसेल्होतीं | रॅपार्तिसांव | पोस्तु | सामावणाऱ्या फ्रेगेझी |
|---|---|---|---|
| | वाळपई | — | वाळपई. |
| | | करंजोळ | करंजोळ. |
| | | कोडाळ | कोडाळ. |
| | | खोतोडें | खोतोडें. |
| | | होंड | होंड. |
| | | केळावडें | केळावडें. |
| मडगांव | — | — | बाणावली, सुरावली, मडगांव व नावेली. |
| | | कोलवें | कोलवें. |
| | | असोळणें | असोळणें व वेळ्ळी. |
| | | कुंकळ्ळी | कुंकळ्ळी. |
| | | कुडतरी | नेसाय, कुडतरी व माखजन. |
| | | चांदर | चांदर. |
| | | माजोर्डें | माजोर्डें, वेताळभाटी व नुवें. |
| | | चिंचोणें | चिंचोणें. |
| | | राय | लोटली, रायतूर व राय. |
| | | वेर्णें | वेर्णें व (मुरगांव तालुक्यापैकीं) कुठ्ठाळ. |
| | | ओडली | वार्कें, ओडली व कर्मणें. |
| | व्हास्कु द गाम | — | व्हास्कु द गाम, चिखली व सांखवाळ. |
| | | कांसावली | कांसावली व वेळसांव. |
| | सांगें | — | सांगें, कुर्डी, रिवण व भाटी. |
| | | किर्लपाल | किर्लपाल व धारबांदोडें. |
| | | नेत्रावळी | नेत्रावळी. |

| कॉसॅल्होतॉयु | रॅगार्तिसांव | पोस्तु | सामावणाऱ्या फ्रेगेझी |
|---|---|---|---|
| | | कुळें | कालें, मोलें व सांकोर्डें. |
| | केपें | — | आमोणें, असोळडें, कोठंबी, कुस्मण, मळकर्णें, केपें, शेळडें व (सासष्टी तालुक्यापैकीं) पारोडें. |
| | | कुडचडें | काकोडें, होडर व कुडचडें. |
| | | वाळ्ळी | वाळ्ळी, माइण-सुळकण, आराळी व बार्शे. |
| | काणकोण | — | काणकोण. |
| | | लोलयें-पोळें | लोलयें-पोळें. |
| | | पैंगिणी | पैंगिणी. |
| | | खोल | खोल. |
| | | खोतीगांव | खोतीगांव. |
| | | आंजेदीव | आंजेदीव. |

---

## धडा २५ वा

# शिक्षण (पूर्वार्ध)

## सरकारी विद्यालयें

एकंदर शिक्षणाचे सामान्यतः चार वर्ग करण्यांत येतातः प्राथमिक, दुय्यम, उच्च किंवा वरिष्ठ आणि विशिष्ट किंवा स्वतंत्र. प्राथमिक शिक्षण घेतल्याशिवाय दुय्यम शिक्षण घेतां येत नाहीं आणि दुय्यम शिक्षण घेतल्याशिवाय उच्च शिक्षण घेतां येत नाहीं. विशिष्ट शिक्षणांत समाविष्ट

होणारे कांहीं वर्ग प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर शिकतां येतात आणि कांहीं वर्ग दुय्यम शिक्षण पुरें केल्यानंतरच शिकावे लागतात. अनेक विषयांच्या उच्च शिक्षणाची सोय करणाऱ्या संस्थेस 'विश्वविद्यालय' असें नांव असतें.

पोर्तुगीज हिंदुस्थान सरकारनें आपल्या प्रजेच्या शिक्षणासाठी नवीन गोवें येथें एक वैद्यक व शस्त्रक्रिया ह्यांचें शिक्षण देणारी आणि एक औषधें व रसायनें तयार करण्याचें शिक्षण देणारी अशा दोन उच्च शिक्षणाच्या पाठशाळा ठेवलेल्या आहेत. त्यांना पोर्तुगीज भाषेत अनुक्रमें **'इश्कॉल मॅदिकॉ-सिरूर्जिक'** आणि **'कूर्सु द फार्मासिय'** अशीं नांवें असून पहिलीचा अभ्यासक्रम ५ वर्षांचा व दुसरीचा ३ वर्षांचा आहे.

त्याचप्रमाणे नवीन गोवें येथेंच **'लिसेव सेंत्राल'** नांवाचें एक दुय्यम शिक्षणाचें विद्यालय ठेवलें असून त्याचा एकंदर अभ्यासक्रम ७ वर्षांचा आहे. ह्या अभ्यासक्रमाचे, पहिल्या ३ वर्षांचा एक, पुढच्या २ वर्षांचा एक आणि नंतरच्या २ वर्षांचा एक, असे तीन विभाग पाडलेले आहेत. विद्यार्थ्यांनीं परीक्षा द्यावयाची ती प्रत्येक वर्षी न देतां प्रत्येक विभागाच्या शेवटच्या वर्षी द्यावयाची असते. तिसऱ्या विभागाच्या म्हणजे सहाव्या-सातव्या वर्षाच्या विषयांचे दोन विभाग करण्यांत आले असून एकांत शास्त्रीय विषयांचा व दुसऱ्यांत वाङ्मयीन विषयांचा समावेश केलेला आहे. वैद्यकीय पाठशाळेंत किंवा औषधीय पाठशाळेंत शिक्षण घेण्यास जावयाचें असतां ह्या शास्त्रीय विषयांच्या विभागांत उत्तीर्ण व्हावें लागतें. आणि वकिलीची सनद मिळवावयाची असतां वाङ्मयीन विभागाचें शिक्षण पुरें करावें लागतें. लिसेवच्या अभ्यासक्रमाच्या पहिल्या विभागाचें म्हणजे पहिल्या तीन वर्षांचें शिक्षण देणारी एक पाठशाळा म्हापसें येथें व दुसरी मडगांव येथें ठेवण्यांत आली आहे. ह्या प्रत्येक पाठशाळेला **'लिसेव मुनिसिपाल'** असें नांव

आहे. ह्या पाठशाळांतून गणित, इतिहास-भूगोल, सृष्टिशास्त्र वगैरे विषय आणि पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रजी व लॅटिन ह्या भाषा शिकवण्यांत येत असतात. सर्व शिक्षण पोर्तुगीज भाषेंतून दिलें जातें.

नवीन गोव्याच्या लिसेव सेंत्रालांत **मराठी** व **संस्कृत** ह्या भाषांच्या शिक्षणाचे प्रत्येकीं दोनदोन वर्षांच्या अभ्यासक्रमाचे वर्ग आहेत. पण ते इतर विषयांप्रमाणें विद्यार्थ्यांस सक्तीनें शिकावे लागत नसून ऐच्छिक आहेत. त्याचप्रमाणें तेथें एका वर्षाच्या अभ्यासक्रमाचा **अर्थशास्त्र** ह्या विषयाचाही एक ऐच्छिक वर्ग आहे.

नवीन गोव्यें येथेंच प्राथमिक शिक्षक तयार करण्याची एक आणि रुग्णपरिचर्या म्हणजे रोग्यांची शुश्रूषा व सूतिकाशास्त्र म्हणजे सुईणपण किंवा बाळंतपण ह्यांचें शिक्षण देण्याची एकेक अशा तीन विशिष्ट शिक्षणाच्या शाळा आहेत. पहिलीला **'इश्कॉल नॉर्माल'**, दुसरीला **'कूर्सु द॑ एंफर्माजें'** व तिसरीला **'कूर्सु द॑ पार्तु'** अशीं नांवें आहेत. इश्कॉल नॉर्मालचा अभ्यासक्रम तीन वर्षांचा असून त्यांत प्रवेश करण्यासाठीं लिसेवच्या तिसऱ्या वर्षाचें शिक्षण तरी पुरें करावें लागतें किंवा पोर्तुगीज प्राथमिक शिक्षण पुरें करून स्वतंत्र प्रवेशपरीक्षा तरी द्यावी लागते. रुग्णपरिचर्या व सूतिकाशास्त्र ह्यांचे अभ्यासक्रम दोनदोन वर्षांचे असून ते पोर्तुगीज प्राथमिक शिक्षण पुरें केलेल्यांना शिकतां येतात. इश्कॉल नॉर्मालचें शिक्षण स्वतंत्र गृहांत दिलें जातें व रुग्णपरिचर्येचें आणि सूतिकाशास्त्राचें शिक्षण वैद्यकीय पाठशाळेंत दिलें जातें. ह्याशिवाय खास मुलींकरतां, लेखनवाचन, गणित व कशिदा शिकविण्याची एक स्वतंत्र शाळाही नवीन गोव्यें येथें ठेवण्यांत आली आहे. तिला **'इश्कॉल नासियॉनाल दु सॅक्सु फेमिनीनु'** असें नांव आहे.

संबंध पोर्तुगीज हिंदुस्थानांत मिळून ९३ **प्राथमिक पोर्तुगीज शाळा** असून त्यांची महालवार संख्या पुढीलप्रमाणें आहे:—

तिसवाडी १४, बारदेश २७, सासष्टी २५, मुरगांव ४, पेडणें ३, सांखळी ३, सत्तरी २, फोंडें ६, सांगें १, केपें ३, काणकोण १, दमण २, नगर हवेली १ व दीव १.

प्राथमिक शिक्षणाचे दोन भाग पाडून पहिल्याला प्रिमैर ग्राव व दुसऱ्याला सेगूंद ग्राव अशी नांवें दिलीं आहेत. प्रिमैर ग्रावचा अभ्यासक्रम ३–४ वर्षांचा आणि सेगूंद ग्रावचा १ वर्षाचा आहे. सर्व प्राथमिक शिक्षण पोर्तुगीज भाषेतून देण्यांत येत असतें.

शुद्ध मराठी प्राथमिक शाळा अशी सरकारनें एकही चालवलेली नाही. तथापि सांखळी तालुक्यांत २ आणि सत्तरी, फोंडें, सांगें, केपें व काणकोण ह्या तालुक्यांत प्रत्येकीं एक ह्याप्रमाणें एकंदर ७ **मराठी-पोर्तुगीज शाळा** सरकारनें ठेवल्या असून, दमण तालुक्यांत ३, नगर हवेलींत ४ व दीवांत ३ ह्याप्रमाणें १० **गुजराथी-पोर्तुगीज शाळा** तें चालवीत आहे.

ह्या सर्व प्राथमिक शाळांवर देखरेख करण्यासाठीं सरकारनें एक अधिकारी नेमलेला असतो त्याला 'इंस्पॅक्तोर' असें म्हणतात

ह्या एकंदर शाळांतून दर वर्षी सामान्यतः किती विद्यार्थी शिक्षण घेतात त्याची कल्पना येण्यासाठीं शेवटच्या दोनतीन वर्षांचे सरासरी आंकडे पुढें दिले आहेत:—वैद्यकीय पाठशाळेंत सुमारें १००, औषधीय पाठशाळेंत १०–१२, लिसेव सेंत्रालांत सुमारें ५५०, म्हापसेंच्या लिसेव मुनिसिपालांत सुमारें १२५, मडगांवच्या लिसेव मुनिसिपालांत सुमारें १७५, नॉर्मालांत सुमारें ३०, एकंदर पोर्तुगीज प्राथमिक शाळांत मिळून सुमारें ६५००, मराठी-पोर्तुगीज शाळांत सुमारें १००, गुजराथी-पोर्तुगीज शाळांत सुमारें १७५ आणि इस्कॉल नासियॉनाल दु सॅक्सु फेमिनीनुमध्यें सुमारें १०० विद्यार्थिनी ह्याप्रमाणें जवळजवळ ८ हजार विद्यार्थी सरकारी शाळांत शिक्षण घेत असतात. ह्या विद्यार्थ्यांपैकीं **हिंदु विद्यार्थ्यांची संख्या** पुढीलप्रमाणें

आहे:-वैद्यकीय पाठशाळा २५, औषधीय पाठशाळा ३, लिसेव सेंत्राल १७५, म्हापसेंचा लिसेव मुनिसिपाल ५०, मडगांवचा लिसेव मुनिसिपाल ६०, नॉर्माल १० व प्राथमिक पोर्तुगीज शाळा १२००. मराठी-पोर्तुगीज व गुजराथी-पोर्तुगीज शाळांतून शिकणारे विद्यार्थी बहुतेक सर्वच हिंदु आहेत. **विद्यार्थिनींची संख्या** पुढीलप्रमाणेः-वैद्यकीय पाठशाळा ३, औषधीय पाठशाळा २, लिसेव सेंत्राल ५०, म्हापसेंचा लिसेव मुनिसिपाल १०, मडगांवचा लिसेव मुनिसिपाल २५, नॉर्माल २० आणि प्राथमिक पोर्तुगीज शाळा २०००. उच्च व दुय्यम शिक्षण घेणारी एकही हिंदु किंवा मुसलमान विद्यार्थिनी नाही. मुसलमान विद्यार्थी एकाददुसराच आहे. पोर्तुगीज प्राथमिक शाळांत शिकणाऱ्या हिंदु विद्यार्थिनींची संख्याही ५-७ वर जात नाहीं. पणजीस खास मुलींकरतां काढलेली शाळा असली तरी, तींत पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्रजी भाषा शिकवतात पण मराठी शिकवीत नाहींत आणि कशिदा वगैरेंचें शिक्षण पोर्तुगीज भाषेंतून देतात, ह्यामुळें तेथेंही हिंदु विद्यार्थिनी जात नाहींत.

## शिक्षण-सल्लागार मण्डळ

चारही वर्गांच्या शिक्षणासंबंधीं विचार करणारें एक मंडळ आहे. त्याला **शिक्षण-सल्लागार मंडळ** (कोंसेल्यु दॅ इंस्त्रुसांव पूब्लिक) असें म्हणतात. त्याचे ६ अधिकारतः झालेले व ४ गॉव्हॅर्नादोर जॅराल ह्यांनीं नेमलेले असे १० सभासद आहेत. स्वतः गॉव्हॅर्नादोर जॅराल, मुलकी व्यवस्था खात्याचे मुख्याधिकारी, वैद्यकीय पाठशाळेचे मुख्याध्यापक, लिसेव सॅन्त्रालचे रैतोर म्हणजे मुख्याध्यापक, नॉर्मालचे मुख्याध्यापक आणि प्राथमिक शिक्षणाचे इंस्पॅक्तोर हे अधिकारतः सभासद असून गॉव्हॅर्नादोर जॅराल हे मंडळाचे अध्यक्ष व मुलकी व्यवस्थेचे मुख्याधिकारी हे उपाध्यक्ष आहेत. बाकी चार सभासदांच्या जागीं दर तीन तीन वर्षांनीं कोणा तरी विद्वान् नागरिकांची योजना करण्यांत येत असते.

शिक्षणविषयक नियमावली, शिक्षणावर खर्चावयाचा पैसा, शाळांची वाढ किंवा घट, शाळांतून शिकवावयाची पुस्तकें वगैरेंवर अभिप्राय देणें, शिक्षकांच्या जागांसाठीं उमेदवार असणाऱ्यांची वर्गवारी लावणें व त्यांच्या तक्रारींचा निर्णय करणें, शिक्षणाच्या प्रगतीसाठीं उपाय सुचवणें वगैरे कामें हें मंडळ करीत असतें. उच्च व दुय्यम विद्यालयांतील कायम शिक्षकांच्या नेमणुका पोर्तुगाल सरकार करीत असल्यानें सदर विद्यालयांतील हंगामी शिक्षकांच्या नेमणुकांवर तेवढें ह्या मंडळाचें मत घेतलें जातें.

---

## धडा २६ वा

# शिक्षण (उत्तरार्ध)

## खासगी विद्यालयें

गोमंतकांत लोकांनीं चालवलेलें उच्च किंवा विशिष्ट शिक्षणाचें एकही विद्यालय नाहीं. नाहीं म्हणावयास रायतूर येथें ख्रिस्ती धर्मोपदेशक व उपाध्ये तयार करणारी एक पाठशाळा ख्रिस्ती लोकांनीं सरकारच्या मदतीनें चालविली असून तींत तत्वज्ञान, ख्रिस्ती धर्म वगैरेंचें विशिष्ट आणि गणितभूगोलादि विषयांचें दुय्यम शिक्षण देण्यांत येत असतें. ह्या पाठशाळेला **सेमिनार्यु** असें नांव असून तिची एक लहानशी शाखाही म्हापसें येथें आहे. सेमिनारींत व तिच्या शाखेंत मिळून ८०० वर विद्यार्थी दर वर्षी शिक्षण घेत असतात.

लोकांनीं चालविलेली दुय्यम शिक्षणाची एकच पाठशाळा असून ती फोंडें येथें आहे. **'गोवा विद्याप्रसारक मंडळ'** नांवाच्या संस्थेनें ही पाठशाळा चालविली असून तिला **'आल्मेद कॉलेज'** असें नांव

४०६५

दिलें आहे. संस्थेचा चालक वर्ग हिंदूच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. कॉलेजांत लिसेवच्या तीन वर्षांचें आणि पोर्तुगीज व मराठी प्राथमिक शिक्षणही देण्यांत येत असतें. कॉलेजांत एकंदरींत सुमारें २०० विद्यार्थी शिकत असतात. ह्या संस्थेला फोंडें तालुक्याची म्युनिसिपालिटी ६०० रुपये व तेथील कांहीं देवस्थानें २५० रुपये वार्षिक मदत देत आहेत.

**लोकांनीं चालवलेल्या पोर्तुगीज प्राथमिक शाळा** सबंध गोव्यांत मिळून १० वर नाहींत व ज्या आहेत त्या बहुतेक सर्व सासष्टी तालुक्यांत होत. मात्र गोव्यांत जी ख्रिस्ती देवालयें म्हणजे 'इगर्जा' आहेत त्यांपैकीं बहुतेक सर्वांना जोडून एकेक गायनवादनाची शाळा असते व तींत रोमन लिपीचें लेखनवाचन शिकवण्यांत येतें.

पण गोमन्तकांत **लोकांनीं चालविलेल्या शुद्ध मराठी शाळा** १५० वर आहेत. त्यांत थोडेंफार कायम उत्पन्न असलेल्या आणि आज पुष्कळ वर्षांपासून अखंड व भरभराटींत चाललेल्या शाळा पुढीलप्रमाणें आहेतः—

पणजी येथें '**मुष्टिफंड संस्था**' चालवीत असलेल्या शाळा.

कुंभारजुवें येथील '**शारदा विद्यालय**'.

म्हापसें येथील '**सारस्वत विद्यालय**'.

म्हापसें येथें '**ज्ञानप्रसारक संघ**' चालवीत असलेल्या शाळा.

मडगांव येथें '**मठग्रामस्थ हिंदुसभा**' चालवीत असलेलें श्रीदामोदर विद्यालय व त्याच्या शाखा.

डिचोली येथें '**विद्यावर्धक मण्डळ**' चालवीत असलेली शाळा.

ह्या एकंदर शाळांत मिळून सुमारें ७००० हिंदु मुलें शिक्षण घेत असून त्यांपैकीं सुमारें २००० मुली आहेत. मराठी शिक्षण घेणाऱ्या मुसलमान विद्यार्थ्यांची संख्या सुमारें २५ असून ख्रिश्चन विद्यार्थी एकाददुसराच आहे.

लोकांनीं चालविलेल्या सुमारें २५-३० इंग्रजी शाळाही गोंव्यांत असून त्यांची जवळजवळ निम्मी संख्या बारदेश महालांत आहे. त्यांत पार्रा, हळदोणें, आसगांव, नागवें आणि मडगांव येथील शाळा बऱ्या चालल्या असून त्यांतील कांहींना मुंबई विश्वविद्यालयानें मान्यताही दिली आहे. सदर्न मराठा रेल्वेनेंही आपल्या कामदारांच्या मुलांसाठीं म्हणून व्हाष्कु द गाम येथें एक इंग्रजी शाळा ठेवलेली आहे. गोंव्यांत इंग्रजी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची एकंदर संख्या ३ पासून ४ हजारांपर्यंत आहे. इंग्रजी शिकणाऱ्या मुलींची संख्या मात्र शेंदोनशेंवर नाहीं. गोंव्यांतील इंग्रजी शाळेंत शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यानें आधीं पोर्तुगीज प्रिमैर ग्रावचें शिक्षण घेतलेंच पाहिजे असा कायदा आहे.

## नियतकालिकें

जगांत होणाऱ्या घडामोडींची माहिती मिळवून ती लोकांस व्यवस्थित पुरविण्यासाठीं आणि निरनिराळ्या विषयांची चर्चा करून लोकांचें ज्ञान वाढविण्यासाठीं जी पत्रें अगर पुस्तकें नियमित किंवा ठराविक कालांतरानें प्रसिद्ध करण्यांत येत असतात त्यांना **नियतकालिकें** असें म्हणतात. जीं नियतकालिकें दररोज प्रसिद्ध होत असतात त्यांना **दैनिकें**, आठवड्यांतून दोनदां निघत असतात त्यांना **अर्धसाप्ताहिकें**, आठवड्यांतून एकदां प्रसिद्ध होत असतात त्यांना **साप्ताहिकें**, जीं पंधरवड्यांतून एकदां निघत असतात त्यांना **पाक्षिकें**, जीं महिन्यांतून एकदां निघतात त्यांना **मासिकें**, आणि जीं दोन, तीन व सहा महिन्यांनीं निघतात त्यांना **द्वैमासिकें**, **त्रैमासिकें** व **षाण्मासिकें** असें म्हणतात. दैनिकें, अर्धसाप्ताहिकें, साप्ताहिकें व पाक्षिकें हीं बहुधा मोठ्या आकाराचीं व सुट्या पानांचीं असतात आणि मासिकें हीं लहान आकाराचीं व पुस्तकांप्रमाणें बांधणी केलेलीं असतात. पहिल्यांस समुच्चयानें वृत्तपत्रें व दुसऱ्यांस समुच्चयानें मासिक पुस्तकें अशा संज्ञा देतात.

गोव्यांत आजमितीस पोर्तुगीज भाषेंतून, ३ दैनिकें (पणजी येथें), ४ अर्धसाप्ताहिकें (२ पणजींत व २ मडगांवांत) व २ साप्ताहिकें (१ पणजी येथें व १ माजोर्डें येथें) अशीं ९ वृत्तपत्रें चालत आहेत. ह्यांपैकीं 'प्रकाश' नांवाचें पणजी येथें निघणारें अर्धसाप्ताहिक सोडून बाकी सारीं खिश्चनांनीं चालविलेलीं आहेत.

मराठी भाषेंतून 'हिंदु' नांवाचें एक साप्ताहिक मडगांव येथें निघत असून सांगें व रिवण येथें एकेक मासिकही निघत आहे.

मराठी व पोर्तुगीज ह्या उभय भाषांतून निघणारेंही 'भारत' नांवाचें एक पत्र असून तें केपें येथें निघत असतें.

ह्यांशिवाय, कायदेकानू आणि सरकारी नोकरांच्या नेमणुका, बदल्या वगैरे जाहीर करण्यासाठीं सरकारही एक पोर्तुगीज अर्धसाप्ताहिक राजधानीत प्रसिद्ध करीत असतें. त्याला **'बोलेतीं ओफिसियाल'** असें नांव आहे. हें पत्र छापण्यासाठीं आणि इतर छपाई करण्यासाठीं सरकारनें एक छापखाना चालविलेला असतो. त्याला **'इंप्रेंस नासियॉनाल'** असें म्हणतात.

दमण व दीव येथें कोणत्याही भाषेंत निघणारें नियतकालिक नाहीं.

## वाचनालयें

छापील आणि हस्तलेखित पुस्तकांचा संग्रह करून आणि त्याला नियतकालिकांची जोड देऊन तीं लोकांच्या उपयोगासाठीं जेथें ठेवण्यांत येत असतात, अशा गृहांना **वाचनालयें** म्हणतात.

पोर्तुगीज सरकारनें पणजी येथें असें एक वाचनालय ठेवलें आहे. त्याला **'बिब्लियोतॅक नासियॉनाल'** असें नांव आहे. पोर्तुगीज हिंदुस्थानांत प्रसिद्ध होणाऱ्या कोणत्याही नियतकालिकाची आणि पुस्तकाची एकेक प्रत ह्या सरकारी वाचनालयास आणि दुसरी एकेक प्रत सरकारी छापखान्यास पाठविण्यांत आलीच पाहिजे असा कायदा आहे. वाङ्मय, इतिहास व शास्त्रें ह्यांचा लोकांस व्यासंग करण्यास मिळावा

त्यासाठीं सरकारनें 'इंशितूतु व्हाष्कु द गाम' नांवाची एक संस्था काढली आहे. सरकारी वाचनालयाची व्यवस्था हल्लीं ह्याच संस्थेकडे सोंपवलेली आहे.

गोव्यांतील म्युनिसिपालिट्यांपैकीं फक्त बारदेशच्या म्युनिसिपालिटीनेंच काय तें एक वाचनालय चालू ठेवलें आहे.बाकी कांहीं म्युनिसिपालिट्यांनींही ह्या बाबतींत प्रयत्न केले आहेत,पण ते यशस्वी झालेले नाहींत.

गोव्यांतील प्रत्येक तालुक्याच्या कसब्याच्या ठिकाणीं आणि मोठ्या लोकवस्तीच्या इतर गांवांत मिळून केवळ लोकांनीं चालवलेलीं अशीं सुमारें ३०–३२ वाचनालयें आहेत. त्यांतील चारपांच खेरीज करून बाकीचीं सगळींच हिंदु लोकांनीं चालवलेलीं असून त्यांत मुख्य भरणा मराठी ग्रंथांचा आहे. तथापि त्यांत नियतकालिकें मात्र मराठी, पोर्तुगीज व इंग्रजीही ठेवलेलीं असतात.

त्यांपैकीं मडगांव येथील **'सारस्वत ब्राह्मण समाजा'चें वाचनालय,** पणजी येथील **श्रीसरस्वतीमंदिर** व **श्रीमहालक्ष्मी-प्रासादिक हिंदु वाचनमंदिर,** मडगांव येथील **श्रीदामोदर वाचनमंदिर,** असोळणें येथील **श्रीवेताळप्रासादिक ज्ञानमंदिर** वगैरेंचा ग्रंथसंग्रह, उलट्या अनुक्रमानें, २ पासून ६ हजारांपर्यंत आहे.

---

## धडा २७ वा

# ग्रामसंस्था

पडीत जमिनी लागवडीस आणाव्या व लागवडीस आलेल्या जमिनीच्या उत्पन्नाचा हिस्सा आपल्या वंशजांस परंपरेनें मिळत जावा ह्या हेतूनें हिंदुस्थानांतील लोकांनीं ज्या गांववार संस्था स्थापन केल्या त्यांना **ग्रामसंस्था** असें नांव आहे.हिंदुस्थानाखेरीज जगांत इतर कोठेंही

अशा संस्था आढळत नसून येथें त्या फार प्राचीन काळापासून अस्तित्वांत आहेत असें विद्वान् लोकांचें मत आहे.

दोन अगर अधिक लहानलहान गांवांतील लोकांनीं मिळून एकच ग्रामसंस्था एकत्र चालवावी असेंही घडत असे. अशा गांवांच्या गटास **तरफ** असें नांव असे व तें त्याला अद्याप लावतात.

प्रत्येक गांवाचें क्षेत्रफळ अर्थातच निरनिराळें होतें. पण त्यांची रचना सामान्यतः सर्वत्र एकसारखी होती. मखल व पाणवट जमिनी शेतीभातीस लायक होतील अशा रीतीनें कमावल्या, जवळपास एक गुरचरण राखून ठेवलें, एक देऊळ बांधलें आणि शेतीभातीस उपयुक्त होऊं न शकणाऱ्या उंचवट जमिनी रहिवाशांनीं आपसांत वांटून घेऊन तेथें बांबू, काजू, शाकभाजी वगैरेंची पेरणी केली व घरें बांधलीं म्हणजे गांव वसला.

प्रत्येक गांवांत निरनिराळे उद्योगधंदे करणारे लोक होते. तथापि सामान्यतः एक पाटील, एक कुळकर्णी, एक पुरोहित, एक शिक्षक, एक सुतार, एक लोहार, एक परीट, एक सोनार, एक वैद्य, एक न्हावी, एक चांभार व एक महार असे लोक प्रत्येक गांवांत अवश्य असत.

लागवडीस आणलेल्या व न आणलेल्याही जमिनींवर गांवांतील रहिवाशांची सामाईक मालकी होती. म्हणजे सर्व उत्पन्नावर सर्वांचा हक्क होता. वर जे धंदेवाले सांगितले त्यांनीं गांवांतील लोकांचें तें तें काम फुकट करावें व त्याबद्दल दर हंगामाच्या म्हणजे पिकाच्या वेळीं ठराविक धान्य व नारळादि इतर जिन्नस ग्रामसंस्थेच्या उत्पन्नांतून घेऊन जावें असा प्रघात होता. ग्रामसंस्थेचें कांहीं उत्पन्न देवालयांतील उत्सव इत्यादि कार्यांसाठीं देण्यांत येत असे. ग्रामसंस्थेच्या अगर देवस्थानाच्या कांहीं सेवेकऱ्यांस जमिनी वंशपरंपरेनें भोगण्यासाठीं देण्याचाही प्रघात होता. अशा जमिनीस **'नमस'** असें म्हणत व म्हणतात.

हिंदुस्थानांत हिंदु राजांचेंच राज्य होतें त्या वेळीं ते ह्या ग्रामसंस्थांच्या

अंतर्गत कारभारांत फारसा हात घालीत नसत. ग्रामसंस्थांनीं 'खुर्षीव्रत' नांवाचा ठराविक कर सरकारी खजिन्यांत दर वर्षी भरला म्हणजे आपल्या जमिनी वसविण्यासाठीं कुळांना देणें, त्यांचे हिशेबठिशेव राखण्यासाठीं कामदार नेमणें, खर्चवेंच काढून उरणारें उत्पन्न ग्रामस्थांस किंवा गांवकारांस वांटून देणें वगैरे कामें करण्यास ग्रामसंस्था पूर्णपणें स्वतंत्र होत्या. ह्यामुळें त्यांना 'छोटीं लोकसत्ताक राज्यें' असें आज कौतुकानें म्हणतात. पुढें हिंदुस्थानावर मुसलमान लोकांनीं राज्यें केलीं, त्या वेळींही ह्या संस्थांना फारसा धोका आला नाहीं. पण नंतर जेव्हां युरोपियन लोकांनीं हिंदुस्थान काबीज केलें, तेव्हां ह्या संस्था जवळजवळ संपुष्टांत आल्या. ब्रिटिश लोकांनीं तर आपल्या ताब्यांत आलेल्या हिंदुस्थानच्या भागांतील ग्रामसंस्था अजीबात नष्ट करून टाकल्या.

आपल्या पोर्तुगीज राज्यकर्त्यांनीं ह्या संस्था मरूं नयेत ह्याबद्दल बरीच काळजी घेतली. तथापि त्यांचें लोकसत्ताक स्वरूप हळूहळू नष्ट करून आज त्यांनीं त्यांना जवळजवळ सरकारतंत्र संस्था करून टाकलें आहे. पोर्तुगीज भाषेंत ह्या संस्थेला 'कोमुनिदाद आग्रीकुल' असा शब्द योजतात.

संस्थेच्या उत्पन्नाचे मालक पूर्वीपासून आजतागायत दोन वर्गांचे आहेत. एका वर्गांतील मालकांना 'जणकार' असें नांव असून दुसऱ्या वर्गांतील मालकांना 'भागीदार' व पोर्तुगीज भाषेंत 'आक्सियोनीस्त' असें नांव आहे. ग्रामसंस्था स्थापन करण्याच्या कामीं ज्या माणसांनीं भाग घेतला त्यांचे औरस किंवा दत्तक पुरुष वंशज, त्याच्या वंशांतील विधवा व अविवाहित मुली हीं 'जणकार' होत आणि ग्रामसंस्थांना भांडवलासाठीं ज्यांनीं पैसे अगर उपकरणें दिलीं ते भागीदार किंवा आक्सियोनीस्त होत.

प्रत्येक गांवांत कोणकोणते धंदेवाले असत तें वर सांगितलेंच आहे.

त्यांना हंगामाच्या वेळीं ठराविक फळधान्य देण्याचा प्रघात असे हेंही वर सांगितलेंच आहे. आजही कांहीं धंदेवाल्यांच्या बाबतींत बहुतेक ग्रामसंस्थांतून अशा प्रकारें फळधान्य देण्यांत येत असतें. त्याचप्रमाणें कांहीं उत्पन्न हिंदु अगर ख्रिश्चन देवालयांस देण्यांत येतें. हा व शेतीची लागवड, तळ्यापाटांची दुरुस्ती वगैरेसाठीं येणारा खर्च वजा काढून उरणारें ग्रामसंस्थेचें उत्पन्न वरील उभय वर्गांतील लोकांना दर वर्षी विभागून देण्यांत येत असतें. जणकारांच्या वांट्यास येणाऱ्या उत्पन्नाला **'जण'** आणि भागीदारांच्या वांट्यास येणाऱ्या उत्पन्नाला नफा किंवा **'दिव्हिदॅन्दु'** असें म्हणतात. जणाचा हक्क वंशपरंपरेनें जन्मतः प्राप्त होत असून तो दुसऱ्यास विकतां येत नाही. आज निरनिराळ्या कुटुंबांतून विभागून राहणारे पण पूर्वी एकाच कुटुंबाचे घटक असणारे जे जणकार आहेत त्यांच्या समुदायास **वांगड** असें नांव असून निव्वळ उत्पन्नाची विभागणी वांगडानुसारच करण्यांत येत असते. नफ्याचा हक्क भांडवलाचे रोखे असणारांस प्राप्त होत असून तो दुसऱ्यास विकतां येतो. प्रत्येक भागाची किंवा आक्सांवाची किंमत २० रुपये आहे. प्रत्येक ग्रामसंस्थेची अशा भागांची संख्या निरनिराळी असते. पण जिच्या तिच्यापुरती ती नियमित असते. ग्रामसंस्थेच्या मालकीचा वसूल प्रसंगी ५०० रुपयांवर गेला तर अधिक होणारी रक्कम ग्रामसंस्थेच्या तिजोरींत न ठेवतां सरकारी बँकेंत ठेवावी, असा आज कायदा आहे.

ग्रामसंस्थेच्या मालकीच्या जमिनी खंडास लावणें, तिचें उत्पन्न वसूल करणें, आवश्यक खर्चास मंजुरी देणें, उत्पन्न मालकांस विभागून देणें, संस्थेच्या हितसंबंधांवर देखरेख ठेवणें वगैरे कामांसाठीं ग्रामसंस्थेचे मालक दर दोनदोन वर्षांनीं आपल्यांतील पांच इसमांचें एक मण्डळ निवडतात. त्याला 'ग्रामसंस्थेचें व्यवस्थापक मंडळ' किंवा **'झ्यूंत आद्मिनिस्त्रांतीव्ह'** असें नांव आहे. त्यांत एक अध्यक्ष, दोन सभासद, एक

साकादोर व एक प्रोकुरादोर असतो. ह्या निवडलेल्या मण्डळाला सरकारची मान्यता मिळावी लागते. ग्रामसंस्थेचे हिशेब ठेवण्याकरतां एक कारकून असतो त्याला पूर्वी कुळकर्णी म्हणत व त्याची नेमणूक व्यवस्थापक मण्डळच करी. आज त्याला ग्रामसंस्थेचा लेखनवीस किंवा 'इस्क्रिव्हांव' म्हणतात व त्याची नेमणूक करणें, बदली करणें किंवा त्याला काढून टाकणें हीं कामें सरकार करतें. पण त्याचें वेतन ग्रामसंस्थाच देते.

कांहीं ग्रामसंस्था आपल्या जणकारांना ते २१ वर्षें वयाचे झाल्यावरच 'जण' देत असतात; पण कांहीं ग्रामसंस्था जणकारांचे मुलगे वयांत आलेले नसले तरीही, त्यांचा बाप वारलेला असल्यास, त्यांना जणाचा ठराविक अंश देत असतात. जणावरील हक्क प्रस्थापित करण्यासाठीं प्रत्येकानें आपलें नांव स्वत: अगर पालकांमार्फत ग्रामसंस्थेच्या लेखनविसाकडे ठराविक काळांत नोंदावें लागतें.

ज्या ग्रामसंस्थांचा कारभार त्यांच्या मालकांनीं सोडून दिला किंवा ज्या ग्रामसंस्था जरूर असलेला खर्च करण्यास असमर्थ झाल्या त्यांतील कांहीं सरकारनें रद्द केल्या व कांहींचा कारभार स्वत:च्या देखरेखीखालीं घेतला. अशांना सरकारजमा ग्रामसंस्था किंवा **'कोमुनिदाद कोमीस'** असें म्हणतात.

गोमंतकांत प्राचीन काळीं जीं गांवें वसलीं त्या प्रत्येकांत ग्रामसंस्था होती असें अनुमान करतात. पण त्यांतील कांहीं ग्रामसंस्था त्यांच्या मालकांनीं रोगराई वगैरेमुळें सोडून दिल्या तर कांहीं पोर्तुगीज लोकांनीं सरकारजमा केल्या. आणि जीं गांवें अगदीं अलीकडे वसविलीं गेलीं त्यांत ग्रामसंस्था अस्तित्वांतच आल्या नाहींत.

सध्या एकंदर गोमंतकांत मिळून २११ ग्रामसंस्था आहेत. त्यांची तालुकेवार यादी पुढीलप्रमाणें आहे:—

**तिसवाडी ३१:**—आजोशी, बांबोळी, भाटी, कालापूर, काराई, चिंबल, करंबळी, चोडण, खोर्ली, कुजरा, कूर्क, यॅला, गांशीं, थोरलें गोवें,

गळटी, गौळ्यां-मौळा, जुवें, माळार, मंडूर, मेर्कुरें, थोरली मोरंबी, धाकटी मोरंबी, मुर्डा, नांवें, नावेली, थोरलें नेवरें, धाकटें नेवरें, आंबाडी, रेनावडें, सांतानाची तळावली व ताळगांव.

**बारदेश ३९:**—हळदोणें (ही तीनचार वर्षांपूर्वी दोन ठिकाणीं विभागण्यांत आली आहे.), हणजूण, हडफडें, आसगांव, अस्नोडें, कामुर्ली, कळंगूट, कांदोळी, कोलवाळ, काणकें, कुचेली, खोर्ली, वस्तोडें, गिरें, म्हापसें, मार्ना, मार्रा, मइडें, नाचनोडें, नेरूल, नागवें, नादोडें, ओळावली, ओडशेल, पार्रा, पाळयें, पिळर्ण, पोंबुर्पे, पीर्ण, पुनोळें, रेवोडें, साळगांव, शिवोली, शिरसई, शिरोडें, सांकोर्डें, थिवीं, उसकई व वेर्लें.

**सासष्टी ३८:**—अडसुली, आकें, बाणावली, वेताळभाटी, कालट, कामुर्ली, कार्णे, करमणें, केळशी (शूद्र), कवडी, चांदर, चिंचोणें, कोलवें, कुडतरी, दवर्ली, देवसूव, दिकार्पाल, दुकळ्ळी, धर्मापूर, गंडावळी, गणसूव, गिर्दोली, लोटली, माखजन, माजोर्डें, मडगांव, नागवें, ओडली, राय, साजोंडें, सुरावली, सेर्नाभाटी, शिर्ली, तळावली, उतोंड, वानेली, वार्कें व वेर्णें.

**मुरगांव १४:**—आरोसी, कांसावली, चिखली, चिकोळण, कुट्ठाळ, कुवेली, दाबोली, इसर्शें, मुरगांव, पाल, केळशी (ब्राह्मण), सांखवाळ, वाडें व वेळसांव.

**पेडणें १२:**—हरंबल, हळर्ण, आगरवाडा, पेडणें, धारगळ, इब्रामपूर, मांद्रें, मोर्जी, पालयें, तुयें, उगें व विर्नोडें.

**सांखळी २३:**—आमोणें, हरवळें, अडवलपाल, डिचोली, बहें, कोठुंब, कुडणें, दुमाशें, गांजें, लाटंबार्शें, मेणकुरें, मुळगांव, नावेली, नावें, पिळगांव, पिसुर्लें, पाल, सुर्ल, सारवण, शिरगांव, उसगांव, वायंगिणी व वेळगें.

**सत्तरी:**—(नाहींत.)

**फोंडें २८:**—मागें १८ व्या धड्यांत सांगितलेल्या २८ ही गांवांत.

**सांगें ४:**—अष्टाग्रहार, कोळंब-कुर्डी, नेत्रावळी-ज्याकिनुनें व रिवण.

**केपें १६:**—अवेडें–चायफी, अडणें–वाळ्ळी, बाळ्ळी–कांवरें–पिर्ल, केपें–कुस्मण, आंबोलें, फातेंपे, किटोळ–नाकेरी–केडें; मळकर्णे, होडर, शेळडें, असोळडें, कोटंबी; शेळवण–चिकशेळवण, काकोडें, कुडचडें व शिरवई.

**काणकोण ६:**—काणकोण, खोल, गांवडोंगरें, लोलयें–पोळें, नगर्से–पालोलें व पैंगिणी.

तिसवाडी, बारदेश व सासष्टी ह्या तालुक्यांतील ग्रामसंस्थांच्या कारभारावर देखरेख करण्यासाठीं सरकारनें एकेक स्वतंत्र मामलेदार नेमलेला आहे व इतर तालुक्यांतील ग्रामसंस्थांच्या कारभाराची देखरेख त्या त्या तालुक्याच्या मामलेदाराकडेच सोंपविलेली आहे. ह्या देखरेखीबद्दल ग्राम-संस्थांकडून स्वतंत्र मामलेदारांना पगार व तालुक्याच्या मामलेदारांना भत्ता देण्यांत येतो. पूर्वीं महालांतील ग्रामसंस्थांनीं निवडलेल्या प्रतिनिधींचें एक **महालमण्डळ** प्रत्येक महालांत असे व तेंच ग्रामसंस्थांच्या कारभारावर देखरेख ठेवी. अगदीं अलीकडे म्हणजे सन १९२९ च्या सप्टेंबरपासून ह्या मामलेदारांवरही एक अधिकारी नेमण्यांत आला असून त्याला 'इंस्पॅक्तोर दश् कोमुनिदादिश्' असें नांव दिलें आहे.

---

## धडा २८ वा

# देवालयें

**गोमंतकांत** हिंदु, ख्रिस्ती व मुसलमान लोकांचीं मिळून सुमारें २५० देवालयें आहेत. हिंदूंच्या देवालयास **देवस्थान**, ख्रिश्चनांच्या देवालयास मोठें असतां **इगर्ज** व लहान असतां **कपॅल** आणि मुसल-मानांच्या देवालयास **मशीद** असें म्हणतात.

**दमण जिल्ह्यांत** २१ देवस्थानें, ४ इगर्जा व ८ मशिदी असून **दीव जिल्ह्यांत** हे आंकडे अनुक्रमें ३२, २ व ३ आहेत.

सन १९२९ सालच्या सरकारी वार्षिक रिपोर्टांत(आनुआर्यु Anuário) गोमंतकांतील देवालयांची तालुकेवार संख्या पुढीलप्रमाणें दिली आहे:—

| तालुका | देवस्थानें | इगर्जा | मशिदी |
|---|---|---|---|
| तिसवाडी | १ | ३२ | |
| बारदेश | ८ | २७ | |
| सासष्टी | ४ | २४ | |
| मुरगांव | | ७ | |
| पेडणें | १७ | ३ | |
| सांखळी | २४ | २ | १ |
| सत्तरी | | १ | |
| फोंडें | ३३ | ३ | ३ |
| सांगें | १८ | २ | |
| केपें | १२ | ४ | |
| काणकोण | ९ | २ | |
| एकूण | १२६ | १०७ | ४ |

सदर रिपोर्टांत सत्तरी तालुक्यांतील देवस्थानांची यादी दिलेली नाहीं. तथापि तेथें त्यांची संख्या १०–१५ तरी असावी असें वाटतें व ही संख्या जमेस धरूनच गोव्यांतील एकंदर देवालयांची संख्या सुमारें २५० आहे असें वर म्हटलें आहे.

वर जो तक्ता दिला आहे त्यावरून हिंदूंचीं बहुतेक सर्व देवालयें नव्या काबिजादींत असून ख्रिश्चनांचीं बहुतेक सर्व जुन्या काबिजादींत आहेत असें दिसून येतें. गोमंतकांत ज्या वेळीं हिंदूंचें राज्य होतें त्या वेळीं, आज ज्यांना जुन्या काबिजादी म्हणतात तेथेंच संख्येनें व वैभवानें अधिक देवस्थानें होतीं. पुढें गोमंतकाच्या कांहीं भागावर कांहीं काळ मुसलमानांचा अंमल बसला. तथापि ते तेथें हिंदूंचीं देवालयें नष्ट करण्यास किंवा स्वत:च्या मशिदी उभारण्यास फारसे समर्थ झाले नाहींत. अंत्रूब महालांत काय त्या त्यांनी दोनतीन चांगल्या मशिदी उभारल्या. पण आज त्या नष्टप्राय होत आल्या आहेत.

पुढें सन १४९८ त व्हास्कु द गाम ह्या पोर्तुगीज दर्यावर्दीनें हिंदुस्थानचा जलमार्ग शोधून काढल्यावर आफाँसु दॅ आल्बुर्केर्क ह्या पोर्तुगीज वीरानें सन १५१० च्या ता. २० मे ते १५ आगस्टपर्यंत पणजीजवळ लढाऊ गलबतें लावून मुसलमानांकडून गोवें शहर काबीज करण्याचा प्रयत्न केला. पण तो साधत नाहीं असें पाहून त्यानें कानानूरची वाट धरली आणि तेथें सैन्याची तयारी करून त्याच सालच्या २५ नोव्हेंबरला त्यानें त्या शहरावर आपलें निशाण फडकावलें. सन १५११ मध्यें आदिलशहानें पोर्तुगिजांस धुडकावून देण्याच्या इराद्यानें शहरास वेढा दिला. पण त्यास आफाँसु दॅ आल्बुर्केर्कपुढें हार खावी लागली.

ह्या समयास पोर्तुगीज लोकांस ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याची फार मोठी इच्छा होती. ह्यासाठीं ते ख्रिस्ती धर्मोपदेशक किंवा पाद्री बरोबर आणीत असत. ह्या धर्मप्रसारासाठीं त्यांनीं जुनें गोवें येथें सन १५६० सालीं '**धर्मसमीक्षणमंदिर**' किंवा 'त्रिबुनाल दॅ इंकिझिसांव' स्थापन केलें. ह्या संस्थेमार्फत ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याकरितां नाना तऱ्हेचे उपाय योजण्यांत आले. जो कोण ख्रिस्ती धर्म स्वीकारील त्यालाच ग्रामसंस्थांचे हक्क मिळतील, ज्यांचे वडील वारले असतील त्यांनीं ख्रिस्ती धर्म घेतला तरच त्यांना आपल्या वडिलांच्या मालमत्तेचा वारसा प्राप्त होईल वगैरे कायदे करण्यांत आले. पोर्तुगीज भाषा लिहितांबोलतां आली तरच स्त्रीपुरुषांस कायदेशीर लग्नें करतां येतील असेंही जाहीर करण्यांत आलें. सैतानाचीं वचनें दडून बसलीं असतील म्हणून संस्कृत व मराठी भाषेंतील ग्रंथ जाळण्यांत येऊं लागले आणि जे कोणी ख्रिस्ती होण्यास तयार न होतील त्यांना जिवंत जाळण्यापर्यंतच्या शिक्षा देण्यांत येऊं लागल्या. त्याचप्रमाणें तिसवाडी जिंकून घेतल्यानंतरच्या १५–२० वर्षांच्या आंतच तेथील हिंदूंच्या देवालयांचा विध्वंस करून त्यांच्या जागीं इगर्जा उभारण्यांत येऊं लागल्या आणि देवस्थानांचें उत्पन्न त्यांना

देण्याची व्यवस्था झाली. सासष्टी महालांतील देवळांपैकीं आग लावून जें पहिलें देऊळ जमीनदोस्त करण्यांत आलें तें लोटली गांवीं असणारें श्रीरामनाथाचें होय. हें देऊळ अन्यायानें पाडण्यांत आल्याबद्दल गांवच्या हिंदु लोकांनीं न्याय खात्याकडे तक्रार केली व त्यानें ती मान्य करून देऊळ पाडणार लष्करी अधिकारी दियोगु रुद्रीगिश् ह्यांना तें बांधून देण्यास फर्मावलें. पण न्याय खात्याचा हा हुकूम त्या वेळचे गॉव्हर्नादोर जॅराल दॉं आन्तांव द नॉरॉंज्य ह्यांनीं रद्द केला इतकेंच नव्हे तर उलट दियोगु रुद्रीगिश् ह्याला असें फर्मावलें कीं, सासष्टींत जाऊन जें जें देऊळ हातास लागेल तें तें तावडतोब पाडून टाकावें व त्याची सर्व मालमत्ता सरकार-जमा करावी. ह्या हुकुमानुसार त्यानें पाद्रींच्या सैन्याच्या साह्यानें सासष्टींत असणाऱ्या सुमारें २८० देवळांचा चुराडा एका रात्रींत केला ! ही गोष्ट सन १५६७ सालीं घडली.

ह्या कालीं, आज ज्याला जुन्या काबिजादी म्हणतात तेवढाच प्रदेश पोर्तुगिजांच्या अमलाखालीं गेला होता व अंत्रूज आणि जांबावली महालांवर सौंदेकर महाराजांची सत्ता होती. गोमंतकाच्या पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत गेलेल्या मुलुखांतील हिंदु लोकांवर असा कहर होऊं लागल्यामुळें त्यांतील कांहीं जण तेथून कायमचे परागंदा झाले आणि कांहींनीं आपलीं देवस्थानें व घरेंदारें गोमंतकांतील हिंदु राजांच्या मुलुखांत नेऊन उभारलीं. ह्यामुळें आज जुन्या काबिजादींत ख्रिश्चनांचीं आणि नव्या काबिजादींत व विशेषतः फोंडें तालुक्यांत हिंदूंचीं देवालयें विशेष दिसत आहेत. ह्याप्रमाणें ख्रिश्चन व हिंदु ह्यांचीं देवळें निरनिराळीं असलीं तरी कांहीं ख्रिश्चन हिंदु देवालयांस अद्याप मानबहुमान पाठवतात, हिंदु देवांस भजतात आणि तीर्थप्रसादही घेतात. हिंदु सणांच्या वारीं पक्वान्न करून खाण्याची आणि विवाहप्रसंगीं मुलींना हिंदु पोशाख करण्याची चालही बहुतेक सर्व ख्रिश्चन अद्याप पाळतात.

अशा रीतीनें आजमितीस नव्या काबिजादींतील गांवांत असणारीं कांहीं प्रमुख देवळें मूळ जुन्या काबिजादींतील कोणत्या गांवीं होतीं तें पुढें दिलें आहे:—

| | मूळ गांव | देवाचें नांव | आजचें गांव | |
|---|---|---|---|---|
| तिसवाडी तालुका | दिवाडी बेट | श्रीसप्तकोटीश्वर | नार्वे (सांखळी तालुका) | |
| | चोडण बेट | श्रीदेवकीकृष्ण | महाशेल | फोंडा तालुका |
| | चिंबल | श्रीभगवती | ,, | |
| | तळावली | श्रीशांतादुर्गा | ,, | |
| | गांशीं | श्रीनवदुर्गा | मडकई | |
| | नावेली | श्रीगणपति | खांडोळें | |
| बारदेश ता. | हळदोणें | श्रीभगवती | ,, | |
| | कळंगूट | श्रीशांतादुर्गा | नानोडें (सत्तरी तालुका) | |
| सासष्टी तालुका | मडगांव | श्रीदामोदर | जांबावली (सांगें तालुका) | |
| | लोटली | श्रीरामनाथ | बांदोडें | फोंडा तालुका |
| | कोलवें | श्रीमहालक्ष्मी | ,, | |
| | राय | श्रीकामाक्षा | शिरोडें | |
| | केळशी (ग्रा.) | श्रीशांतादुर्गा | कवळें | |
| | कुठ्ठाळ | श्रीमंगेश | म्हाडदोळ | |
| | वेर्णे | श्रीमहालसा | ,, | |
| | सांखवाळ | श्रीलक्ष्मीनरसिंह | वेलिंग | |
| | आरोसी | श्रीबागेश्वर | तळावली | |

ज्यांनीं देवस्थानें मूळ स्थापन केलीं त्यांना व त्यांच्या वंशजांना **महाजन** म्हणतात. हे महाजन लोक दर दोनदोन वर्षांनीं आपल्यांतील चार जणांचें एक व्यवस्थापक मंडळ निवडतात व तें देवस्थानाचा कारभार

पाहातें. ह्या मंडळांत एक अध्यक्ष, एक खजिनदार, एक मुखत्यार ( प्रोकुरादोर ) व एक लेखनवीस असतो. गोमंतकांतील देवस्थानांचे अनेक महाजन ब्रिटिश हिंदुस्थानांत असतात. पण त्यांना देवस्थानांच्या कारभारांत भाग घेतां येत नाहीं.

हिंदूंच्या देवस्थानांप्रमाणें ख्रिश्चन व मुसलमान देवालयांची व्यवस्था पाहाण्यासाठींही एकेक व्यवस्थापक मंडळ असतें. ख्रिश्चन देवालयांना व्यवहारांत ' कॉंफ्रारीयश् ' ह्या नांवानेंही ओळखण्यांत येतें.

सर्व धर्मांच्या देवालयांच्या व्यवस्थापक मंडळांवर देखरेख ठेवण्यासाठीं तिसवाडी, बारदेश व सासष्टी ह्या तालुक्यांतून सरकारनें स्वतंत्र मामलेदार नेमले असून बाकीच्या तालुक्यांत हें देखरेखीचें काम तालुक्याच्या मामलेदाराकडेच सोंपवलेलें आहे. ह्या देखरेखीबद्दल स्वतंत्र मामलेदारांना पगार व तालुक्याच्या मामलेदारांना ठराविक भत्ता देवालयांकडून देण्यांत येतो.

---

## धडा २९ वा

# धर्मपीठें

### हिंदूंचीं

हिंदु समाजांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व अतिशूद्र असे पांच वर्ण आहेत व ह्या सर्व वर्णांचे लोक गोमंतकांत दिसतात. ब्राह्मणांत पंचगौड आणि पंचद्राविड असे दोन वर्ग असून त्या प्रत्येकांत पुन्हा आणखी उपवर्ग आहेत. दैवज्ञ ब्राह्मण म्हणूनही एक स्वतंत्र वर्ग ब्राह्मणांत आहे. पंचगौडांत 'गौड सारस्वत' म्हणून एक उपवर्ग असून त्यांत वैष्णव व स्मार्त असे दोन पंथ आहेत. वैष्णवांत सासष्टीकर व बारदेशकर असे दोन आणि स्मार्तांत

शेणवी, कुडाळदेशकर, पेडणेंकर, भालावलीकर व शेणवींपैकी असे पांच पोटभेद असून शेवटचे दोन खेरीज करून गौड सारस्वत ब्राह्मणांतील बाकी सर्व पोटभेदांच्या लोकांची वस्ती गोमंतकांत आहे.

ह्या पोटभेदांपैकीं बारदेशकर व सासष्टीकर ह्यांचा मिळून एक आणि इतर पोटभेदांचा प्रत्येकीं एकेक असे पांच निरनिराळे धर्मगुरु किंवा स्वामी आहेत. पैकीं सासष्टीकर व बारदेशकर ह्यांचा किंवा **वैष्णव स्वामींचा मठ** पर्तगाळ येथें आणि शेणवी व भालावलीकर ह्यांचा किंवा **स्मार्त स्वामींचा मठ** कवळें येथें आहे. गोमंतकांत दोनच धर्ममठ किंवा धर्मपीठें असून त्यांचे कित्येक उपमठ व पुष्कळ शिष्य ब्रिटिश हिंदुस्थानांत आहेत.

कुडाळदेशकर, पेडणेंकर व शेणवीपैकीं ह्यांचे धर्ममठ अनुक्रमें रत्नागिरी जिल्ह्यांतील दाभोळी व मांवडें आणि कारवार जिल्ह्यांतील चित्रापूर ह्या गांवीं आहेत.

पंचद्राविडांतही अनेक पोटभेद आहेत. त्यांपैकीं चित्पावन किंवा कोंकणस्थ, कऱ्हाडे, पद्ये व कीरवंत जोशी ह्या चार पोटभेदांचे लोक तेवढे गोमंतकांत आहेत. पंचद्राविडांतील ह्या सर्व पोटभेदांचे, दैवज्ञ ब्राह्मणांचे आणि गोमंतकांतील क्षत्रिय, वैश्य, शूद्र व अतिशूद्रांतील महारचांभारादि इतर सर्व जातींचे धर्मगुरु एकच असून त्यांचा मठ बेळगांव जिल्ह्यांतील संकेश्वर ह्या गांवीं आहे.

हिंदु उपाध्यायांची संख्या गोव्यांत ३८०, दमणांत १३ व दिवांत ४२ आहे.

## ख्रिश्चनांची

हिंदु धर्मांत ज्याप्रमाणें वर्णभेद आहेत त्याप्रमाणें ख्रिस्ती धर्मांत नाहींत. पण गोमंतकांत आज जे ख्रिश्चन आहेत ते मूळचे हिंदु असल्यानें आणि त्यांचें धर्मान्तर एकदम मोठ्या प्रमाणांत झाल्यामुळें त्यांच्यांतून

अद्याप वर्णभेद नष्ट झालेला नाहीं. तथापि त्यांच्यांत हिंदु समाजांतल्या इतक्या जाती राहिलेल्या नसून ब्राह्मण, चाड्ड किंवा चारडे आणि शूद्र ह्या तीनच मुख्यतः राहिलेल्या आहेत. मात्र हिंदूंप्रमाणें ख्रिश्चन शूद्रांतही अनेक पोटजाती दिसत असून त्या बहुधा धंद्यावरून राहिलेल्या आहेत. दमण व दीव येथील ख्रिश्चनांत गोव्यांतल्याप्रमाणें जाती दिसून येत नाहींत. युरोपियन पुरुष व हिंदी बायको किंवा हिंदी पुरुष व युरोपियन बायको ह्यांच्यापासून उत्पन्न झालेली एक मिश्र जातही गोव्यांत आहे. तिला पोर्तुगीज भाषेंत 'दॅसँदॅंति' किंवा 'मेश्तीसु' असें म्हणतात.

जगांतील सर्व ख्रिश्चनांचे धर्मगुरु, युरोप खंडांतील इटली देशाची राजधानी जें रोम शहर त्यांत राहातात. त्यांना '**पोप**' अशी संज्ञा असते. पोपच्या मुख्य मठाच्या देखरेखीखालीं जगांत अनेक ठिकाणीं उपमठ उभारण्यांत आले आहेत. रोमच्या मठानें सन १५१४ सालीं ख्रिस्ती धर्मोपदेशकांचा फार मोठा तांडा तयार करून त्याला पूर्वेकडील देशांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यास पाठवलें. ह्या मिशनऱ्यांच्या संस्थेस 'पाद्रोआदु दु ओरियँति' असें नांव देण्यांत आलें. सन १५३४ सालीं जुनें गोवें येथें एक उपमठ उभारण्यांत आला. व तीनचार वर्षांनीं त्याचे अधिकार वाढवून त्याच्या अधिकाऱ्याला '**आर्सेबीस्पु**' हें नांव देण्यांत आलें. ह्या उपमठाची धार्मिक सत्ता अरेबिया, पर्शिया, अफगाणिस्थान, हिंदुस्थान, नेपाळ, ब्रह्मदेश वगैरे देशांतील ख्रिस्ती लोक व मिशनरी ह्यांच्यावरही चालत असे. पण पुढें ती कमी कमी होत गेली आणि आज ह्या उपमठाच्या सत्तेखालीं दमण, माकाव ह्या पोर्तुगीज वसाहती आणि कोची, उत्तर कर्नाटक, त्रावणकोर, मेलियापूर वगैरे ब्रिटिश हिंदुस्थानांतल्या मुलुखांतील इगर्जा व ख्रिस्ती लोक तेवढे आहेत. गोव्याच्या आर्सेबिस्पाची नेमणूक पोपसाहेब पोर्तुगाल सरकारच्या संमतीनें करतात. हा आर्सेबीस्पु पोर्तुगालचाच रहिवाशी असावा लागतो. पाद्रोआदाचें लटांबर पुष्कळ काळ

पोर्तुगीज हिंदुस्थान सरकार पोशीत होतें, पण आतां तो खर्च पोर्तुगाल सरकार करतें. तथापि पोर्तुगीज हिंदुस्थान सरकारकडून जुन्या गोव्याचे ख्रिश्चन मठ व पोर्तुगीज हिंदुस्थानांतील इगर्जा ह्यांतील उपदेशक व नोकर वर्ग आणि दमणची सेमिनार्यु ह्यांना मिळून सुमारें ६२॥ हजार रुपये ख्रिस्ती धर्मासाठीं प्रतिवर्षी खर्च होत असतात. मुलकी व्यवस्था खात्यांत ख्रिस्ती धर्म खातें नांवाचें जें पोटखातें असल्याचें मागें सांगितलें आहे, त्याच्या कामांपैकीं हे पैसे देणें हेंच सध्या मुख्य आहे.

ख्रिस्ती उपाध्याय किंवा पाद्री गोव्यांत ४२७, दमणांत ६ व दिवांत ३ आहेत.

## मुसलमानांची

गोव्यांतील मुसलमानांत शेख, सय्यद, पठाण, खोजा, हकीम, फकीर, दरवेशी वगैरे अनेक जाती असून त्यांचे आणि जगांतील इतर सर्व मुसलमानांचेही धर्मगुरु युरोपांतील तुर्कस्थान देशाच्या इस्तंबूल किंवा कॉन्स्टांटिनोपल नांवाच्या राजधानीत राहातात,व त्यांना 'खलीफा' असें नांव असतें. मुसलमानांचे काजी गोव्यांत ३, दमणांत ३ व दिवांत २ आहेत.

दीव येथें दोन पारशी धर्मीयांचे उपाध्यायही आहेत.

---

## धडा २० वा

# दीन-सहाय्यक संस्था

गरीबदुबळ्या आणि आंधळ्यापांगळ्या लोकांना अन्नवस्त्र फुकट द्यावें व ते आजारी पडले असतां मोफत औषधोपचार करावे,त्याचप्रमाणें गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यास मदत पुरवावी ह्या इराद्यानें स्थापन करण्यांत आलेल्या संस्थांना दीन-सहाय्यक संस्था असें म्हणतात. हिंदु

किंवा मुसलमान लोकांनीं चालवलेली अशी एकही संस्था गोमंतकांत नाही. पण ख्रिश्चनांनीं चालविलेल्या दीन–सहाय्यक संस्था अनेक असून त्यांतील कांहीं बऱ्याच संपन्न आहेत. त्यांची तालुकेवार त्रोटक माहिती ह्या धड्यांत देण्यांत येत आहे:—

## तिसवाडी

**सान्त काझ द मिझेरिकॉर्दिय** (दया–मंदिर)—ही संस्था आफाँसु दॅ आल्बुकॅर्क ह्या पोर्तुगीज वीरानें गोवें जिंकून घेतल्यावर लगेच म्हणजे सन १५११ सालीं जुनें गोवें येथें स्थापन केली. पोर्तुगीज सैनिकांच्या विधवा व पोरक्या मुली आणि दॅसॅन्दॅन्ति ह्यांना दैन्यमुक्त करावें ह्या इरादानें ही संस्था उभारण्यांत आली. अर्थात् हिंदी लोकांना तिच्याकडून कांहींच मदत मिळत नसे. त्या वेळच्या सरकारनें व कांहीं कनवाळू लोकांनीं दिलेल्या द्रव्यामुळें ह्या संस्थेची शेंभर वर्षांनीं बरीच भरभराट झाली आणि आशिया व आफ्रिका खंडांत मिळून तिच्या २०–२५ शाखाही निघाल्या. पण नन्तर पोर्तुगिज़ांची सत्ता आशिया खंडांतून नष्ट होत चालली व तिच्याबरोबर ह्या सर्व शाखाही मोडल्या.

प्रारंभीं ह्या संस्थेमार्फत अनाथांना अन्नवस्त्र तेवढें देण्यांत येत असे. पण सहाव्या शतकाच्या अखेरीस तिनें गरीब रोग्यांना मोफत औषधोपचार करण्यासाठीं जुनें गोवें येथेंच एक **ओस्पिताल** म्हणजे इस्पितळ किंवा रुग्णालय बांधलें. सन १६०६ सालीं गोव्याच्या आर्सेबिस्पांनीं तेथेंच अनाथ विधवांना राहाण्यासाठीं **सान्त मादालेन** नांवाची आणि पोरक्या मुलांचा सांभाळ करण्यासाठीं **सॅर** नांवाची अशा दोन इमारती बांधून त्या मिझॅरिकॉर्दिय संस्थेच्या ताब्यांत दिल्या. पुढें १९ व्या शतकाच्या मध्यास जुनें गोवें येथून जेव्हां राजधानीच हलवावी लागली तेव्हां मिझॅरिकॉर्दिय संस्थेलाही आपल्या इमारती दुसरीकडे बांधाव्या लागल्या. त्याप्रमाणें तिनें

कचेरीसाठीं पणजी येथें, इस्पितळ व अनाथ-बालिकाश्रम ह्यांच्यासाठीं रायबंदर येथें आणि निराश्रित-विधवा-निवासासाठीं चिंबल येथें अशीं घरें उभारलीं. पण ह्या शेवटच्या दोन शाखा पुढें तेथूनही हलवून पणजीस आणल्या व सध्या त्या पणजीसच आहेत. म्हणजे आजमितीस ह्या संस्थेचें **कार्यालय पणजी** येथें असून तिच्यामार्फत तेथें **अनाथ-बालिकाश्रम** व **निराश्रित-विधवा-निवास** आणि **रायबंदर** येथें **इस्पितळ** हीं चाललीं आहेत. इस्पितळांत प्रतिवर्षी पांचसहाशें रोग्यांस औषधोपचार करण्यांत येतो. अनाथ-बालिकाश्रमांत अनाथ बालिकांना राहाण्याची सोय होत असून विधवानिवासांत गरीब विधवांना राहाण्याची आणि प्राथमिक व कशिदाचें शिक्षण मिळण्याचीही सोय केली जाते. त्याचप्रमाणें गरीब विद्यार्थी व निराश्रित विधवा ह्यांना आर्थिक मदतही देण्यांत येते. ह्या संस्थेचे सभासद युरोपियन व दॅसॅन्दॅन्ति ह्यांनाच होतां येतें. आणि तिच्यामार्फत होणारी मदत मुख्यतः जरी त्यांनाच मिळते तरी इतरांनाही ती थोडी दिली जाते. गरीब रोग्यांस औषधोपचार मोफत केले जातात व इतरांकडून त्याबद्दल फी घेतली जाते. **संस्थेचा कायम फंड सुमारें १६ लक्ष रुपयांचा** आहे. पोर्तुगीज हिंदुस्थान सरकारकडून संस्थेला सुमारें एक हजार रुपयांची वार्षिक मदत मिळत असते. ही रक्कम, कायम फंडाचें व्याज आणि लोकांच्या किरकोळ देणग्या मिळून -॥- लक्ष रुपये वार्षिक उत्पन्न येतें. शिवाय, प्रत्येक महिन्यांत एकदां निघणाऱ्या **सोडतींपासून,** त्यांचा खर्चवेंच व बक्षिसांच्या रकमा वजा जातां, **प्रतिवर्षी सुमारें ३ लक्ष रुपये निव्वळ उत्पन्न** संस्थेला मिळतें. म्हणजे **संस्थेचें वार्षिक उत्पन्न ३॥ लक्ष रुपये** आहे असें म्हणतां येतें. ह्या उत्पन्नांतून सुमारें ६७ हजार रुपये इस्पितळासाठीं, २९ हजार अनाथ-बालिकाश्रम व निराश्रित-विधवा-निवास ह्यांसाठीं, १४ हजार

शिष्यवृत्त्यांसाठीं, ६२ हजार धर्मादायासाठीं, ३१ हजार सोडतीवरील व इतर सरकारी कर भरण्यासाठीं आणि बाकी १४७ हजार रुपये सामानसुमान, साफसफाई, कागदपत्र व नोकरवर्ग ह्यांच्यासाठीं खर्च होत असतात.

मिझरिकॉर्दिय संस्थेखेरीज **नवीन गोवें** येथें **अनाथ व अन्न-सहाय्यक** नांवाची एक संस्था आहे. हिचें वार्षिक उत्पन्न ७॥ हजार रुपयांच्या जवळपास आहे. दहाबारा वर्षांमागें ब्रिटिश सरकारनें, गोव्यांत तांदूळ जाऊं द्यावयाचा तो ठराविक इतका असावा, असा कायदा केला होता. त्या वेळीं सर्व लोकांची गरज योग्य रीतीनें भागवावी म्हणून आमच्या सरकारनें, तांदूळ स्वतःच्या देखरेखीखालीं खरेदी करावा व स्वतःच्याच देखरेखीखालीं विकत द्यावा, असा निर्बंध घातला होता. ह्या व्यवहारांत सरकारास बराच फायदा उरला. त्यांतील कांहीं भाग सरकारनें निराळा काढला आणि वरील संस्था स्थापून तो तिच्या हवालीं केला. ह्याशिवाय नवीन गोवें येथेंच **सॅन्त्रु प्रोमोतोर द् कारिदादि** नांवाची आणि **दिवाडी** येथें **आझीलु दॅ सां फ्रांसीस्कु शाव्हियॅर** नांवाची अशा दोन दीनसहाय्यक संस्था असून त्यांचें वार्षिक उत्पन्न ठोकळ मानानें अनुक्रमें १०० व ७०० रुपये आहे.

## बारदेश

**आझीलु दॅ मिलाग्रिश्**—सन १८६३ सालाच्या सुमारास बारदेशांत तॉमाज् नूनिश् द सॅर्रं इ मौर नांवाचे एक न्यायाधीश होते. त्यांची तेथून बदली झाल्यावेळीं लोकांनीं त्यांचा गौरव करण्यासाठीं सुमारें १५०० रुपये गोळा केले. ते सदर न्यायाधीशांनीं, पुढेंमागें एखादी अनाथसहाय्यक संस्था उभारून तिच्या स्वाधीन करावे ह्यासाठीं तेथील कांहीं लोकांच्या ताब्यांत दिले. १८७५ सालीं एका पाद्रीनें आणखी कांहीं वर्गणी जमविली व उभय रकमांच्या आधारें एक लहानसें घर बांधून तेथें गरीब रोग्यांना मोफत औषधोपचार मिळण्याची सोय केली. पण तेथें

येणाऱ्या रोग्यांच्या संख्येला ही जागा अपुरी पडत असल्याचें पाहून कोलवाळच्या एका ख्रिश्चन गृहस्थानें संस्थेस मोठें घर बांधून दिलें.पुढे दो. दाल्गादु ह्यांनीं दोन खेपा मिळून संस्थेस सुमारें २४ हजार रुपये कायम फंडासाठीं दिले. नंतर आणखी कांहीं रुपये गोळा करून सन १९२३ सालच्या एप्रिल महिन्यांत त्या वेळचे गव्हर्नर दो. ज्यायमि दॅ मॉराइश् ह्यांच्या हस्तें एका चांगल्या इस्पितळासाठीं इमारतीचा पाया घातला. आणि १९२४ सालीं कायमच्या उत्पन्नासाठीं सोडती विकण्याची परवानगी सरकारकडून मिळवली. ही सोडत वर्षांतून एकदांच निघते आणि तिचा खर्चवेंच काढून संस्थेस सुमारें ।॥॰ लक्ष रुपये तिच्यापासून मिळतात. ह्याशिवाय कायम फंडाचें व्याज व देणग्या ह्यांचें सुमारें ५॥ हजार रुपये उत्पन्न संस्थेला प्रतिवर्षी येतें. संस्थेच्या इस्पितळांत प्रतिवर्षी ५०–६० रोग्यांना, गरीब असतां मोफत आणि नसतां फी घेऊन, औषधोपचार केले जातात.

ह्या म्हापशास असलेल्या संस्थेशिवाय, **खोरजुवें बेट, कळंगूट** आणि **शिवोली** ह्या गांवांतूनही एकेक लहानशी दीनसहाय्यक संस्था आहे.

## सासष्टी

**ओश्पीसियु दु साग्राडु कुरासांव दॅ मारीय**—ही संस्था आन्तॉनियु ज्युवांव दॅ मिरान्द नांवाच्या एका पाद्रीनें सन १८६७ सालीं स्थापन केली. ह्या सालाच्या सुरुवातीस गरीब रोग्यांचें दुःख हलकें करण्यासाठीं म्हणून त्यांनीं महालांतील लोकांकडे वर्गणी मागितली. सप्टेंबर महिन्यांत वर्गणी देणाऱ्यांची सभा म्युनिसिपालिटीच्या घरांत भरवून तींत नियमावली करण्यासाठीं एक आणि पैसे गोळा करण्यासाठीं एक अशा दोन कमिट्या नेमल्या. कमिटीनें कांहीं पैसा तावडतोब गोळा केला व त्याच सालच्या डिसेंबर महिन्यांत पाद्रीनें रुग्णालयासाठीं लहानशी इमारत बांधली. दुसऱ्या कमिटीनें तयार केलेली नियमावली,

वर्गणीदारांची पुन्हा सभा भरवून मंजूर करून घेतली आणि १८६८ सालाच्या सुरुवातीस तिला सरकारचीही मान्यता मिळाली. ह्या नियमावलींत सन १८७२ साली फेरफार करण्यांत आले. ख्रिस्तवासी आरिश्तीद्रिशुद कॉश्त नांवाच्या गृहस्थाच्या स्मरणार्थ गोळा करण्यांत आलेली कांहीं रक्कम संस्थेस मिळाली आणि त्याच साली सरकारनें तिला दर महिन्यांत एकदां सोडती बाहेर घालण्याची परवानगीही दिली. पहिल्या सोडतीपासून, तिचा खर्च वजा जातां, संस्थेस सुमारें ५०० रुपये उत्पन्न मिळालें. पण तें आज प्रतिवर्षी १६७ हजार रुपयांजवळ येत असतें. संस्थेनें मडगांव येथें एक इस्पितळ चालवलें असून क्षय व रक्तपिती झालेल्यांसाठीं डोंगरमाथ्यावर भव्य इमारती बांधल्या आहेत. इस्पितळांत ७२ रोग्यांसाठीं जागा असून प्रतिवर्षी सुमारें १००० रोगी, गरीब असतां मोफत व नसतां फी देऊन, औषधोपचार करून घेत आहेत. **संस्थेचा कायम फंड सुमारें १३१ हजार रुपयांचा** असून, लोकांच्या देणग्या ६००० रु., सोडतींवर उरणारा निव्वळ फायदा सुमारें १६७००० रु. आणि कायम फंडाचें व्याज व इतर ह्यांचे ७४००० रु. मिळून सुमारें २४७००० रुपये वार्षिक उत्पन्न आहे. उत्पन्नांतून सुमारें ४२ हजार रु. रोग्यांच्या शुश्रूषेसाठीं, १८ हजार रु. त्यांतील डॉक्टर व परिचारक ह्यांच्यासाठीं, २३ हजार रु. भिक्षेकऱ्यांस अन्नवस्त्रासाठीं आणि इतर नोकरवर्ग व जादा कामें ह्यांच्यासाठीं खर्च होत आहेत.

पूर्वी हिंदु लोकांस ह्या संस्थेचे सभासद करून घेण्यांत येत असे. पण १९२२ ते २४ ह्या सालांत नियमावलींत फेरफार करून हिंदूंचा तो हक्क संस्थेच्या अधिकारी मंडळानें नष्ट केला. हिंदूंसाठीं एक स्वतंत्र परिचर्यागृह बांधण्यासाठीं मडगांवचे स्वर्गस्थ भि. सुब्राव लक्ष्मण नायक ह्यांनीं एक जागा संस्थेच्या हवालीं केली होती व गृह बांधलें जावें असें नियमावलींतही म्हटलें आहे. त्याचप्रमाणें गरीब हिंदूंस आणि निराश्रित

हिंदु विधवा व पोरकी मुलें ह्यांना ठराविक रक्कम मदतीदाखल द्यावी अशी शिफारसही सरकारनें संस्थेस केली होती. पण परिचर्यागृह अद्याप बांधण्यांत आलेलें नसून हिंदूंना मदतही फारच थोडी मिळते.

महगांवशिवाय **चिंचोणें, कोलवें, कुडतरी, लोटली, माजोर्डें** व **राय** येथेंही एकेक अनाथसहाय्यक संस्था असून त्यांपैकीं लोटलीची महत्वाची आहे. हिचा कायम फंड ४० हजारांजवळ असून उत्पन्न व खर्च सुमारें २ हजार रु. आहे.

## केंपें

नव्या काविजादींपैकीं फक्त केंपें महालांत एक अनाथसहाय्यक संस्था असून तिचा फंड १'१०० रु. आहे. गरीब रोग्यांस कोणत्याही इस्पितळांत पाठवण्याचा व औषधोपचार करण्याचा खर्च फंडाच्या व्याजांतुन संस्था देत असते.

## दमण व दीव

ह्या दोन्ही जिल्ह्यांत एकेक अनाथसहाय्यक संस्था असून दीवच्या संस्थेला सरकार वार्षिक १००० रुपये मदत देतें.

---

ह्या सर्व संस्था चालवण्यासाठीं त्याच्या सभासदांकडून मंडळें नेमण्यांत येतात व त्यांना सरकारची मान्यता मिळावी लागते. मिझरिकॉर्दिय, आझीलु व ओरपीसियु ह्यांच्याखेरीज इतर संस्थांना सोडती विकण्याची परवानगी नाहीं. ह्या तिन्ही संस्थांना सरकारनें टपालखर्च माफ केला आहे.

जन्म–विवाह–मृत्यु इत्यादींची नोंदणी, शिक्षण, ग्रामसंस्था, देवालयें व दीनसहाय्यक संस्था ह्यांच्यावर सरकार जी देखरेख करतें ती मुलकी व्यवस्था खात्यामार्फत होय हें येथें वाचकांनीं पुन्हा लक्षांत घ्यावें.

---

## धडा ३१ वा

# आरोग्य खातें

प्रजेच्या आरोग्याच्या संरक्षणाकरतां आणि सुधारणेकरतां उपाय योजणें हें ह्या खात्याचें काम असल्यानें, देवी, प्लेग वगैरे रोगांची सांथ उद्भवल्या वेळीं लोकांना देवीची, प्लेगाची वगैरे लस टोंचणें म्हणजे व्हासीन करणें, घरें, पाणी वगैरेंची स्वच्छता करून घेणें, सांथीच्या वेळीं कसें वागावें त्यासंबंधीं लोकांस माहिती पुरविणें, परराज्यांतून येणाऱ्यांना तपासून संसर्गजन्य आजारापासून मुक्त असलेल्यांनाच देशांत शिरूं देणें इत्यादि कामें त्याच्यामार्फत चाललेली असतात. पोर्तुगीज भाषेंत ह्या खात्याला 'दिरॅक्सांव दॅ साऊदि इ इझियॅनि' असें नांव आहे. पणजी येथें एक इस्पितळ ह्या खात्यामार्फत चाललें असून त्याला 'ओश्पिताल सॅन्त्राल' म्हणजे मध्यवर्ति रुग्णालय असें नांव आहे. त्याच्यालगत जंतु-शास्त्राचा अभ्यास करण्यास अवश्य असलेलीं उपकरणें ठेवून एक 'इंश्तितूतु बाक्तेरियॉलॉजिकु' म्हणजे जंतुशास्त्रालय आणि मलमूत्र, थुंकी, रक्त वगैरेंचें पृथःकरण करण्यास अवश्य असलेली उपकरणें ठेवून एक 'इंश्तितूतु द आनालिझि इ व्हासीन' म्हणजे पृथःकरणालय उघड-लेलें आहे. ह्या इस्पितळांत दर वर्षी सुमारें ११०० लोकांना औषधोपचार केला जातो. त्यांत ६-७ शें सरकारी कामदार आणि बाकी स्वतंत्र लोक असतात. गरीब लोकांना येथेंही मोफत औषधोपचार करण्यांत येतात.

ह्या खात्याच्या मुख्य कचेरींत वैद्य व औषधसिद्धिशास्त्रज्ञ असतात. वैद्यांपैकी एक मुख्याधिकारी व एक बदली मुख्याधिकारी असतो. वैद्यकीय पाठशाळा व औषधीय पाठशाळा ह्या उभयतांत हेच लोक अध्यापकाचें काम करतात. त्याचप्रमाणें इस्पितळ व त्याच्यालगतचीं दोन्ही आलयें ह्यांची देखरेखही ह्यांच्याकडे सोंपवलेली असते. ह्याशिवाय सुमारें ६० एंफेमैरुश् म्हणजे रुग्णपरिचारकही ह्या खात्यांत आहेत. मुख्य कचेरींतील वैद्य, औषधसिद्धिशास्त्रज्ञ

व रुग्णपरिचारक हे वस्तुतः सिव्हील म्हणजे मुलकी लोक असतात. पण तेच इस्पितळांत काम करीत असल्यामुळें आणि मूळ हें इस्पितळ लष्करी लोकांकरतां काढण्यांत आलें होतें ह्यामुळें त्यांना लष्करी हुद्दे देण्यांत येत असतात. सरकारी नोकर आजारामुळें कामास नालायक ठरला आहे कीं नाही ह्याबद्दल अभिप्राय देण्याचेंही काम मुख्य कचेरींतील वैद्यांकडे असतें.

आपलें काम सर्व ठिकाणीं चांगलें व्हावें ह्यासाठीं आरोग्य खात्यानें पोर्तुगीज हिंदुस्थानांतील प्रत्येक तालुक्याच्या मुख्य ठिकाणीं एकेक ह्याप्रमाणें १४ आणि कुळें व वेळ्ळी येथें एकेक ह्याप्रमाणें २ मिळून एकंदर १६ वैद्य आपले प्रतिनिधि म्हणून ठेवलेले आहेत. ह्या प्रतिनिधीला **'दॅलॅगादु दॅ साऊदि'** असें म्हणतात. ह्याशिवाय गोव्यांत पणजी, रैजमाग व सांखळी येथें एकेक ह्याप्रमाणें ३, दमणांत २ व दिवांत १ मिळून एकंदर ६ उपप्रतिनिधि ठेवलेले आहेत. ह्या उपप्रतिनिधीला **'सुब्दॅलॅगादु दॅ साऊदि'** म्हणतात. आरोग्य खात्याचे प्रतिनिधि व उपप्रतिनिधि ज्या गावांत असतात त्याच्या आसपासच्या गांवांतील आरोग्य खात्याचें वर सांगितलेलें सर्व काम त्यांनीं पाहावयाचें असतें. गोमंतकाचे मुलकी व्यवस्थेसाठीं जे विभाग करण्यांत आले आहेत तेच आरोग्यव्यवस्थेसाठीं सामान्यतः करण्यांत आलेले असले तरी ते तंतोतंत आहेत असें मात्र नव्हे. उदाहरणार्थ मुलकी व्यवस्थेंत पारोडें फ्रेगेझी सासष्टींत आणि पंचवाडी फ्रेगेझी अंत्रुजेंत धरलेली आहे. पण आरोग्यव्यवस्थेच्या दृष्टीनें त्या केपेंच्या प्रतिनिधीच्या क्षेत्रांत धरल्या आहेत. लक्षांत घेण्याची आणखी एक गोष्ट म्हणजे सांखळी तालुक्यांत आरोग्य खात्याचा प्रतिनिधि आहे तो डिचोलींत आणि उपप्रतिनिधि आहे तो सांखळी कसब्यांत आहे.

मुख्य कचेरीशिवाय गोव्यांतील इतर कोणत्याही तालुक्यांत ह्या खात्यानें ठेवलेले औषधसिद्धिशास्त्रज्ञ नाहींत. पण दमण व दीव येथें एकेक ठेवला असून ते सिव्हील आहेत.

आजमितीस तिसवाडींत ५०, बारदेशांत ७०, सासष्टींत १०० व नव्या काबिजादींतील एकंदर तालुक्यांत १०–१५ सरकारी पदवीधर डॉक्टर खासगी धंदा करीत असून कांहीं देशी वैद्यही औषधें देतात. जुन्या काबिजादींत सुमारें ५५ व नव्या काबिजादींत ४–५ फार्मासिव-तिकुश् औषधें तयार करून देण्याचा व विकण्याचा धंदा करीत आहेत.

---

## धडा ३२ वा

# जमाबंदी खातें

सरकारनें प्रजेवर बसविलेले, जकात खेरीज करून इतर, कर वसूल करणें, सरकारी नोकरांचा पगार व इतर खर्चाच्या रकमा देणें, राज्यकारभाराचा जमाखर्च ठेवणें वगैरे जीं ह्या खात्याचीं कामें आहेत तीं योग्य रीतीनें पार पाडण्यासाठीं त्यानें राजधानींत एक मुख्य कचेरी ठेवली असून पोर्तुगीज हिंदुस्थानांतील चौदाही तालुक्यांच्या मुख्य ठिकाणीं एकेक पोटकचेरी ठेवली आहे. मुख्य कचेरीला **'दिरॅक्सांव दॅ फाझेंद'** व पोटकचेरीला **'रॅपार्तिसांव दॅ फाझेंद'** असें म्हणतात. मात्र सत्तरी तालुक्यांतील वाळपईच्या पोटकचेरीचा दर्जा इतर तालुक्यांतील पोटकचेऱ्यांपेक्षां कमी असून त्यामुळें तिला **'दॅलॅगासांव दॅ फाझेंद'** असें नांव दिलें आहे.

### सरकारचें खासगी उत्पन्न

देशांतील नद्या, खाणी, रानें वगैरेंची मालकी सरकारकडे असते आणि इतर जमिनीच्या निरनिराळ्या तुकड्यांची मालकी व्यवहारतः निरनिराळ्या व्यक्ति अगर व्यक्तिसमुदाय ह्यांच्याकडे असते. ह्या मालकी-हक्काच्या जमिनीच्या उपयोगाबद्दल सरकार त्या व्यक्तींकडून **'प्रेदियाल'**

म्हणजे जमीनधारा नांवाचा कर घेत असतें. हा जमीनधारा पोर्तुगीज हिंदुस्थानांत सामान्यतः जमिनीच्या उत्पन्नाचा बारावा हिस्सा आहे. ज्याप्रमाणें जमिनीच्या भागांवर व्यक्तींची खासगी मालकी असते त्याचप्रमाणें तिच्या कांहीं भागांवर सरकारची खासगी मालकी असूं शकते. आमच्या सरकारच्याही खासगी मालकीच्या अशा कांहीं जमिनी असून त्या मुख्यतः असोळणें, वेळ्ळी व आंवेली येथें आहेत. त्यांचें वार्षिक उत्पन्न सुमारें ११८००० रु. आहे. ह्या जमीनजुमल्याची निगा राखण्यासाठीं व उत्पन्नाची व्यवस्था पाहाण्यासाठीं असोळणें येथें एक मामलेदार ठेवलेला असतो. त्याला **'आदमिनिस्त्रादोर रुराल'** असें नांव आहे. ह्या अधिकाऱ्याला मामलेदार असें जरी नांव असलें तरी त्याचा संबंध मुलकी व्यवस्था खात्यापेक्षां जमाबंदी खात्याकडेच विशेष असतो. आणि म्हणून त्याची कचेरी ही जमाबंदी खात्याचीही दुय्यम दर्जाची पोटकचेरी म्हणजे **'दॅलॅगासांव दॅ फाझेंद'** समजली जाते.

ह्या पोटकचेऱ्यांतील एकंदर व्यवहाराची देखरेख करण्याकरतां एक मुख्य कामदार असतो त्याला **'सॅक्रॅतार्यु दॅ फाझेंद'** म्हणतात. वाळपई व असोळणें येथील ह्या खात्याच्या मुख्य कामदारांस **'दॅलॅगादुश् दॅ फाझेंद'** म्हणतात. ह्या खात्यांत पैशाची देवघेव करणारा एक खास कामदार असतो त्याला **'रेसेबेदोर'** म्हणतात.

## अबकारी

हें एक पोटखातें असुन, नारळी, काजू, ऊंस, खजुरी, ताडमाड, मोहाचीं फुलें वगैरेपासून होणाऱ्या दारूची गाळणी, विक्री वगैरेंवर देखरेख ठेवणें हें त्याचें काम आहे. (पृष्ठ १० वर ह्या पोटखात्याचा समावेश जकात खात्यांत केलेला आहे असें म्हटलें आहे तें चुकून पडलें आहे.)

गोव्यांत ठोकळ मानानें ७७॥ हजार नारळी सुरेस असतात. त्यांपैकीं सुमारें ७२ हजारांची सूर दारू करण्याकरितां, ५ हजारांची गूळ

करण्याकरितां आणि बाकी रोटी करण्याकरितां उपयोगांत येत असते. खजुरी, ताडमाड वगैरे दमण व दीव येथें सुरेस देण्यांत येतात. व उभय जिल्ह्यांत मिळून त्यांची संख्या ३५ हजारांवर असते. एकंदर पोर्तुगीज हिंदुस्थानांत मिळून सुमारें २॥ हजार दारू गाळण्याच्या भट्या असून १३०० देशी दारू विकण्याचे व २५० परदेशी दारू विकण्याचे गुत्ते आहेत. गुत्त्यांपैकीं १५० गुत्ते दमण व दीव जिल्ह्यांत असून बाकी १४०० गोव्यांत आहेत.

---

## धडा ३३ वा

# जकात खातें

## उद्योगधंदे व त्यांत गुंतलेले लोक

गोव्यांतील लोकांचा मुख्य धंदा शेतीचा आहे. शेतींत भातशेतीचा धंदा लहान प्रमाणांत म्हणजे गोव्यांतील लोकांस तीनचार महिने अन्न पुरवूं शकेल इतक्या प्रमाणांत असून नारळ, सुपारी, आंबे, काजू वगैरेंच्या लागवडीचा धंदाच मोठ्या प्रमाणांत आहे. त्याच्या खालोखाल मासे मारण्याचा व दारू गाळण्याचा हे धंदे आहेत.

गोव्यांतील लोक कलाकौशल्य आणि हरहुन्नर ह्यांत कमी प्रवीण आहेत असें नव्हे. तथापि अनेक कारणांनीं आणि मुख्यतः गोव्याचें क्षेत्र फारच लहान असल्यामुळें येथें कोणताही कलाकौशल्याचा धंदा मोठ्या प्रमाणांत चालणें अशक्यप्राय होऊन बसलें आहे. तरीही बारदेश आणि सासष्टी तालुक्यांत तांब्यापितळेचीं भांडीं बनवणें आणि खुर्च्या, टेबलें, कपाटें वगैरे लांकडी सामान तयार करणें हे धंदे बरे चालले आहेत. पणजी, म्हापसें व मडगांव येथें सोन्याचांदीचे दागिने घडवण्याचा धंदा भरभराटींत आहे. सांखळी तालुक्यांत डिचोलीच्या मातीचीं

व पितळेचीं भांडीं उत्तम तयार होत असतात. हीं मातीचीं भांडीं व लांकडी सामान ब्रिटिश हिंदुस्थानांत व युरोपांतही स्तुतीस पात्र झालेलीं आहेत. तथापि तीं तेथें क्वचितच विक्रीस जात असतात. मंगळुरी जातीचीं कौलें बनवण्याचा धंदा मयडें, सांवर्डे वगैरे गांवीं आणि लांकडी रंगीत फळें व भेंडीचीं फुलें तयार करण्याचे धंदे कळंगूट, मडगांव, कुंकळ्ळी, डिचोली वगैरे ठिकाणीं सुरू झाले आहेत. पेडणें व फोंडें तालुक्यांत चाकू, सुऱ्या, विळे वगैरे हत्यारें बरीं तयार होत असतात. सत्तरी तालुक्यांतील नाणूस गांवीं व सासष्टींतील कुंकळ्ळी गांवीं बांगड्या ओतण्याचा धंदा बऱ्याच प्रमाणांत चालला होता. पण तो आतां बसत चालला आहे. सासष्टींत व बारदेशांत फलसंरक्षणाचा धंदा उदयास येऊं पाहात आहे. पण ह्या धंद्यापासून उत्पन्न होणारा माल परदेशीं क्वचितच जातो. गोव्यांत तयार होणाऱ्या बुटांची व शिवल्या जाणाऱ्या कपड्यांची वाखाणणी युरोपियन लोकही करतात. त्यामुळें गोव्यांतील पुष्कळ बूट करणारे चांभार व शिंपी, त्याचप्रमाणें युरोपियन वाद्यें वाजविणारे वाजंत्री हे ब्रिटिश हिंदुस्थानांत व युरोपांत आपल्या धंद्याचा जम बरा बसवितात. गोव्यांत पुस्तकांची बांधणीही चांगली होत असते.

**गोमंतकांत** सन १९२१ सालीं कोणत्या धंद्यांत किती लोक गुंतलेले होते त्याचे महत्वाचे आंकडे खालीं देण्यांत येत आहेत:—

१४५३९४ निरुद्योगी, ९१६८२ शेतकरी (त्यांत ६८८६ मालक, ३५११० मुंडकार व ४९६८६ मजूर आहेत.), ९०६२३ शेतीशिवाय इतर काम करणारे मजूर, ४०६९९ घरगुती नोकर, २३८२० जमीनदार (त्यांपैकीं १७३८४ शंभर रुपयांखालीं वार्षिक उत्पन्न घेणारे आहेत.), १३६५४ विद्यार्थी (हा आंकडा हल्लीं निदान ५ हजारांनीं तरी वाढलेला आहे.), ११५१२ कोळी (म्हणजे मासळी मारणारे व विकणारे),

५४९६ लहानमोठे व्यापारी, ३९८९ भंडारी, २७६० होडीवाले, २५२१ सरकारी बिनलष्करी कामदार (त्यांत १६५ पेन्शनर आहेत), २२३६ सुतार, २२२८ सोनार, २१९८ शिंपी, १९०९ महार, १८७९ स्वैंपाकी, १८६६ पाथरवट, १७५० सरकारी लष्करी कामदार (त्यांत २०३ पेन्शनर आहेत), १६५७ धोबी, १६५३ खासगी कारकून, १६१४ कुंभार, १३६३ चांभार (त्यांत ३३८ बूटं करणारे आहेत), १३०७ गुराखी, ११८४ खटारेवाले, ११०७ लोहार, ९०३ शिवणकाम करणाऱ्या बाया, ८११ न्हावी, ७१३ पाववाले, ६३१ भिक्षेकरी, ४८१ वाजंत्री व बँडवाले ४४० करवती, ४१३ गुत्तेवाले, ४०५ कलावंतिणी, ३७० सोलपी, २५३ दूधवाले, १९२ खासगी शिक्षक, १०७ ताम्हण व उरणारे इतर धंदेवाले.

## आयात—निर्यात

एकाद्या प्रांतांत अगर देशांत दुसऱ्या प्रांतांतून अगर देशांतून येणाऱ्या मालास **आयात माल** व प्रांतांतुन अगर देशांतुन बाहेर जाणाऱ्या मालास **निर्यात माल** असें म्हणतात. आयात मालांतील बहुतेक माल देशांतील लोकांच्या वापराकरितां असतो. पण कांहीं माल पुन्हा निर्गत होत असतो. सन १९२७ सालीं पोर्तुगीज हिंदुस्थानांतील लोकांच्या **वापराकरितां** कोणता माल **आयात** झाला त्याचे आंकडे पुढें दिले आहेत:—

| **मालाचें नांव** | **किंमत रुपये** | **मोजमाप** |
|---|---|---|
| तांदूळ | ३०६६७९९ | १२७९६९खंडी(२०कुडव) |
| कापसाचें कापड | २०९९०६१ | ४६३७८३ शेर |
| भात | ९३२०७५ | ८१६०२ खंडी |
| साखर | ८४९८७२ | ३४७१६९८ शेर |
| हिंदी तंबाकू | ५७१५६३ | ६०१०७४ शेर |
| पेत्रोल | ४२४९८४ | ७१७३२४ ग्यालन |
| गव्हांचें पीठ | ३६८४७९ | १८७४२७१ शेर |
| गुरें | ३४१९७५ | १३६२८ नग |
| कडधान्य | ३०१०३७ | १५४५० खंडी |

| मालाचें नांव | किंमत रुपये | मोजमाप |
|---|---|---|
| गूळ | २९८२१४ | ११७६५०९ शेर |
| परदेशी औषधें | २८०९२५ | — |
| मोटारी व लॉऱ्या | २५११२४ | १०८ नग |
| गाझोलीन | २३७८४३ | ४८९३२७ किलोग्राम |
| रेशमी वस्त्रें | २३०९५४ | ७६९५ शेर |
| सामानाचें लांकूड | २३०२८१ | ८३५६ टन |
| गहूं | १८११२६ | ८४५६ खंडी |
| लोंकरीचें कापड | १६२२४८ | ४०१३० शेर |
| शेतीचीं व उद्यमीय यंत्रें | १५६०४१ | — |
| कौलें | १३९५२६ | ३१६०३६९ नग |
| लांव मिरच्या | १३३४१९ | ३९८७६३ शेर |
| पोर्तुगालची दारू | ११११७९ | ३६७०९ ग्यालन |
| हिंदी तूप | १०९०६१ | ६०७७५ शेर |
| कपड्याचा साबण | ९२४८० | २२८५१४ शेर |
| बाजरी | ९२३०७ | ४१३० खंडी |
| चहा | ९१७८६ | ४७९३३ शेर |
| आगपेट्या | ९०७०२ | ९७५६० ग्रोस |
| परदेशी तंबाकू | ७९२८८ | १६९७६ शेर |
| सेव्हेंज्य (बीर दारू) | ७८४९४ | २७५६५ ग्यालन |
| सोनें-रुपें (लगडी व नाणें) | ६७४६० | — |
| परदेशी चिरूट व सिगारेट | ६६२३४ | ७५१० शेर |
| परदेशी दारू व मादक पेयें | ६४६४९ | ४३८४ ग्यालन |
| मोटारींचे टायर व ट्यूब | ६०४३४ | ११५०० शेर |
| नाचणे | ५९९९६ | ३९०० खंडी |
| सुवासिक, खनिज व इतर तेलें | ५४५०३ | ७०९६६ ग्यालन |
| कमावलेलीं व इतर चामडीं | ४७०५० | २१५०२ शेर |

| मालाचें नांव | किंमत रुपये | मोजमाप |
|---|---|---|
| परदेशी तूप | ४५९०८ | ३४१०० शेर |
| मेणबत्त्या | ४३६६२ | ५१६३४ शेर |
| बटाटे, कांदे वगैरे | ४१४०२ | २५५७५४ शेर |
| कोथंबीर | ३७६६९ | १३५८२० शेर |
| जोंधळा | ३५०५५ | २१२५ खंडी |
| अंगास लावण्याचा साबण | १८८६१ | ११३०१ शेर |
| सणी कापड | १५२४३ | ४३१२ शेर |
| घोडे | ५००० | ५८ नग |
| हिंदी विड्या | ४०८४ | ११२९ शेर |
| इतर किरकोळ जिन्नस | ४१५२७३६ | — |
| एकूण | १६८२३५८९ | |

ह्या मालापैकीं कोणत्या देशांतून किती रुपयांचा व मुख्यतः कसला माल आला तें पुढें दिलें आहे:—

| देश | | किंमत रुपये | मुख्यतः येणारा माल |
|---|---|---|---|
| ब्रिटिश हिंदुस्थान | मुंबई | ९१५७०३७ | तांदूळ, भात व इतर हरेक जिन्नस. |
| | कराची | १६४०९०१ | भात, तांदूळ, बटाटे, कडधान्य, गहूं. |
| | मद्रास | ६७०९२५ | वेलची, भात, तांदूळ, बटाटे, चहा, कॉफी (बुंद) |
| | काठेवाड | १७९३२२ | तांदूळ, घोडे, नाचणे, बाजरी. |
| | बंगाल | १३१६७३ | गोणपाट, कोळसा, चहा. |
| इंग्लंड | | १३६०५८७ | खतें, डांबर, सुया, आल्बम्स्, व्हिस्की, लोंकरीच्या टोप्या, सिमेंट, बूट, दिवे, पेनें, फिल्म्स्, पेपरमिंट, तूप, औषधें, साबण, चिरूट, कपडा, यंत्रें. |
| रंगून (ब्रह्मदेश) | | १२८३००४ | तांदूळ, मेणबत्त्या, पेट्रोल, गहूं. |
| जावा | | ६७२०१४ | साखर, मसाल्याचे जिन्नस. |

| देश | किंमत रुपये | मुख्यतः येणारा माल |
|---|---|---|
| अमेरिका | ४४१०७६ | औषधें, लोखंडी सामान, गाझोलीन, सुवासिक तेलें, मोटारी व त्यांचें सामान. |
| फ्रान्स | २८६७२६ | सुवासिक तेलें, बंदुका, मुलांचीं खेळणीं, आल्बम्स्, ब्रँडी, बूट, औषधें, कागद, तावदानें, साबण. |
| जर्मनी | २२२१८४ | स्लेटी व काड्या, रंग, बंदुका, सुया, आल्बम्स्, सेव्हेंज्य, दिवे, युरोपियन टोप्या, साखर, सूत, औषधें, कांच, साबण. |
| पोर्तुगाल | १६८७१२ | दारू, बूट, युरोपियन टोप्या, संरक्षित मांसे, पुस्तकें, औषधें, कागद. |
| जपान | १०१६१० | डाहाळ्या, कांचेचें सामान, कपडा. |
| स्वीडन | ७३००२ | आगपेट्या, लोखंडी सामान. |
| चीन | ५८७४६ | डाहाळ्या, फटाकड्या, साखर, चिनी मातीचीं भांडीं. |
| हॉलंड | ४७६६३ | जिनेव्ह दारू, मादक पेयें, खवा. |
| इटली | ४५१८३ | आल्बम्स्, धंद्यांचीं आउतें, युरोपियन टोप्या, बूट. |
| पोर्तुगीज वसाहती | ७९५० | भुइमूग, दारू, चणे. |
| पर्शिया | ७२५३ | बदाम, अक्रोड, द्राक्ष, खजूर, हिंग, पिस्ते. |
| इतर देश | २६८०२१ | युरोपियन टोप्या, कागद, आगपेट्या, साखर, तूप, औषधें. |

एकूण १६८२३५८९

ह्या एकंदर आयात मालापैकीं गोव्यांत १५४५९३२१ रुपयांची, दमणांत ५६१९८४ रुपयांची व दिवांत ८०२२८४ रुपयांची आयात झाली.

सन १९२७ साली पोर्तुगीज हिंदुस्थानांतून किती **निर्यात** झाली त्याचे आंकडे पुढें दिले आहेत:—

| जिन्नसाचें नांव | किंमत | मोजमाप |
|---|---|---|
| नारळ | १५९४०४२ | ४२३२०५८० नग |
| आंबे | ३७३३५६ | ९५४५१४० नग |
| मीठ | ३१३८४३ | ३१५९२८ मण |
| सुपारी | २९६४७६ | २४८६३ मण |
| सुकी मासळी | २३१७८६ | १५७९५ मण |
| खोबरें | १८९५९६ | १४९०८ मण |
| काजू | १७९९९८ | २२८१६ मण |
| खारी मासळी | १७५०७९ | ३४०७८ मण |
| काजू गर | ८५२९६ | ५२६७ मण |
| भिरंडाचीं व इतर सोलें | ५०९६१ | ८२३८ मण |
| कांदे | ४३५५६ | १७९०७ मण |
| अशुद्ध लोखंड किंवा मॅंगनीज | ३५७४५ | २४१४ टन |
| कोंबड्या व पेरू | २१७५३ | २१८१६ नग |
| पत्रावळी व द्रोण | २१४८४ | १७१९३०६६ नग |
| वांबू | २०१३५ | ३१६०५६ नग |
| जळाऊ लांकूड | १७४५० | ९८९ टन |
| चामडीं | १६६६८ | १२८५ मण |
| गाई व बैल | १२६०५ | ४७५ नग |
| अननस | ११८०३ | ११३०२७ नग |
| भात | ४९९६ | ३०२ खंडी |
| सुंभ | ४४१७ | १८१ मण |
| भेंडीची फुलें | ३६५१ | ६०५ मण |

| जिन्नसाचें नांव | किंमत रुपये | मोजमाप |
|---|---|---|
| अंडे | ३१४२ | ४८३ मण |
| खोबरेल | २४३९ | ८७४ ग्यालन |
| विणलेल्या झावळ्या (मर्ले) | २१४४ | ८८४३६ नग |
| डुकरें | १९९१ | ७३१ नग |
| रेडे व म्हशी | १९८० | ५४ नग |
| कापूस | १३१५ | १०६ मण |
| काजूची व इतर दारू | १२५१ | १६८२ ग्यालन |
| पपनसें | १००२ | १०२९७ नग |
| मेण | १००० | — |
| इतर किरकोळ जिन्नस | २३६१९० | — |
| एकूण | ४०४७१५० | |

ह्या एकंदर निर्यातीपैकीं ३६४५८१४ रुपयांचा माल गोमंतकांतून, १५०३४४ रुपयांचा माल दमणांतून व २५०९९२ रुपयांचा माल दिवांतून निर्यात झाला.

ह्या जिन्नसांपैकीं बहुतेक जिन्नस प्रत्यक्षतः ब्रिटिश हिंदुस्थानांत जात असतात. बांबू मुख्यतः बलुचिस्थानांतील क्वेटा गांवाला, काजूची दारू सिंगापूरला व पोर्तुगीज आफ्रिकेला आणि नारळ व लांकडी कोळसा हॉलंड देशांतील हँबर्ग बंदराला व इंग्लंड देशांतील लंडन शहराला जात असतो.

आयात व निर्यात व्यापार करणारे सुमारें ५॥ हजार लोक गोव्यांत आहेत. त्यांत गोमंतकीय हिंदूंचाच भरणा विशेष आहे. पण गोमंतकीयेतर हिंदु व्यापाऱ्यांची संख्या पांचशांवर असून एकंदर व्यापाराची एक तृतीयांश घडामोड त्यांच्यामार्फत होते असा अंदाज आहे.

आयात व निर्यात ह्यांचे आंकडे पाहिले म्हणजे सन १९२७ सालीं पोर्तुगीज हिंदुस्थानांत १२७७६४३९ रुपये किंमतीच्या मालाची

आयात अधिक झाली असें दिसून येतें. आयात-निर्यातीमध्यें प्रतिवर्षी सुमारें १। कोटी रुपयांची पडत असलेली ही तूट, जे लोक ब्रिटिश हिंदुस्थान, आफ्रिका वगैरे ठिकाणी उदरनिर्वाहार्थ जात असतात ते पाठवीत असलेल्या पैशांनीं भरून येते. अशा परदेशगमन करणाऱ्या लोकांची संख्या सुमारें १। लाख असून त्यांत खिश्चनांची संख्या विशेष आहे.

## जकात व जकात-नाकीं

आयात-निर्यात मालापैकीं बहुतेक पदार्थांवर त्यांचें मोजमाप अगर किंमत यांच्यामागें ठराविक प्रमाणांत सरकार जो कर घेत असतें, त्याला **जकात** म्हणतात. जकात वसूल करण्यासाठीं अगर मालाची तपासणी करण्यासाठीं सरकारनें कांहीं ठिकाणें नियोजित केलेलीं असतात त्यांना **जकात-नाकीं** म्हणतात.

पोर्तुगीज सरकारनें जकातीचीं,मुख्य नाकें, दुय्यम नाकें व पोटनाकें अशीं तीन जातींचीं नाकीं ठेवलीं असून पहिलीं दुसऱ्यांवर व दुसरीं तिसऱ्यांवर देखरेख ठेवीत असतात. त्यांना अनुक्रमें **आल्फान्दिग, दॅलॅगासांव द आल्फान्दिग** व **पोश्तु** अशीं नांवें आहेत. पोश्तु दोन जातींचे असून एकाला पोश्तु दॅ दॅश्पाश्रु व दुसऱ्यास पोश्तु दॅ फिश्कालिझासांव अशीं नांवें आहेत. आल्फान्दिग, दॅलॅगासांव व पोश्तु दॅ दॅश्पाशु येथें जकात घेण्यांत येत असते. व पोश्तु दॅ फिश्कालिझासांव हे नुसते माल चोरून नेऊं-आणूं नये म्हणून ठेवलेले असतात.

गोव्यांत कोठेंकोठें कोणत्या जातीचीं नाकीं आहेत तें पुढील तक्त्यांत दाखविलें आहे:-

| **आल्फान्दिग** | **दॅलॅगासांव** | **पोश्तु** |
|---|---|---|
| नवीन गोवें | — | शिकेरी व बाग (फि.) |
| | दोडामार्ग | हणकोणें,चंदेल व सालें (दॅ.);सिकेरव्हाळ, इब्रामपूर (फि.) |

| आल्फान्दिग | दॅलॅगासांव | पोस्तु |
| --- | --- | --- |
| | शापोरा | मोर्जी (फि.) |
| | सांखळी | कोडाळ, कुडचिरें, मावळिंगें, केळघाट व केळावडें (दॅ.); सुर्ल व वेळूस (फि.) |
| | सांव्हर्जून | तेरेखोल, सांव्हर्जून, न्हयबाग व तोर्शें (दॅ.); पालयें, खान्याबांद, उगें, फकीरपाटा व तोर्शें (फि.) |
| मुरगांव | — | खोल, माझ्यॉर धक्का व रेल्वे स्टेशन (फि.) |
| | तळपण | पोळें व सुपांगुडी (दॅ.); गाल्जिबाग, खोर्तीगांव, पालोलें, आगोंद व बुटपाल (फि.) |
| | वेतूळ | नुर्ये व फात्राडी (फि.) |
| कुळें | — | कुवेशी व नेत्रावळी (फि.); जून व नायकिणें (दॅ.) |
| | मोलें | तिनें (फि.) |

ह्याशिवाय दमण जिल्ह्यांत १ आल्फान्दिग व १२ पोस्तु आणि दीव जिल्ह्यांत १ आल्फान्दिग, १ दॅलॅगासांव व ७ पोस्तु आहेत.

पणजीचें आल्फान्दिग हो जकात खात्याची मुख्य कचेरी समजली जाते व तिला **दिरॅक्सांव द् आल्फान्दिग** असें म्हणतात.

---

## धडा ३४ वा

# बांधकाम खातें

देशांत ज्या सडका, पुल, कालवे वगैरे असतात. त्यांतील कांहीं सरकारनें, कांहीं म्युनिसिपालिट्यांनीं व कांहीं इतर सरकारनियंत्रित संस्थांनीं बांधलेले असतात. पोर्तुगीज हिंदुस्थानांत जे रस्ते किंवा पूल तालुक्याच्या आंतल्या आंतील गांव जोडणारे असतात त्यांच्या

बांधणी-दुरुस्तीचें काम सामान्यतः म्युनिसिपालिट्या आणि जे रस्ते किंवा पूल एक तालुका दुसऱ्या तालुक्यास जोडणारे असतात त्यांच्या बांधणी-दुरुस्तीचें काम सरकार करीत असतें. तथापि जरुरीप्रमाणें म्युनिसिपालिटी व सरकार हीं एकमेकांस मदत करूनही वाहतुकीच्या साधनांची बांधणी-दुरुस्ती करीत असतात.

पोर्तुगीज हिंदुस्थानांत ज्या सरकारी सडका आहेत त्यांची लांबी २१० मैल असून फक्त गोव्यांतील सडकांची लांबी १९३ मैल आहे. एकंदर पोर्तुगीज हिंदुस्थानांतील म्युनिसिपल रस्त्यांची लांबी ३६५ मैल आहे. गोव्यांतील पुलांपैकीं, तिसवाडी व अंत्रूज हे तालुके जोडणारा भाणस्तारीचा पूल, केपें व सांगें हे तालुके जोडणारा सांग्याचा पूल आणि केपें कसबा व कुडचडें उपनगर जोडणारा केपेंचा पूल हे महत्वाचे असून ते सरकारनें बांधले आहेत. असोळणें गांव व मडगांव शहर जोडणारा असोळणेंचा पूल सासष्टी म्युनिसिपालिटी बांधीत आहे. गोव्यांतील कालव्यांत चिवल, थिवीं व पारोडें येथील कालवे महत्वाचे आहेत.

पोर्तुगीज हिंदुस्थानांत ता. ३१ डिसेंबर १९२६ रोजीं असलेल्या मोटारींची संख्या ४२१ होती व १९२७ सालांत आणल्या गेलेल्या मोटारींचा आंकडा १०८ होता.

ह्या खात्याच्या मुख्याधिकाऱ्याच्या जागीं इंजिनीयर म्हणजे बांधकामाचें उच्च शिक्षण संपादन केलेला नागरिकच नेमला जातो. पोर्तुगीज भाषेंत ह्या खात्यास 'ऑब्रश् पूब्लिकश्' असें नांव आहे.

---

## धडा ३५ वा

# शेतकी व जंगल खातें

शेतकीच्या सुधारणेचे उपाय योजण्यासाठी पोर्तुगीज हिंदुस्थानचे ५ विभाग करण्यांत आले असून त्या प्रत्येकावर एकेक शेतकी-तज्ज्ञ

मुदतीच्या करारानें ठेवला आहे. ह्या विभागास 'झॉन आग्रीकुल' असें म्हणतात. ही विभागणी १९३० सालापर्यंत अंमलांत राहाणार असून पुढें अनुभवाप्रमाणें तींत फरक करण्यांत यावयाचा आहे.

पहिल्या विभागांत तिसवाडी, मुरगांव व सत्तरी; दुसऱ्यांत बारदेश, पेडणें व सांखळी; तिसऱ्यांत फोंडें व सांगे; चौथ्यांत सासष्टी, केपें व काणकोण आणि पांचव्यांत दमण, नगर हवेली व दीव ह्याप्रमाणें तालुके समाविष्ट करण्यांत आले आहेत. ह्या विभागांच्या कचेऱ्या अनुक्रमें पणजी, म्हापसें, बोरी, असोळणें व सिल्व्हासा येथें आहेत. करारी तज्ज्ञांच्या खर्चासाठीं सरकार ग्रामसंस्थांकडूनही मदत घेतें.

सरकारच्या सासष्टींतील खासगी जमिनीच्या उत्पन्नाची व्यवस्था पाहाणारा असोळणेंचा मामलेदार हाच चौथ्या विभागावरील अधिकारी आहे.

खास जंगलांच्या व्यवस्थेकरितां गोव्याचे १८ विभाग पाडून प्रत्येकाला 'झॉन फ्लॉरॅश्ताल' असें नांव दिलें आहे. ह्या प्रत्येक झॉनावर एकेक अधिकारी असून तो तें झॉन ज्या तालुक्यांत असेल त्या तालुक्याच्या मामलेदाराच्या देखरेखीखालीं जंगलाची व्यवस्था पाहात असतो. जंगलें नवीन काबिजादींत विशेष असल्यानें तेथील मामलेदारांना जंगलांच्या ह्या देखरेखीबद्दल जादा वेतन देण्यांत येत असतें. झॉन फ्लॉरॅश्तालच्या अधिकाऱ्याच्या देखरेखीखालीं शिपाई असतात त्यांना 'ग्वार्द फ्लॉरॅश्ताल' असें म्हणतात. गोव्यांत असे ग्वार्द फ्लॉरॅश्ताल ४२ आहेत.

## शेतकी-पतपेढी

लोकांचा पैसा व्याज देऊन ठेवून घेणें, जमीनजुमला, दागदागिने, जामीन वगैरेंच्या तारणावर लोकांस व्याजीं पैसा देणें, अल्प मोबदला घेऊन एकाचा पैसा दुसऱ्यास पोंचवणें आणि चलनी नोटा काढणें हे

व्यवहार करणाऱ्या संस्थेस **पेढी** असें म्हणतात. पोर्तुगीज भाषेंत तिला 'बांकु' असें नांव आहे. वरीलपैकीं पहिले दोन व्यवहार करणाऱ्या पेढीस, मराठींत **पतपेढी** व पोर्तुगिजींत 'कायश' अशी संज्ञा देतात.

शेतकऱ्यांस जमिनीच्या मशागतीसाठीं खतें व आउतें आणि बीबियाणें विकत घेण्याकरतां अल्प व्याजानें पैसा मिळावा, ह्या हेतूनें पोर्तुगीज सरकारनें सन १९२४ सालीं एक शेतकी-पतपेढी काढली आहे. पोर्तुगिजींत तिला **'कायश दु क्रॅदितु आग्रिकुल'** असें म्हणतात. ह्या पेढीच्या भांडवलासाठीं स्वतः सरकारनें १ लक्ष रुपयांपर्यंत रक्कम देऊं केली आहे. ह्या रकमेबद्दल सरकार पहिलीं १० वर्षे व्याज घेणार नसून पुढें दरसाल दर शेकडा ४॥ रुपये व्याज घेईल. म्युनिसिपालिट्या, ग्रामसंस्था, देवस्थानें व दीनसहाय्यक संस्था ह्यांनीं आपल्या जमिनी स्वखुषीनें विकल्या तर त्यांपासून मिळणारा पैसा, त्याचप्रमाणें त्या संस्था व्याजास लावीत असलेल्या रकमेच्या एक चतुर्थांशाइतका पैसा त्यांनीं ह्या पतपेढीच्या भांडवलास ४॥ टक्के व्याजानें दिला पाहिजे असें सरकारनें फर्माविलें आहे. 'बांकुं नासियॅानाल उल्त्रामारीनु' नांवाची निमसरकारी पेढी व तारटपाल खात्यांत असलेली द्रव्यसंग्राहक पतपेढी ह्यांनाही कांहीं पैसा शेतकी-पतपेढीच्या भांडवलासाठीं कायद्यानें द्यावा लागतो. ह्याशिवाय सरकारनें ह्या पतपेढीच्या भांडवलासाठीं भाग काढलेले असून त्या प्रत्येकाची किंमत ५० रुपये ठेवलेली आहे. ह्या भागाला **'ओब्रिगासांव'** असें म्हणतात. ह्या ओब्रिगासांवांचे 'आ' व 'बे' असे दोन वर्ग केले आहेत. पहिल्या वर्गाचीं ओब्रिगासांवें २० हप्त्यांनीं भरावीं लागतात. पहिले दोन हप्ते एकदम व पुढें दर हप्ता सहासहा महिन्यांच्या अंतरानें भरावा लागतो. दुसऱ्या वर्गाचीं ओब्रिगासांवें एकदम भरावीं लागतात. 'आ' वर्गाचीं ओब्रिगासांवें, जे नागरिक, देवस्थानें व ग्रामसंस्थादि संस्था सरकारास दरसाल ४८ ते ९९ रुपये शेतसारा भरतात त्यांनीं १, जे १००

ते २९९ पर्यंत भरतात त्यांनीं ३, जे ३०० ते ४९९ पर्यंत भरतात त्यांनी ५ व जे त्याहून जास्त भरतात त्यांनीं १० ह्याप्रमाणें आणि 'वे' वर्गाचीं ओब्रिगासांवें सरकारास पैशाची गरज लागेल त्या त्या वेळीं ग्रामसंस्था, देवस्थानें, दीनसहाय्यक संस्था वगैरेंनीं सरकार ठरवील तितकीं घेतलींच पाहिजेत. त्याबद्दल त्यांना ठराविक मजकुराचा एक कागद देण्यांत याव-याचा आहे. ह्या रकमेबद्दल 'आ' वर्गाच्या ओब्रिगासांवांच्या मालकांना ११ व्या वर्षापासून व 'वे' वर्गाच्या ओब्रिगासांवांच्या मालकांना दुसऱ्या महिन्यापासून ४॥ टक्के व्याज मिळावयाचें आहे. ह्याशिवाय कोणाही नागरिकास आपला पैसा ठेव म्हणून पतपेढींत ठेवतां येतो व त्याबद्दल त्याला ४॥ टक्के व्याज मिळतें.

ह्या पेढीची मध्यवर्ती कचेरी पणजी येथें असून प्रत्येक तालुक्यांत एकेक तालुका-कचेरी आहे. तालुका-कचेऱ्यांशिवाय पुढीलप्रमाणें स्थानिक कचेऱ्या आहेत:—

**तिसवाडी**—चोडण, पिर्येदाद, सांत इस्तेव्हांव, नेवरें, खोर्लीं, पणजी, सांत क्रूझ, मेर्से, भाटी व थोरलें गोवें.

**बारदेश**—पार्रा, म्हापसें, हणजूण, शिवोली, आसगांव, कोलवाळ, थिवीं, रेवोडें, हळदोणें, पोंबुर्पे, मयडें, साल्व्हादोर दु मून्दु (विठ्ठोण), उसकई, रेजमाग, कांदोळी, कळंगूट व साळगांव.

**सासष्टी**—वेर्णे, माजोर्डें, लोटली, राय, कुडतरी, वेताळभाटी, कोलवें, मडगांव, नावेली, बाणावली, वार्के, चिंचोणें, कर्मणें, कुंकळ्ळी, असोळणें व चांदर.

**मुरगांव**—व्हाश्कु द गाम, कुठ्ठाळ, वेळसांव व सां तॉमॅ.

**सांखळी**—सांखळी व डिचोली.

**फोंडें**—कुंडई, फोंडें व शिरोडें.

**सांगें**—सांगें व रिवण.

पेडणें, केपें व काणकोण ह्या तालुक्यांत स्थानिक कचेऱ्या नाहींत.

शेतकी–पतपेढीच्या **मध्यवर्ती कचेरीच्या अधिकारी मंडळांत** सरकारचे कायद्याचे सल्लागार, जमाबंदी, शेतकी व जमीन-मोजणी ह्या खात्यांचे मुख्याधिकारी, एक गॉव्हर्नादोर जरालनें नेमलेला लायक नागरिक व एक कायदेमंडळानें निवडलेला लोकनियुक्त सभासद ह्याप्रमाणें ६ जण असून सरकारचे कायद्याचे सल्लागार हे त्याचे अध्यक्ष व जमाबंदी खात्याचे मुख्याधिकारी हे उपाध्यक्ष आहेत. गॉव्हर्नादोर जरालनें नेमलेल्या व कायदेमंडळानें निवडलेल्या सभासदांची मुदत दोन वर्षांची आहे.

नगरहवेली, सत्तरी, सांगें, काणकोण व पेडणें ह्या तालुक्यांखेरीज इतर तालुक्यांतील पतपेढीच्या **तालुका-कचेऱ्यांच्या अधिकारी मंडळांत** सरकारी वकील किंवा दॅलॅगाद, सॅक्रॅतार्यु द फाझेंद, मध्यवर्ती कचेरीनें निवडलेला एक व गॉव्हर्नादोर जरालनें निवडलेला एक नागरिक आणि शेतकी खात्याचा तज्ज्ञ किंवा त्याच्या अभावीं तालुक्याचा मामलेदार ह्याप्रमाणें ५ जण असून सरकारी वकील हे ह्या मंडळाचे अध्यक्ष आहेत.

नगरहवेली, सत्तरी, सांगें, काणकोण व पेडणें येथील तालुका–कचेऱ्यांच्या अधिकारी मंडळांत तालुक्याचे मामलेदार, सॅक्रॅतार्यु द फाझेंद व दॅलॅगाद द साऊद ह्याप्रमाणें तीन सभासद असून मामलेदार हे मंडळाचे अध्यक्ष आहेत.

**स्थानिक कचेऱ्यांच्या अधिकारी मंडळांत** ज्यूंत लॉकालचा अध्यक्ष, ग्रामसंस्थेच्या व्यवस्थापक मंडळाचा अध्यक्ष, मध्यवर्ती कचेरीनें नेमलेले दोन नागरिक, पोर्तुगीज प्राथमिक शाळेचा शिक्षक व ग्रामसंस्थेचा कुळकर्णी ह्याप्रमाणें ६ जण असून ज्यूंत लॉकालचा अध्यक्ष हाच मंडळाचा अध्यक्ष आहे. कुळकर्ण्याला मंडळांत मताधिकार नाहीं.

ठिकाणदार, कूळ, मजूर वगैरेस ह्या पतपेढीकडून कायदेशीर हमी देऊन पैसा व्याजीं घेतां येतो. मात्र तो खतें, बी, गुरें, आउतें वगैरे शेतीच्या उपयोगी असणाऱ्या साधनांच्या खरेदीसाठीं किंवा पाट, घरें, वई वगैरेंच्या बांधणीसाठीं असावा लागतो. हा पैसा, जामीन किंवा जमीन, दागिना, पीक इत्यादींच्या तारणावर ५॥ पासून ८ पर्यंत टक्क्यांच्या व्याजानें १ पासुन १० पर्यंत वर्षांच्या मुदतीस मिळूं शकतो. १००० रुपयांपर्यंत रक्कम स्थानिक कचेरीकडून मिळूं शकते. त्यापेक्षां अधिक रक्कम घ्यावयाची असतां वरच्या कचेऱ्यांकडे मागणी करावी लागते. कर्जाच्या रकमा, मुदती व तारणें हीं कर्ज कोणत्या कारणासाठीं घेतलें जातें त्याप्रमाणें निरनिराळीं असतात.

---

## धडा ३६ वा

# तार-टपाल खातें

प्रजाजनांचीं पत्रें, पैसे, ठराविक वजनापर्यंत जिन्नस व तारा हीं एकमेकांस अल्प खर्चांत व झटपट पोंचतीं करणें आणि टेलिफोनची व्यवस्था पाहणें हें ह्या खात्याचें काम आहे. पोर्तुगीज भाषेंत ह्या खात्यास 'देरॅक्सांव दुश् कुरैयुश् इ तॅलॅग्रफुश्' असें म्हणतात.

पोर्तुगीज हिंदुस्थानांत तारा व टपाल हीं दोन्ही देण्याघेण्याची सोय असणाऱ्या कचेऱ्या ३६ असून फक्त टपालाची सोय असणाऱ्या आणखी ३६ कचेऱ्या आहेत. ह्या कचेरीस पोर्तुगीज भाषेंत **'यॅश्तासांव'** असें नांव असून पणजीस असणाऱ्या मध्यवर्ति कचेरीस **'यॅश्तासांव सेंत्राल'** असें नांव आहे. ह्या कचेऱ्या कोणत्या तालुक्यांत कोठकोठें आहेत तें पुढें दिलें आहे. ज्या ठिकाणाच्या नांवामागें * ही खूण असेल तेथें तारा व टपाल ह्या दोन्हींची सोय आहे व इतर ठिकाणीं फक्त टपालाची सोय आहे असें समजावें.

**तिसवाडी**—*पणजी, पणजी बंदर (मुंबईच्या बोटी लागणारें), *करंजाळें, चोडण, कुंभारजुवें, मंडूर, *पियेदाद, सांतु इस्तेव्ह व, *आगशी व *जुनें गोवें.

**बारदेश**—*म्हापसें, *हळदोणें, हणजूण, *अस्नोडें, आसगांव, *कळंगूट, *कोलवाळ, पावरी, *साळगाव, बिठ्ठोण, *शिवोली, *थिवीं व *वेरें.

**सासष्टी**—*मडगांव,*असोळणें,*चिंचोणें,*कुंकळ्ळी,*कुडतरी, लोटली, ओडली, *रायतूर, *राय व वेर्णे.

**मुरगांव**—*व्हाक्कु द गाम, मुरगांव बंदर,*कुठ्ठाळ व कांसावली.

**पेडणें**—*पेडणें व हरंवळ.

**सांखळी**—*सांखळी,*डिचोली, होंडें व केरी.

**सत्तरी**—*वाळपई, करंजोळ, कोडाळ व खोतोडें.

**फोंडें**—*फोंडें, महाशेल, *म्हार्दोळ व शिरोडें.

**सांगें**—*सांगें, भाटी, काले, कुडी, धारबांदोडें, मोलें, नेत्रावळी, किर्लपाल, रिवण व सांकोर्डें.

**केंपें**—*केंपें, बाळ्ळी व कुडचडें.

**काणकोण**—*काणकोण व आंजेदीव.

**दमण जिल्हा**—*सिल्व्हासा, *थोरलें दमण, धाकटें दमण व *नोरोली.

**दीव**—*दीव व गोगोला.

ह्याशिवाय रेल्वेच्या प्रत्येक स्टेशनावर तारा व पत्रें पाठविण्याची सोय असते.

टेलिफोनची व्यवस्था पणजी शहरांत साधारण झाली असून तेथून वाळपई व इतर कांही तालुक्यांचे कसबे येथें बोलण्याची सोयही झालेली आहे.

टपालांतून पाठवावयाच्या पत्रांचे दर त्यांची जात, वजन व मुक्काम त्यांच्याप्रमाणें निरनिराळे आहेत: हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत कार्डास एक पैसा, १५ ग्रामांपर्यंतच्या पाकीटबंद पत्रास २ पैसे, उघड्या पाकिटांतील पत्रास १ पैसा, पोर्तुगीज साम्राज्याच्या आंतल्या आंत वृत्तपत्रांस १ पै, ब्रिटिश हिंदुस्थानांत पाठवावयाच्या वृत्तपत्रांस १॥ पै वगैरे वगैरे. त्यांतील कोणत्याही जातीचें पत्र नोंदून म्हणजे रेजिस्तार करून पाठवावयाचें असतां वजनावर पडणाऱ्या पैशांबाहेर आणखी २ आणे द्यावे लागतात. पोर्तुगीज हिंदुस्थानांतल्या आंत पाठवावयाच्या तारांस १२ शब्दांपर्यंत ८ आणे, ब्रिटिश हिंदुस्थानांत पाठवावयाच्या तारांस १२ शब्दांपर्यंत १२ आणे व पुढें दर शब्दामागें २ पैसे याप्रमाणें दर आहेत. तार तांतडीची म्हणजे 'उर्जेंत' करावयाची असतां अनुक्रमें आणखी ८ व १२ आणे द्यावे लागतात.

## द्रव्यसंग्राहक पतपेढी

अडीअडचणीच्या प्रसंगीं उपयोगी पडण्यासाठीं आपल्या मिळकतींतून थोडाफार पैसा शिल्लक टाकण्याची बुद्धि जनतेंत उत्पन्न व्हावी आणि शिल्लक पैसा सुरक्षित राहून ठेवीदारास त्याचें व्याजही मिळावें ह्या हेतूनें पोर्तुगीज हिंदुस्थान सरकारनें 'द्रव्यसंग्राहक पतपेढी' नांवाचा एक खास पोटविभाग सन १९१६ च्या जूनपासून तारटपाल खात्यांत ठेवला आहे. ह्या पतपेढीस पोर्तुगीज भाषेत '**कायशा इकॉनॉमिक पॉश्ताल**' असें म्हणतात.

कोणाही स्त्रीपुरुषास आणि वयांत न आलेल्या मुलांसही ४ आण्यांपासून रक्कम सदर पेढींत ठेव म्हणून ठेवतां येते. मात्र कोणासही एका वर्षांत २५०० आणि एकंदरीत ५००० रुपयांपेक्षां अधिक ठेव ठेवतां येत नाहीं. ठेवी ठेवल्याच्या पावतीदाखल ठेवीदारास एक चोपडी देण्यांत येते व तिच्यावर प्रत्येक ठेव नोंदून दिली जाते.

ठेव ठेवल्या दिवसापासून ३० दिवसांनंतर दरसाल दर शेंकडा ३ रुपयेप्रमाणें ठेवीदारास व्याज देण्यांत येतें व हें व्याज ठेवीदारानें न घेतलें तर प्रतिवर्षाच्या डिसेंबरअखेर तें मुद्दलांत धरून त्याचेंही व्याज देण्यांत येतें. व्यक्तींप्रमाणेंच संस्था व सरकारी अधिकारी यांनाही सदर पतपेढींत ठेवी ठेवतां येतात. मात्र संस्थांस प्रतिवर्षी ५००० व एकंदरींत १२००० रुपयांपेक्षां जास्त रक्कम ठेवतां येत नाहीं आणि सरकारी अधिकाऱ्यांस व्याज मिळत नाहीं.

पतपेढींत ठेवलेली रक्कम व्याजासह सर्वच्या सर्व, फक्त व्याज किंवा रकमेचा कांहीं भाग ठेवीदारास पाहिजे तेव्हां मागून घेतां येतो. मात्र रकमेचा कांहीं भाग मागावयाचा असतां ८ आण्यांहून कमी रक्कम मागतां येत नाहीं. त्याचप्रमाणें परत घ्यावयाची रक्कम नवीन गोव्याच्या मध्यवर्ति कचेरींतून असली तर १००० आणि अन्य कोणत्याही पोटकचेरींतून असली तर ७५० रुपयांहून अधिक रक्कम एकाच वेळीं मागतां येत नाहीं. मागावयाची रक्कम १५ रुपयांपेक्षां कमी असली तर ती पतपेढीचें काम करणाऱ्या कोणत्याही टपाल-कचेरींत तावडतोब मिळूं शकते. पण त्यापेक्षां जास्त रक्कम घ्यावयाची असतां मध्यवर्ति कचेरीची परवानगी घ्यावी लागते. अशी परवानगी तारेनेंही मागतां येते.

ठेवीदारास दिलेली चोपडी त्याच्याकडून हरवली तर १० आणे भरून ती त्याला नव्यानें लिहून दिली जाते. ह्या पतपेढींतून सरकारी नोकरांस आपल्या वार्षिक पगाराच्या तीस शंभरांशांपर्यंत रक्कम ६ टक्के व्याजानें उसनवट घेतां येते.

धडा ३७ वा

## जमीनमोजणी व खनिज खातें

देशांतील जमिनीची मालकीवार मोजणी करून तिचे व घरें इत्यादिकांचे नकाशे तयार करणें आणि देशांतील धातूंच्या खाणी शोधून त्यांची शुद्धि, विक्री वगैरेंची व्यवस्था लावणें हें ह्या खात्याचें काम आहे. शिवोली, सुर्ल, रिवण, कुर्पे, नेत्रावळी, कोडेपार, तिवरें इत्यादि ठिकाणीं ह्या खात्यानें खाणी खणल्या असून त्यांतून प्रतिवर्षी सुमारें एक लाख रुपये किंमतीचें अशुद्ध लोखंड परदेशास पाठविण्यांत येत आहे.

---

धडा ३८ वा

## मुरगांव बंदर व रेल्वे खातें

मुरगांव बंदराची सुधारणा केली व रेल्वेचा म्हणजे आगगाडीच्या रस्त्याचा एक फांटा काढून तें ब्रिटिश हिंदुस्थानांतील रेल्वेशीं जोडलें तर गोव्याची सांपत्तिक उन्नतीही होईल आणि मुंबई शहराशीं स्पर्धा करणारें एक शहर पोर्तुगीज साम्राज्यांत असल्याचा अभिमानही वाहतां येईल अशा विचारानें पोर्तुगाल सरकारनें सन १८८० च्या सुमारास इंग्लंडांतील भांडवलवाल्यांस हीं कामें हातांत घेण्यास सांगितलें. त्याप्रमाणें सदर भांडवलवाल्यांनीं **'पश्चिम हिंदुस्थान पोर्तुगीज रेल्वे'** आणि **'सदर्न** (दक्षिणेकडील) **मराठा रेल्वे'** ह्या नांवांच्या दोन कंपन्या उभारल्या. पहिल्या कंपनीनें मुरगांव बंदराची सुधारणा व पोर्तुगीज सरकारच्या हद्दींतील रेल्वेच्या फांट्याची बांधणी हीं कामें करावीं आणि दुसऱ्या कंपनीनें ब्रिटिश हिंदुस्थानांत आवश्यक तेथें फांटे काढून, तेथें त्या काळीं असलेल्या 'जी आय. पी.' व 'मद्रास' ह्या कंपन्यांच्या रेल्वेशीं पोर्तुगीज हद्दींतील रेल्वे भिडवावी असें ठरलें.

पश्चिम हिंदुस्थान पोर्तुगीज रेल्वे कंपनी किंवा मुरगांव रेल्वे कंपनी आणि पोर्तुगाल सरकार ह्यांच्यामध्यें सन १८८१ च्या १८ एप्रिलला असा करार झाला कीं, कंपनीनें बंदराची सुधारणा व रेल्वेची बांधणी ह्यांच्यासाठीं प्रथम ८००००० पौंडांचें म्हणजे, १३॥ रुपये पौंडप्रमाणें १ कोटी ८ लक्ष रुपयांचें, भांडवल गुंतवावें व त्याबद्दल तिला पोर्तुगाल सरकारनें शेंकडा ५ रुपयेप्रमाणें ५ लक्ष ४० हजार रुपये व्याजादाखल आणि सुमारें ६४॥ हजार रु. कंपनीच्या इंग्लंडांतील कार्यालयाच्या खर्चासाठीं प्रतिवर्षी द्यावे. सदर भांडवल अपुरें पडून आणखी भांडवल गुंतवावें लागलें तर ह्या जादा भांडवलावर पोर्तुगाल सरकारनें कंपनीला ६ टक्के व्याज द्यावें, असेंही सदर करारानें ठरविण्यांत आलें होतें.

कराराप्रमाणें कामास प्रारंभ झाला. पण भांडवल पुरत नाहीं असें लगेच आढळून आल्यामुळें तें ५॥ लक्ष पौंडांनीं म्हणजे ७४। लक्ष रुपयांनीं वाढवावें लागलें. अर्थात् मूळ भांडवलावरील व्याज आणि कार्यालयाचा खर्च ह्यांच्या रकमेंत नुसत्या ह्या जादा भांडवलावरील ६ टक्के दरानें होणाऱ्या ४ लक्ष ४५॥ हजार रुपये व्याजाची भर पडून पोर्तुगाल सरकारला प्रतिवर्षी एकंदरींत १०॥ लक्ष रुपये कंपनीला देणें प्राप्त झालें.

मुरगांवपासून कुळेंपर्यंत रेल्वे बांधण्याचें काम १८८७ सालच्या जानेवारींत आणि तेथून पुढचें काम १८८८ च्या फेब्रुवारींत पुरें होऊन बंदर व रेल्वे ह्यांच्यावरील रहदारी चालू झाली. व तिच्यावर देखरेख ठेवण्याकरतां सरकारनें मुरगांव बंदर व रेल्वे हें खातें निर्माण केलें. पण बंदर आणि रेल्वे ह्या उभयतांपासून होणाऱ्या उत्पन्नांतून त्याच्या वसु-लीचा व देखरेखीचा खर्च काढला तर व्याजाच्या फेडीकरतां लक्ष दीड लक्ष रुपयांपेक्षां फारशी अधिक रक्कम मिळत नाहीं असें १८८८ पासून १९०२ पर्यंतच्या १५ वर्षांत अनुभवास आलें ! सन १८९६

साली तर सरकारास व्याजाच्या रकमेबाहेर आणखी सुमारें पाऊण लक्ष रुपये वसुली व व्यवस्था ह्यांच्यासाठीं पदरचे घालावे लागले. बंदर व रेल्वे ह्यांच्यापासून जें उत्पन्न येईल त्यांतून त्याच्या वसुलीचा खर्च आणि कंपनीला द्यावें लागणारें व्याज हीं वजा करून फायदा राहिला तर त्याचा विवक्षित भाग कंपनीला द्यावा असेंही १८८१ च्या करारानें ठरलें होतें. पण व्याजाच्या फेडीस अवश्य असलेल्या रकमेच्या एक-दोन दशांशांइतकेंदेखील जेथें उत्पन्न होणें मुष्किलीचें तेथें कंपनीला नफ्याचा हिस्सा कोठून मिळणार ? अशी स्थिति होण्याचें मुख्य कारण म्हणजे जी. आय्. पी. व मद्रास ह्या रेल्वे कंपन्यांनीं सदर्न मराठा व मुरगांव ह्या कंपन्यांशीं केलेली स्पर्धा. पहिल्या दोन्ही कंपन्यांनीं आपले वाहतुकीचे दर एकदम कमी केल्यामुळें, मुंबईपेक्षां मुरगांव बंदरला जवळ असणाऱ्या ठिकाणींही मुंबईहून माल नेणें अधिक स्वस्त पडूं लागलें. ह्यामुळें दुसऱ्या दोन्ही कंपन्यांची शेंडी पहिल्या दोन्ही कंपन्यांच्या हातांत कशी आहे तें सर्वांनाच कळून आलें. पण त्यांनीं तरी आपल्या वाहतुकीचे दर किती काल कमी ठेवावे ? तेव्हां अशी कल्पना निघाली कीं, 'मद्रास रेल्वे' व 'सदर्न मराठा रेल्वे' ह्या कंपन्या 'मद्रास आणि सदर्न मराठा रेल्वे' ह्या नांवानें एकत्रित कराव्या आणि पश्चिम हिंदुस्थान पोर्तुगीज रेल्वेच्या सर्व कामांची व्यवस्थाही त्या एकत्रित कंपनीकडेच सोंपवावी. ही कल्पना सर्वांना हितकर असल्यानें ती १९०२ च्या आगस्ट महिन्यांत अंमलांत आली. सदर वर्षी कंपनी व सरकार ह्यांच्यामधील करारांत अर्थात् अनेक फेरफार करण्यांत आले. त्यांतील महत्वाचा फेरफार म्हणजे बंदराच्या सुधारणेसाठीं जीं कामें करावयाचीं तीं, सरकारची मंजुरी मिळाली तरच कंपनीनें करावीं असें ठरलें हा होय. हा करार केल्या वेळेपासून म्हणजे सन १९०३ पासून मुरगांव बंदर व रेल्वे ह्यांचें उत्पन्न सारखें वाढत जाऊं लागलें. सन १९२७ सालीं, एकंदर खर्चवेंच जा जातां १०९५७१० रुपये शिल्लक पडली. अर्थात् कंपनीला द्याव-

यांच्या व्याजाचे १०॥ लक्ष रुपये काढले तर सरकार व कंपनी ह्यांना आपसांत विभागून घेण्यासाठीं ४५७१० रुपये नफा मिळाला.

रेल्वे बांधून झाल्यास लोटलेल्या ४० वर्षांच्या काळांत नफा मिळालेलें १९२७ हें पहिलें साल असलें तरी तो पुढें वाढत जाईल अशी आशा बाळगण्यास हरकत नाहीं. मुंबईहून मंगळूरपर्यंत येरझारा करणाऱ्या बोटी मुरगांवास नियमितपणें लागतात. मुरगांव बंदर आणि परदेश ह्यांच्यामध्यें नियमित येरझारा करणाऱ्या बोटी नाहींत. तथापि अनियमितपणें येरझारा करणाऱ्या बोटींची संख्या वाढल्या प्रमाणांत असून त्या मानानें रेल्वेचें उत्पन्नही वाढत आहे. सन १९२३ सालीं परदेशाहून आलेल्या मोठ्या बोटींची संख्या २७ होती, ती १९२७ सालीं ७२ वर आली. आज एकदम ४ मोठ्या बोटी धक्क्यास लावतां येतील इतका बंदराचा विस्तार झाला असून माल झटपट चढविण्या-उतरविण्याच्या सोयीही करण्यांत आल्या आहेत. बोटींकडून घेण्यांत येणारें बंदरभाडें त्यांची वाहतूक, शक्ति व वेळ ह्यांच्याप्रमाणें निरनिराळें असतें.

पश्चिम हिंदुस्थान रेल्वेच्या फांट्याची लांबी ५२ मैल आहे. ( ह्या फांट्यावर किती स्टेशनें आहेत त्यांची माहिती पहिल्या भागांत देण्यांत आली आहे.)

ह्या खात्याचा मुख्याधिकारी इंजिनीयर म्हणजे बांधकामाचें वरिष्ठ शिक्षण घेतलेला असावा लागतो व त्यांतील सर्व कामदार वर्ग हा प्रस्तुत तज्ज्ञ खातें, बांधकाम खातें आणि मुरगांव शहरसुधारणा मंडळ ह्या तिघांना सामान्य असतो.

४०४५.

धडा ३९ वा

# लष्कर खातें

सरकारी लष्कराचे मुख्य दोन विभाग केलेले असतात. एक विभाग, ज्या वेळीं बाहेरच्या अगर देशांतील लोकांकडून युद्ध किंवा बंड केलें जातें, त्याच वेळीं उपयोगांत आणला जातो. ह्या विभागास **राखीव सैन्य** असें नांव असतें. दुसरा विभाग हा देशांतील नागरिकांच्या जीविताचें व मालमत्तेचें संरक्षण करण्याच्या आणि शांतता राखण्याच्या कामांत नित्य गुंतविलेला असतो. ह्या विभागास **पोलीस** असें नांव असतें.

सरकारी सैन्यापैकीं कांहीं सैन्य जमिनीवर, कांहीं समुद्रावर म्हणजे लढाऊ जहाजांवर आणि कांहीं वातावरणांत म्हणजे विमानांतून काम करीत असतें. जमिनीवर काम करणाऱ्या सैन्यास **भूमिदल**, समुद्रावर काम करणाऱ्या सैन्यास **समुद्रदल** आणि वातावरणांत काम करणाऱ्या सैन्यास **वायुदल** असें म्हणतात.

भूमिदलपैकीं कांहीं सैन्य पायीं लढाई करतें, कांहीं घोड्यांवर बसून करतें आणि कांहीं तोफा डागतें. पायीं लढणाऱ्या दलास **पायदळ**, घोड्यांवर बसून लढणाऱ्या दलास **घोडदळ** आणि तोफा डागणाऱ्या दलास **तोफदळ** असें म्हणतात.

कोणत्याही प्रकारच्या सैन्यांतील लोकांचे त्यांच्या दर्जावरून **अंमलदार सैनिक** किंवा **ऑफिसियाल** आणि **साधे सैनिक** असे दोन वर्ग करतात. ह्या दोन्ही वर्गांतील, वरिष्ठापासून कनिष्ठापर्यंतच्या अनुक्रमानें, निरनिराळे हुद्दे पुढीलप्रमाणें आहेत.

**अंमलदार वर्गांतील हुद्दे**:-जॅनॅराल, कॉरॉनॅल, तॅनॅन्तिकॉरॉनॅल, माझ्यॉर, कापितांव, तॅनॅन्ति व आल्फॅरिश्.

**बिनअंमलदार वर्गांतील हुद्दे**:-सार्जॅन्तु, सेगून्दु सार्जॅन्तु, कावु, सेगून्दु कावु व सॉल्दादु किंवा शिपाई.

गोवा सरकारकडे राखीव सैन्याच्या २ तुकड्या असून त्यांपैकीं एक नवीन गोवें येथें व एक बाळपई येथें असते.

नवीन गोवें येथें असलेल्या तुकडीत समुद्रदळ, तोफदळ, घोडदळ व पायदळ असे विभाग असून समुद्रदळांत १, तोफदळांत ३, घोडदळांत ३, व पायदळांत ५४ त्याप्रमाणें ६२ अंमलदार आहेत. त्या ६२ अंमलदारांपैकीं ३९ युरोपियन व २३ हिंदी आहेत.

पोलिसी बंदोबस्ताकरितां गोव्याचे तीन मुख्य विभाग पाडून त्या प्रत्येकावर पोलिसांची एकेक तुकडी ठेवलेली आहे. व पुन्हा त्या मुख्य विभागांचे ९ पोटविभाग पाडून प्रत्येकावर पोलीसतुकडीचा एकेक भाग ठेवलेला आहे. हे विभाग व पोटविभाग कोणते आणि कोणत्यावर पोलीसतुकडीचे किती विभाग ठेवलेले आहेत तें पुढील तक्त्यांत दाखविलें आहे:-

| विभाग | तालुके | पोटविभाग | पैकीं |
|---|---|---|---|
| १ म्हापसें | पेडणें<br>बारदेश<br>सांखळी | ३ | १ पेडणें येथें<br>१ म्हापसें येथें<br>१ डिचोली येथें |
| २ पणजी | तिसवाडी<br>फोंडें | ४ | ३ पणजी येथें<br>१ फोंडें येथें |
| ३ मडगांव | मुरगांव<br>सासष्टी<br>सांगें<br>केपें<br>काणकोण | ५ | २ मडगांव येथें<br>१ सांगें येथें<br>१ केपें येथें<br>१ काणकोण येथें |

त्याशिवाय दमण व दीव जिल्ह्याच्या बंदोबस्ताकरितां दमण येथेंही एक विभाग ठेवलेला आहे. सत्तरी येथें राखीव सैन्याची तुकडी असते तीच पोलिसांचें काम करीत असते.

पोलीस खात्याचे खास असे ओफिसियाल नाहीत. तर राखीव सैन्यांतील ओफिसियालच पोलीस खात्याचेंही काम पाहात असतात. व त्याबद्दल त्यांना निराळा भत्ता असतो.

लष्करी कामदारांपैकीं अंमलदारांच्या नेमणुका वसाहतमंत्री व बिनअंमलदारांच्या नेमणुका गॉव्हर्नादोर जराल करीत असतो. लष्कर खात्याच्या मुख्याधिकाऱ्याला 'शॅफि दु इस्तादु मायॉर' असें नांव आहे.

---

## धडा ४० वा

# नाविक खातें

ह्या खात्याच्या कामाकरतां पणजी, मुरगांव, शापोरा, बेतूल व तळपणें अशा ५ ठिकाणीं एकेक ठाणें ठेवण्यांत आलेलें आहे; पणजी येथील ठाण्यावर एक कापितांव, मुरगांव येथील ठाण्यावर एक तॅनॅन्ति आणि इतर ठाण्यांवर एकेक सार्जेन्तु असे अधिकारी असून पणजीच्या ठाण्यावरील अधिकारी हाच नाविक खात्याचा मुख्याधिकारी असतो. ह्या खात्यांत ८ लष्करी लोक असून त्यांपैकीं ५ खास ह्या खात्याचे व शापोरा, बेतूल व तळपणें येथील ठाण्यांवरील अधिकारी हे तीन लष्करी खात्यांतले असतात व त्याबद्दल त्यांना ह्या खात्यांकडून पगाराबाहेर भत्ता मिळत असतो.

वातावरणाचें निरीक्षण करून वारे, वादळें, तुफानें, पाऊस वगैरे-संबंधींची माहिती लोकांस पुरविण्याकरतां व दीपगृहांवर देखरेख करण्याकरतां पणजी येथें एक **वेधशाळा** ठेवलेली आहे. तिच्यावरही हेंच खातें देखरेख ठेवीत असतें.

गोव्यांतील नद्यांतून लोकांना प्रवास व मालाची नेआण करता येण्यासाठीं सरकारनें ह्या खात्यांत '**नाव्हॅगासांव फ्लुव्हियाल**' ह्या नांवाचें एक पोटखातें ठेवून त्यामार्फत वाफेनें चालणाऱ्या बोटींच्या नियमित फेऱ्या चालविल्या आहेत. ( ह्या फेऱ्या कोठकोठें होतात

त्याची माहिती पहिल्या भागांत दिली आहे.) पण ४-५ वर्षांपूर्वी हें पोटखातें नाविक खात्यांतून तोडून त्याचा जमाखर्चादि व्यवहार स्वतंत्र करण्यांत आला. आणि आतां तें एकाद्या खासगी कंपनीकडे किंवा व्यक्तीकडे सोंपवावें असा आपला बेत असल्याचें सरकारनें जाहीर केलें आहे.

---

## धडा ४१ वा

# न्यायखातें

न्यायव्यवस्थेकरितां गोमंतकाचे पांच मुख्य विभाग पाडून प्रत्येक विभागास **कॉमार्क** असें नांव देण्यांत आलें आहे.

हीं पांच कॉमार्कें म्हणजे **तिसवाडी, बारदेश, सासष्टी, डिचोली व केपें** हीं होत.

**तिसवाडी कॉमार्कांत** जुवें व नावें ह्या फ्रेगेझी खेरीज करून तिसवाडी तालुक्यांतील इतर सर्व गांवें, बारदेश तालुक्यांतील रैजमाग, नेरूल, पिळर्ण व बिठ्ठोण ह्या फ्रेगेझी आणि वरगांव खेरीज करून फोंडें तालुक्यांतील इतर सर्व गांवें ह्यांचा अंतर्भाव होतो. ह्या कॉमार्काचें मुख्य ठिकाण **पणजी** शहर आहे.

**बारदेश कॉमार्कांत** तिसवाडी कॉमार्कांत येत असलेल्या व रेवेडें, असनोडें आणि थिवीं ह्या फ्रेगेझी खेरीज करून बारदेश तालुक्यांतील इतर सर्व गांवें आणि पेडणें तालुक्यांतील हळर्ण व इब्रामपूर हीं खेरीज करून इतर सर्व गांवें ह्यांचा अंतर्भाव होतो. ह्याचें मुख्य ठिकाण **म्हापसें** हें उपनगर आहे.

**सासष्टी कॉमार्कांत** पारोडें, असोळणें, कुंकळ्ळी व वेळ्ळी ह्या फ्रेगेझी खेरीज करून सासष्टी तालुक्यांतील इतर गांवें आणि मुरगांव तालुक्यांतील गांवें ह्यांचा अन्तर्भाव होतो. ह्या कॉमार्काचें मुख्य ठिकाण **मडगांव** उपनगर आहे.

**केपें कॉमार्कांत** केपें, सांगें आणि काणकोण ह्या तालुक्यांतील सगळीं गांवें, सासष्टींतील पारोडें, असोळणें, कुंकळ्ळी व वेळ्ळी ह्या फ्रेगेझी व अंजनीद्वीप ह्यांचा अन्तर्भाव होतो. ह्याचें मुख्य ठिकाण **केपें** कसबा हें आहे.

**डिचोली कॉमार्कांत** सांखळी व सत्तरी तालुक्यांतील सर्व गांवें, पेडणें तालुक्यांतील हळर्ण व इब्रामपूर हीं गांवें, फोंडें तालुक्यांतील वरगांव, तिसवाडी तालुक्यांतील जुवें व नार्वें ह्या फ्रेगेझी आणि बारदेश तालुक्यांतील रेवेडं, असनोडें व थिवीं ह्या फ्रेगेझी इतक्यांचा अन्तर्भाव होतो. ह्याचें मुख्य ठिकाण **डिचोली** हें गांव आहे.

ह्या पांच कॉमार्कांपैकीं तिसवाडी, बारदेश व सासष्टी हीं **१ ल्या वर्गाचीं** आणि केपें व डिचोली हीं **२ऱ्या वर्गाचीं** समजण्यांत येतात.

तिसवाडी व सासष्टी ह्या दोन कॉमार्कांत आणखी एकेक पोटविभाग असून त्याला **'इ्युल्गाद् मुनिसिपाल'** असें नांव आहे. तिसवाडी कॉमार्कांत येणारा इ्युल्गाद् मुनिसिपाल **फोंडें** येथें आणि सासष्टी कॉमार्कांत येणारा इ्युल्गाद् मुनिसिपाल **मुरगांव** येथें आहे.

ह्या कॉमार्कांचे व इ्युल्गादांचे लहानलहान विभाग पाडून प्रत्येक विभागाला **'फ्रेगेझी'** असें नांव दिलेलें आहे.

ह्या सर्व न्यायकचेऱ्यांची एक वरिष्ठ न्यायकचेरी पणजी येथें असून तिला **'रॅलासांव'** किंवा **वरिष्ठतर न्यायालय** असें नांव आहे.

एका न्यायकचेरीनें दिलेल्या निकालावर तिच्या वरिष्ठ कचेरीकडे तक्रार करतां येते. रॅलासांवाच्या वरची न्यायकचेरी पोर्तुगालांत असते. तिला **'सुप्रॅमु त्रिबुनाल दॅ इ्युश्तीस'** किंवा **वरिष्ठतम न्यायालय** असें नांव असतें व तिचा निकाल हा अखेरचा असतो.

दमण येथें एक कॉमार्क असून त्याच्या देखरेखीखालीं दीव येथें एक इ्युल्गाद मुनिसिपाल व नगरहवेली येथें एक **'इ्युल्गाद्**

**इंस्त्रुक्तोर** ' आहे. ह्या तिन्ही आणि चीन देशाजवळ असलेल्या माकाव व तिमोर ह्या पोर्तुगीज वसाहतींतील न्यायकचेऱ्या पणजीच्या रॅला-सांवास जोडलेल्या आहेत.

रॅलासांवांत ५ न्यायाधीश असतात व त्यांपैकीं एक मुख्य न्याया-धीश असतो. ह्या मुख्याला **रॅलासांवाचा अध्यक्ष** असें नांव असतें आणि त्याची नेमणूक ठराविक मुदतीकरितां वसाहतमन्त्र्या-कडून होत असते.

रॅलासांवांत एक सरकारी वकील असतो. त्याला **प्रोकुरादोर दा रॅपूब्लिक** असें नांव असतें. हा गॉव्हॅर्नादोर जरालचा कायद्याचा सल्लागार आणि रॅलासांवांतील न्यायाधीशांसमोर सरकारच्या हितसंबंधांस जपणारा त्याचा प्रतिनिधि असतो.

प्रत्येक कॉमार्कांवर एकेक न्यायाधीश आणि एकेक सरकारी वकि-लाचा प्रतिनिधि असतो. ह्या न्यायाधीशाला **कॉमार्कांचा न्या-याधीश** आणि प्रतिनिधीला **प्रोकुरादोराचा दॅलॅगाद** अशीं नांवें असतात. ह्या उभयतांचे बदली अधिकारीही असतात. **जमीननोंद-णीचें काम** ह्या दॅलॅगादांच्या देखरेखीखालीं त्यांच्या बदली अधिका-ऱ्यांकडे म्हणजे '**सुब्स्तितूत**'कडे सोपवलेलें असतें व त्याबद्दल त्यांना पगाराबाहेर त्या त्या मालकाकडून वेतन घेण्याचा अधिकार असतो.

रॅलासांव आणि कॉमार्क ह्यांचे न्यायाधीश आणि प्रोकुरादोर व त्याचा दॅलॅगाद हे बाशारॅल असावे लागतात, म्हणजे त्यांना पोर्तुगा-लांतील कायद्याचें उच्च शिक्षण असावें लागतें. म्हणुन त्यांच्या नेमणुका '**कोंसेल्यु सुपेर्योर इयुदिसियार्यु**' नांवाच्या मण्डळाच्या शिफारशी-वरून वसाहतमन्त्री करीत असतो. त्यांच्या बदली अधिकाऱ्यांच्या जागीं वकिलांची नेमणूक केली जाते.

प्रत्येक इयुल्गादावर एकेक न्यायाधीश ('**इयुईझ मुनिसिपाल**') आणि एकेक सरकारी **सुब्-दॅलॅगाद** असतो. मुरगांव व फोंडे

ह्या ज्युल्गादांचे न्यायाधीश बाशारॅल असावे लागतात व ह्या दोन्ही ज्युल्गादांचे सुब्-दॅलॅगाद आणि दीव येथील ज्युल्गादाचे न्यायाधीश व सुब्-दॅलॅगाद हे येथील वकिलीचें शिक्षण घेतलेले असले तरी चालतात.

फ्रेगेझीवर एकेक न्यायाधीश ('इयुईझ पोपुलार') आणि त्याचा एक कारकून असतो. हे कोणीही साक्षर नागरिक असले तरी चालतात व त्यांना पगार नसतो. अशा फ्रेगेझी तिसवाडी, सासष्टी व केपें ह्या कॉमार्कांत प्रत्येकी २३, डिचोली कॉमार्कांत २२ व बारदेश कॉमार्कांत २१ मिळून एकंदर ११२ आहेत.

ज्युल्गाद व फ्रेगेझी ह्यांच्यावरील न्यायाधीशांच्या नेमणुका म्युनसिपालिट्यांच्या शिफारशीवरून गॉव्हेर्नादोर जराल करीत असतो.

१ ल्या वर्गाच्या कॉमार्कांत दोनदोन आणि २ ऱ्या वर्गाचीं कॉमार्कें व ज्युल्गाद ह्यांतून एकेक **'ताबेलियांव'** नांवाचा अधिकारी असतो. खरेदीखत, विक्रीखत, गहाणखत, मृत्युपत्र वगैरेंचे व्यवहार त्याच्यासमक्ष व्हावे लागतात.पण त्याला पगार देण्यांत येत नसून ज्याचें काम असेल त्याच्याकडून ठरलेल्या प्रमाणांत वेतन घेण्याचा त्याला अधिकार असतो. तावेलियांवांच्या जागीं बाशारॅलांची नेमणूक व्हावी व अर्थातच ती वचाइतमंत्र्याकडून केली जावी असा कायदा अलीकडेच झाला आहे. पूर्वी त्या जागीं उमेदवारांची जाहीर परीक्षा घेऊन नेमणुका करण्यांत येत असत.

आजमितीस गोव्यांतील एकंदर **वकिलांची संख्या** सुमारें २०० असून त्यांपैकीं तिसवाडी तालुक्यांत ५०, बारदेशांत ६०, सासष्टींत ७५ व १५ इतर तालुक्यांत आहेत.

धडा ४२ वा.

# सरकार-सल्लागार मंडळ

सरकार म्हणजे काय तें मागें ४ थ्या धड्यांत सांगितलें आहे. सरकारसंस्थेला ' शासनसंस्था ' व ' राज्यसंस्था ' अशाही संज्ञा देतात. **शासनसंस्थांचे प्रकार** किंवा राज्यपद्धति तीन आहेतः एकसत्ताक, अल्पसत्ताक आणि प्रजासत्ताक.

ज्या पद्धतींत राज्याची सर्व सत्ता एकाच व्यक्तीच्या हातांत असून ती तिचा उपभोग नहाहयात व वंशपरंपरेनें घेते त्या पद्धतीस **एकसत्ताक राज्यपद्धति** म्हणतात. ज्या पद्धतींत राज्याची सर्व सत्ता कांहीं व्यक्तींच्या हातांत असून त्या तिचा उपभोग तहाहयात किंवा वंशपरंपरेनें घेतात त्या पद्धतीस **अल्पसत्ताक राज्यपद्धति** म्हणतात. आणि ज्या पद्धतींत राज्याची सर्व सत्ता प्रजेनें निवडलेल्या एका अगर अधिक व्यक्तींच्या हातांत असून त्या तिचा उपभोग प्रजेनें ठरवलेल्य कालापुरताच घेतात त्या पद्धतीस **लोकसत्ताक राज्यपद्धति** म्हणतात.

एकसत्ताक पद्धतीचे दोन प्रकार असूं शकतातः **अमर्यादित** किंवा **केवळ राजसत्ताक** आणि **मर्यादित** किंव **राजप्रजा. सत्ताक**. अमर्यादित एकसत्ताक पद्धतींत सत्ताधारी व्यक्तीला म्हणजे राजाला मन मानेल तसा कारभार हांकतां येतो. आणि मर्यादित एक· सत्ताक पद्धतींत राजाला राज्यकारभाराच्या कांहीं बाबतींत लोकांच्या प्रतिनिधींचा सल्ला घ्यावाच लागतो.

लोकसत्ताक राज्यपद्धतीचेही दोन प्रकार असतातः **एकतंत्री** आणि **संयुक्त**. मात्र हे प्रकार दोन किंवा अधिक राज्यें आपला संघ करूं इच्छितात तेव्हांच उत्पन्न होत असतात. दोन अगर अधिक राज्यांनीं आपला संघ केला म्हणजे तीं आपल्या वतीचे प्रतिनिधि निव-डून त्यांचें एक मध्यवर्ति सरकार बनवितात. राज्यकारभाराच्या कांहीं

बाबी ह्या मध्यवर्ति सरकारकडे व कांहीं बाबी त्या त्या राज्याच्या स्थानिक सरकारकडे सोंपवलेल्या असतात. अमुक इतक्या बाबी तेवढ्या स्थानिक सरकारच्या व इतर सर्व मध्यवर्ति सरकारच्या अधिकारांतल्या अशी जेव्हां विभागणी होते, म्हणजे, जेव्हां स्थानिक सरकारचे अधिकार मर्यादित असतात तेव्हां त्या पद्धतीस **एकतंत्री लोकसत्ताक पद्धति** म्हणतात. आणि अमुक इतक्या बाबी तेवढ्या मध्यवर्ति सरकारच्या ताब्यांत व बाकी सर्व स्थानिक सरकारच्या ताब्यांत असाव्या अशी जेव्हां विभागणी होते, म्हणजे, जेव्हां मध्यवर्ति सरकारचे अधिकार मर्यादित असतात तेव्हां त्या पद्धतीस **संयुक्त लोकसत्ताक पद्धति** असें म्हणतात.

पोर्तुगालांत दीडशें वर्षांपूर्वीपर्यंत केवळ राजसत्ताक पद्धति चालत होती. नंतर राजप्रजासत्ताक पद्धति चालू लागली व ता. ५ आक्टोबर १९१० रोजीं तेथें लोकसत्तेची स्थापना झाली. पोर्तुगालांत लोकसत्तेची स्थापना झाल्यामुळें त्याच्या वसाहतींत व अर्थात् पोर्तुगीज हिंदुस्थानांतही तीच पद्धति चालू झाली आणि पोर्तुगाल व त्याच्या वसाहती मिळून एक ' एकतंत्री प्रजासत्ताक राज्य ' अस्तित्वांत आलें.

लोकसत्तेची स्थापना झाल्यावर पोर्तुगालांतील उदारमतवादी राज्यसूत्रधाऱ्यांच्या मनांत वसाहतींचे राजकीय अधिकार वाढविण्याचें म्हणजे अधिकारविभागणी करण्याचें आलें व त्यांनीं लोकसत्तेच्या घटनेंतच तसें नमूद केलें. ता. १५ आगस्ट १९१४ रोजीं वसाहतींना राज्यव्यवस्था व जमाखर्च यांच्या बाबतींत स्वायत्तता दिली असल्याचें पोर्तुगाल सरकारनें जाहीर केलें व ता. २७ जुलै १९१७ रोजीं खास पोर्तुगीज हिंदुस्थानची ' स्वराज्याची सनद ' प्रसिद्ध केली. ह्या सनदेनुसार पोर्तुगीज हिंदुस्थानचा राज्यकारभार चालविण्याकरितां एक '**सरकार-सल्लागार मंडळ**' निर्माण करण्यांत आलें.

ह्या मंडळाचे गॉव्हेर्नादोर जराल हे अध्यक्ष असावे आणि त्यांत त्यांनीं नेमलेले ९ सरकारी अधिकारी व लोकांनीं निवडलेले १० प्रतिनिधि मिळून एकंदर २० सभासद असावे आणि १ जुलै १९१८ पासून तें अस्तित्वांत यावें असें पोर्तुगाल सरकारकडून फर्मावण्यांत आलें होतें. व त्यावरून सदर सालच्या मार्चमध्यें निवडणुकाही उरकून घेण्यांत आल्या होत्या. पण ज्या दिवशीं सरकार-सल्लागार मंडळाची स्थापना व्हावयाची त्याच दिवशीं म्हणजे ता. १ जुलै रोजीं पोर्तुगाल सरकारकडून तारेनें असा हुकूम आला कीं, सरकार-सल्लागार मंडळाची स्थापना दुसऱ्या हुकुमापर्यंत तहकूब करावी स्वराज्याचा तोंडापर्यंत आलेला हा घांस अशा रीतीनें ऐन वेळीं हिसकावून घेतल्याबद्दल गोव्यांतील राजकारणी लोकांस पोर्तुगाल सरकारचा फार राग आला व त्यांनीं सभाविनंत्यादिकांच्या द्वारें चळवळ चालवली. पण त्या वेळचे गॉव्हेर्नादोर कापितांव फ्रैतश् रिबैरु ह्यांनीं तिच्याकडे लक्ष दिलें नाहीं. आणि स्वमतानुसार अध्यक्षांसह १० सरकारी व ६ लोकनियुक्त सभासद ह्याप्रमाणें सरकार-सल्लागार मंडळाची घटना पोर्तुगाल सरकारकडून निश्चित करून घेऊन ता. ८ जानेवारी १९१९ रोजीं त्यांनीं त्याची प्रस्थापनाही केली. दुसरीकडे लोकांची चळवळ चालूच राहिली व थोडक्याच कालांत तिला यशही आलें. कारण, ता. २३ मे १९१९ रोजीं पोर्तुगाल सरकारनें का. रिबैरु ह्या गॉव्हेर्नादोरांना, राज्यसूत्रें का. बॉवॅल मॉत ह्यांच्या हातीं देऊन ताबडतोब पोर्तुगालास निघून यावें असा हुकूम केला. तसेंच का. मॉत ह्यांनाही त्यानें, १९१७ च्या सनदेनुसार १० सरकारनियुक्त व १० लोकनियुक्त सभासदांच्या ज्या निवडणुका झाल्या होत्या त्या कायम समजून ता. १ जुलै १९१९ पासून २० सभासदांचें सरकार-सल्लागार मंडळ अस्तित्वांत आणावें असें फर्मावलें व त्याप्रमाणें त्यांनीं सर्व व्यवस्था केली.

पण ही व्यवस्थाही एका वर्षाच्या आंतच पोर्तुगाल सरकारनें बदलली. म्हणजे सन १९२० च्या नोव्हेंबरांत सरकार-सल्लागार मंडळाची पुनर्घटना करून त्याला 'कायदेमंडळ' असें नांव दिलें. ह्या कायदेमंडळाची घटना, अध्यक्ष गॉव्हेर्नादोर ह्यांच्यासह ७ सरकारी अधिकारी व ११ लोकनियुक्त प्रतिनिधि, अशी होती. अर्थात् पोर्तुगीज हिंदुस्थानच्या राजकीय हक्कांत ही थोडी वाढच होती.

पण ह्या वाढीस सन १९२८ च्या मार्चमध्यें पोर्तुगाल सरकारनें फार काट मारली. इतकेंच नव्हे तर सन १९१७ साली दिलेल्या हक्कांतही बरीच घट केली. म्हणजे कायदेमंडळाचें नांव पुन्हा सरकार-सल्लागार मंडळ असें ठेवून त्याच्या घटनेंतही स्थानिक लोकसत्तेच्या दृष्टीनें पिछेहाट केली. ही पिछेहाटीची घटनाच आजमितीस चालू असून तदनुसार सरकार-सल्लागार मंडळांत गॉव्हेर्नादोरासह ५ सरकारी अधिकारी, ५ सरकारनें नेमलेले बिनअधिकारी आणि ५ लोकांनीं निवडलेले असे एकंदर १५ सभासद आहेत.

गॉव्हेर्नादोर जराल व प्रोकुरादोर दा रॅपूब्लिक आणि मुलकी व्यवस्था, बांधकाम व जमाबंदी ह्या खात्यांचे मुख्याधिकारी हे स. स. मंडळाचे अधिकारतः सभासद असून गॉव्हेर्नादोर जराल हे त्याचे अध्यक्ष आहेत. मंडळाला एक उपाध्यक्ष असतो व त्याची निवड गॉव्हेर्नादोर जराल अधिकारतः सभासद असणाऱ्यांतून एकेका वर्षाकरितां करीत असतो. ही निवड कायम होण्यास तिला वसाहतमंत्र्याची संमति मिळावी लागते. बिनअधिकारी सभासदांची नेमणूकही गॉव्हेर्नादोर जरालच लायक नागरिकांतून करीत असतो.

लोकनियुक्त ५ सभासदांपैकीं एक दमण व दीव ह्या जिल्ह्यांतर्फेचा, एक नवीन काबिजादींतील सातही तालुक्यांतर्फेचा व तीन जुन्या काबिजादींतील चारही तालुक्यांतर्फेचे असतात व ते त्या त्या विभागांतील मतदारांनीं निवडून दिलेले असतात.

सरकारनें नेमलेल्या आणि लोकांनीं निवडलेल्या सभासदांस वेतन नसतें. पण जे सभासद राजधानीबाहेर राहतात त्यांना प्रवासखर्च देण्यांत येतो.

**मतदानाचा अधिकार** वयांत आलेल्या व पोर्तुगिजीतून लिहितांवाचतां येणाऱ्या पोर्तुगीज नागरिकांसच तेवढा आहे.

वरील सर्व सभासदांस बदली सभासद असतात व ते मुख्यां-बरोबरच नेमले किंवा निवडले जातात. सरकारनियुक्त व लोकनियुक्त सभासदांच्या नेमणुका व निवडणुका दर दोन दोन वर्षांनीं केल्या जातात.

सरकार-सल्लागार मंडळाच्या **साधारण बैठकांच्या श्रेणी** प्रति-वर्षीं जानेवारी व फेब्रुवारी महिन्यांत एक आणि जुलै व आगस्ट महिन्यांत एक अशा दोन भरत असतात. ह्याशिवाय जरूर लागेल तेव्हां **असा-धारण बैठकाही** भरतात. ह्या दोन्ही प्रकारच्या बैठका अध्यक्षांकडून बोलावण्यांत येतात.

सरकार–सल्लागार मंडळाला कांहीं बाबींवर निर्णायक मत देतां येतें व इतर बाबींवर त्याला फक्त आपला अभिप्राय तेवढा व्यक्त करतां येतो. न्याय, लष्कर व नाविक हीं खातीं आणि स्थानिक सरकार व पोर्तुगाल सरकार किंवा स्थानिक सरकार व दुसऱ्या वसाहतींचीं सरकारें आणि परकी राष्ट्रें ह्यांच्याशीं संबंध येणाऱ्या बाबींसंबंधीं कायदेकानू करणें किंवा त्यांचा निर्णय लावणें हीं कामें मध्यवर्ति म्हणजे पोर्तुगाल सरकार-कडे राखून ठेवण्यांत आलीं असून केवळ पोर्तुगीज हिंदुस्थानाशीं संबंध असणाऱ्या प्रश्नांसंबंधीं कायदे करण्याचें काम तेवढें सरकार–सल्लागार मंडळाकडे सोंपवण्यांत आलें आहे. पण ह्याही प्रश्नांच्या बाबतींत अखेरची सत्ता वसाहतमंत्र्याच्याच हातीं असते. म्हणजे स. स. मंडळानें पास केलेले ठराव किंवा कायदे वसाहतमन्त्र्यास तहकूब किंवा रद्द करतां येतात. स. स. मंडळ व गॉव्हर्नादोर जराल ह्यांच्यांत मतभेद झाल्यास मतभेदाच्या बाबीचा निकाल

वसाहतमन्त्री, वसाहतींच्या वरिष्ठ मण्डळाचा सल्ला घेऊन, लावीत असतो. ज्यांच्यामुळें खर्च वाढेल असे ठराव लोकपक्षीय सभासदांस आणतां येत नाहींत.

स. स. मंडळाच्या सभासदांपैकीं गॉव्हेर्नादोर जराल, प्रोंकुरादोर दा रॅपूब्लिक, एक सरकारनें नेमलेला सभासद व दोन लोकनियुक्त सभासद अशा पांच जणांचा एक **खास विभाग** असतो व स. स. मंडळानें केलेल्या ठरावांबरहुकूम नियमावलि तयार करण्यासारखी अंमलबजावणीच्या स्वरूपाचीं कामें त्याच्याकडे देण्यांत आलेलीं असतात. ह्या खास विभागाचे अध्यक्ष गॉव्हेर्नादोर जराल हे असून त्याच्या बैठका जरुरीप्रमाणें त्यांच्याकडून बोलावण्यात येत असतात. खास विभागाच्या बिनसरकारी सभासदांची नेमणूक हीं एकेका वर्षापुरतीं असतात. पोर्तुगीज भाषेंत स. स. मंडळास **'कोंसेल्यु दु गोव्हेर्नु'** आणि त्याच्या खास विभागास **'सॅक्सांव इश्पेसियाल** दु कोंसेल्यु दु गोव्हेर्नु' अशीं नांवें आहेत.

गॉव्हेर्नादोर जरालच्या कृत्यांविरुद्ध तक्रार करावयाची असतां ती पोर्तुगालांत असणाऱ्या वसाहतींच्या वरिष्ठ मंडळाकडे करावी लागते.

---

### धडा ४२ वा

## गॉव्हेर्नादोराचें सल्लागार मंडळ

गॉव्हेर्नादोर जरालच्या मदतीस जसें सरकार-सल्लागार मंडळ आहे, तसेंच प्रत्येक जिल्ह्याच्या गॉव्हेर्नादोराच्या मदतीसही एकेक मंडळ आहे. ह्या मंडळास पोर्तुगीज भाषेंत **'कोंसेल्यु दॅ दिश्त्रीक्तु'** असें म्हणतात.

**गोवा जिल्ह्याच्या कोंसेल्यु दॅ दिश्त्रीक्तुमध्यें** पुढील-प्रमाणें सभासद असतात:-(१) अंतर्गत व्यवस्थाविषयक खात्यांच्या मुख्याधिकाऱ्यांपैकीं गॉव्हेर्नादोर जरालनें प्रतिवर्षी नेमलेला कोणीतरी

एक मुख्याधिकारी, (२) तिसवाडी कॉमार्कीचा दॅलॅगाद, (३) आरोग्य खात्याचा दुय्यम मुख्याधिकारी, (४) बांधकाम खात्याचा दुय्यम मुख्याधिकारी, (५) जमाबंदी खात्याचा दुय्यम मुख्याधिकारी, (६) तिसवाडी म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष, (७) व्यापारी व उद्यमीय संघांनीं निवडलेला एक प्रतिनिधि, (८) गोव्यांतील नागरिकांपैकीं जास्तींत जास्त कर भरणाऱ्या ६० नागरिकांनीं निवडून दिलेला एक प्रतिनिधि, (९) जमीनदार व शेतकरी ह्यांच्या संघांनीं निवडून दिलेला एक प्रतिनिधि आणि (१०) सरकार-सल्लागार मंडळाच्या सभासदांनीं निवडून दिलेला एक प्रतिनिधि.

**दमण व दीव येथील कोंसेल्यु दॅ दिश्त्रीक्तुची घटना** पुढीलप्रमाणें आहे:—(१) जिल्ह्याचा गॉव्हॅर्नादोर, (२) जिल्ह्यांतील मुलकी व्यवस्था खात्याचा वरिष्ठाधिकारी, (३) जिल्ह्यांतील दॅलॅगाद, (४) बांधकाम खात्याचा जिल्ह्यांतील वरिष्ठाधिकारी, (५) आरोग्य खात्याचा प्रतिनिधि, (६) जमाबंदी खात्याचा प्रतिनिधि, (७) म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष आणि (८ व ९) दोन लोकांचे प्रतिनिधि.

दमण व दीव येथील कों. दॅ दिश्त्रीक्तुचा अध्यक्ष जिल्ह्याचा गॉव्हॅर्नादोर हा असून गोवा जिल्ह्याच्या कों. दॅ. दिश्त्रीक्तुचा अध्यक्ष अंतर्गत व्यवस्था खात्यांच्या मुख्याधिकाऱ्यांपैकीं प्रतिवर्षीं नेमण्यांत येणारा मुख्याधिकारी आहे.

एकंदर पोर्तुगीज हिंदुस्थानास अनुलक्षून करण्यांत आलेल्या कायदेकानूंची आपापल्या जिल्ह्यापुरती अंमलबजावणी योग्य प्रकारें कशी करावी ह्यासंबंधीं गॉव्हॅर्नादोरास **सल्ला देणें** आणि म्युनिसिपालिट्या, ग्राममंडळें, धार्मिक, शैक्षणिक व दीनसहाय्यक संस्था ह्यांनीं केलेले ठराव, सूचना किंवा त्यांचे जमाखर्च आणि जिल्ह्यांतील बांधकामें व त्यांच्यासंबंधींचे करार ह्यांच्यावर **निर्णायक मत देणें** हीं कोंसेल्यु दॅ दिश्त्रीक्तुचीं मुख्य कामें होत. कोंसेल्यु दॅ दिश्त्रीक्तु व गॉव्हॅर्नादोर

त्यांच्यामध्य एकाद्या बाबतींत मतभेद झाला तर ती बाब गॉव्हर्नादोर जनलकडे सुपविली जाते व तो सरकार–सल्लागार मंडळाच्या खास विभागाचा सल्ला घेऊन तिचा अंतिम निर्णय लावीत असतो.

---

## धडा ४४ वा

# म्युनिसिपालिट्या

खास तालुक्यांतील लोकांच्या सुखसोईची व्यवस्था करण्यासाठीं पोर्तुगीज हिंदुस्थानांतील प्रत्येक तालुक्यांत **म्युनिसिपालिटी** नांवाची एकेक संस्था आहे. पोर्तुगीज भाषेंत हिला '**काम्र मुनिसिपाल**' असें म्हणतात. आपापल्या तालुक्यांतील रस्ते, पूल, मंडप इत्यादि बांधणें व दुरुस्त ठेवणें; पाणी, प्रकाश, द्रव्य, मांस, भाजीपाला इत्यादींचा पुरवठा करणें; शाळा, वाचनालयें, पदार्थसंग्रहालयें वगैरे उघडणें किंवा त्यांना मदत करणें; बागबगीचे तयार करणें; गुरचरणें राखून ठेवणें; स्मशानें, संडास, मुत्र्या इत्यादींची सोय करणें; लोकांच्या आरोग्याच्या सोई पाहाणें वगैरे वगैरे कामें ह्या संस्थेकडे सोंपवलेलीं असतात.

ह्या कामांकरितां खर्च करावयास पैसा पाहिजे म्हणून तिला, लोक सरकारास जो सारा देतात त्याच्यावर शेंकडा ५० टक्क्यांपर्यंत जादा कर आकारणें, आपल्या अधिकारसीमेंत येणाऱ्याजाणाऱ्या मालावर आयातनिर्यात जकात बसवणें, करमणुकीचीं साधनें, दुकानें, गुत्ते, छापखाने वगैरेंवर कर बसवणें, वेठबिगारी व वाहतुकीच्या साधनांवर कर घेणें इत्यादि अधिकार दिले आहेत.

मुरगांव तालुक्यांत म्युनिसिपालिटी अस्तित्वांत नाहीं. तेथें शहरसुधारणा मंडळाची स्थापना झाल्यानंतर तेथील म्युनिसिपालिटी रद्द करून तिचीं कामें मंडळाकडे सोंपवण्यांत आलीं आहेत.

म्युनिसिपलिटीची रचना निरनिराळ्या तालुक्यांत निरनिराळी आहे. तिसवाडी, बार्देश व साष्टी ह्या तालुक्यांतील म्युनिसिपालिट्यांत नऊ-नऊ सभासद असून बाकी सर्व म्युनिसिपालिट्यांत प्रत्येकी तीन सभासद आहेत. ह्या सर्व सभासदांना बदली सभासद असतात. सत्तरी व नगरहवेली ह्या दोन तालुक्यांतील म्युनिसिपालिट्या वगळून बाकी सर्वांतील सगळे सभासद लोकांनी निवडून दिलेले असतात. आणि त्यांत एक अध्यक्ष व एक उपाध्यक्ष असतो. सत्तरी म्युनिसिपालिटींत त्या महालाचा कॉमान्दान्ति मिलितार हा अधिकारतः अध्यक्ष असतो व बाकी दोन सभासद लोकांनीं निवडून दिलेले असतात. नगरहवेली म्युनिसिपालिटींत तथील मामलेदार हा अधिकारतः अध्यक्ष असतो, व बाकीचे दोघे सभासद सरकारनें नेमलेले असतात.

ज्या म्युनिसिपालिटीचे सर्व किंवा कांही सभासद सरकारनें नेमलेले असतात, तिला पोर्तुगिजींत **'कोमिसांव मुनिसिपाल'** असें नांव आहे. म्हणून सत्तरी किंवा नगरहवेली येथील म्युनिसिपालिटीला 'कोमिसाव मुनिसिपाल' असें संबोधण्यांत येतें.

ह्या सर्व म्युनिसिपालिट्यांतील सभासदांच्या निवडणुका किंवा नेमणुका दोनदोन वर्षांनीं आणि अध्यक्षोपाध्यक्षांच्या निवडणुका किंवा नेमणुका प्रतिवर्षीं करण्यांत येत असतात.

म्युनिसिपालिटीचे सभासद निवडण्याचा मताधिकार फक्त पोर्तुगीज लिहिण्यावाचण्यास येणाऱ्या सज्ञान पोर्तुगीज नागरिकांसच देण्यांत आलेला आहे. म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षोपाध्यक्षांची निवड, निवडून आलेले सभासद करीत असतात. म्युनिसिपालिटीच्या सभासदांस वेतन नसतें.

म्युनिसिपालिटीची बैठक दर आठवड्यास एकदां भरत असते. ह्या बैठकांस तालुक्याचा मामलेदार हजर राहात असतो. पण त्याला त्यांत मताधिकार किंवा वाचाधिकारही नसतो.

म्युनिसिपालिटीच्या उत्पन्नापैकीं वाहतुकीच्या साधनांवरील कर व वेठबिगारी ह्यांच्यापासून येणारें उत्पन्न खास वाहतुकीच्या साधनांची वाढ व दुरुस्ती करण्याच्या कामींच खर्च करावें लागतें व म्हणून त्याला खास उत्पन्न असें संबोधून त्याचा जमाखर्चही स्वतंत्र राखला जातो. बाकी सर्व कामाचा खर्च इतर उत्पन्नांतून भागवला जातो व म्हणून त्याला **सर्वसामान्य उत्पन्न** अशी संज्ञा देण्यांत येते.

पोर्तुगीज हिंदुस्थानांतील म्युनिसिपालिट्यांच्या वार्षिक उत्पन्नाची कल्पना यावी ह्यासाठीं सन १९२८ सालचे आंकडे खालीं देण्यांत येत आहेत:—

| म्युनिसिपालिटी | स.सा.उत्पन्न | खास उत्पन्न |
|---|---|---|
| तिसवाडी | ८०९०७ | २२३८३ |
| बारदेश | ६०४५१ | १४३९७ |
| सासष्टी | ३४०५७ | ४०३९९ |
| पेडणें | ८१९४ | ८३६६ |
| सांखळी | ९१०२ | ४०८० |
| सत्तरी | ३७८५ | १८४७ |
| फोंडें | १०९२५ | ७०५६ |
| सांगें | १८७७२ | ३८०० |
| केपें | ६७२९ | ३८३० |
| काणकोण | ४८९६ | ३०६४ |
| दमण | १२८७५ | ३२२१ |
| नगरहवेली | २६३०७ | १३६४२ |
| दीव | ५२१९ | १४४० |

म्युनिसिपालिट्यांस कर्ज काढावयाचें असतां आणि सरकारसाऱ्यावर किंवा जकातीवर जादा कर बसवावयाचा असतां स. स. मंडळाच्या खास विभागाची मंजुरी घ्यावी लागते.

## धडा ४५ वा

# ग्राममंडळें

तालुक्याच्या बाबतीत म्युनिसिपालिटीनें जीं कामें करावयाचीं असतात तींच कामें सामान्यतः गांवापुरतीं करण्याकरतां एकाद्या गांवांत किंवा दोन अगर अधिक गांवांच्या गटांत **ग्राममंडळ** नांवाची संस्था असूं शकते. ह्या संस्थेस पोर्तुगीज भाषेंत '**ज्यूंत लॉकाल**' अशी संज्ञा असते. ज्यूंत लॉकाल अशाच गांवांत अस्तित्वांत आणतां येतें कीं ज्यांत कमींत कमी २० मताधिकारी म्हणजे पोर्तुगीज लिहितांवाचतां येणारे सज्ञान पोर्तुगीज नागरिक असून म्युनिसिपालिटीची कचेरी नाहीं.

ज्यूंत लॉकालाचे सभासद तीन असतात व ते तिघेही लोकांनींच निवडून द्यावयाचे असतात. मतदारांची संख्या विसांपेक्षां अधिक पण तिसांहून कमी असणाऱ्या गांवांत पोर्तुगीज प्राथमिक शाळा असली तर तिच्या शिक्षकास ज्यूंत लॉकालाचा अध्यक्ष निवडतां येतें. ज्यूंत लॉकालाच्या सभासदांसही बदली सभासद असतात.

ज्यूंत लॉकालांस आपल्या स्थळसीमेंत राहाणाऱ्या नागरिकांवर वेठबिगारीचा कर तेवढा बसवितां येतो. म्युनिसिपालिट्यांप्रमाणें इतर जातींचे कर बसविण्याचा अधिकार त्यांना नाहीं.

सन १९२८ सालीं पोर्तुगीज हिंदुस्थानांत अस्तित्वांत आलेल्या ज्यूंत लॉकालांचे तालुकावार आंकडे पुढीलप्रमाणें:–तिसवाडी १६, बारदेश २५, सासष्टी १९, मुरगांव ३, पेडणें ६, फोंडें ९, सांगें २, केंपें ३ व काणकोण १.

सांखळी, सत्तरी, दमण, नगरहवेली व दीव येथें एकही ज्यूंत लॉकाल अस्तित्वांत आलेलें नाहीं.

म्युनिसिपालिट्यांप्रमाणें ज्यूंत लॉकालांच्या सभासदांसही वेतन नसतें.

घडा ४६ वा

# त्रिबुनाल आदमिनिश्त्रातीव्हु, फिश्काल इ दश् कॉन्तश्

पोर्तुगीज हिंदुस्थानाच्या राजधानींत वरील नांवाचें न्यायालयाच्या स्वरूपाचें एक मंडळ असतें. त्यांत नवीन गोव्याच्या रॅलासांवाचे पांचही न्यायाधीश, गॉव्हेर्नादोर जरालनें अंतर्गत व्यवस्था खात्यांच्या मुख्याधिकाऱ्यांपैकीं प्रतिवर्षी नेमलेला एक मुख्याधिकारी आणि सरकार-सल्लागार मंडळाच्या सभासदांनीं दर दोन वर्षांनीं आपल्यांतून निवडलेला एक प्रतिनिधि असे ७ कायम सभासद असतात. जकात खातें किंवा जमाबंदी खातें ह्यांच्या मुख्याधिकाऱ्यांपैकीं कोणीतरी एक मुख्याधिकारीही ह्या मंडळांत सभासद म्हणून बसतो. रॅलासांवाचा अध्यक्ष हाच ह्या मंडळाचा अध्यक्ष असतो व त्याच्यासह सर्व सभासदांस ठराविक मासिक भत्ता त्यांत येत असतो.

गॉव्हेर्नादोर जराल खेरीज करून मुलकी व्यवस्था खात्यांतील इतर कोणत्याही अधिकाऱ्यांचे निकाल किंवा हुकूम; कोंसेल्यु दॅ दिश्त्रीक्तु, म्युनिसिपालिटी व इयूंत लॉकाल ह्यांच्यासाठीं झालेल्या निवडणुका; धार्मिक, शैक्षणिक व दीनसहाय्यक संस्थांचीं कृत्यें; सरकारी कचेऱ्या व पावणीदार ह्यांच्यामधील करार; जकात खात्याच्या व जमाबंदी खात्याच्या कचेऱ्यांचीं कृत्यें वगैरेंसंबंधीं लोकांकडून अगर सरकारी अधिकाऱ्यांकडून केल्या जाणाऱ्या तक्रारींचा निकाल लावणें आणि गॉव्हेर्नादोर जरालनें काढलेल्या फर्मानांत खर्चाच्या बाबींचा अंतर्भाव असता खर्चाची रक्कम कायदेशीर आहे की नाही त्यावर मत देणें ही ह्या मंडळाचीं मुख्य कामें होत.

मंडळानें निकाल द्यावयाची बाब जेव्हां जकात खात्याशीं संबंध येणारी असते तेव्हां ह्या खात्याचा मुख्याधिकारी आणि जेव्हां जमाबंदी खात्याशीं संबंध येणारी असते तेव्हां त्याचा मुख्याधिकारी ह्या मंडळांत सभासद म्हणून भाग घेतो. प्रोकुरादोर दा रॅपूब्लिक हाच ह्या मंडळापुढेंही सरकारी हितसंबंधांस जपणारा असतो.

गॉव्हॅर्नादोर जराल किंवा प्रस्तुत मंडळ ह्यांच्या निकालावर तक्रार करावयाची असतां ती पोर्तुगालांतील 'वसाहतींच्या वरिष्ठ मंडळा 'कडे करावी लागते.

---

धडा ४७ वा

# सरकारचें उत्पन्न व खर्च

सरकारच्या उत्पन्नाच्या बाबी तीन असतातः-**कर**, **फी** व **खासगी उत्पन्न**.

**कर** दोन प्रकारचे असतातः-**प्रत्यक्ष** आणि **अप्रत्यक्ष**. ज्या करामध्यें कर देणारी व कर सोसणारी व्यक्ति एकच असते त्यास **प्रत्यक्ष कर** आणि ज्या करामध्यें कर देणारी व तो सोसणारी ह्या व्यक्ति निरनिराळ्या असतात त्यास **अप्रत्यक्ष कर** असें म्हणतात. उदाहरणार्थ, शेतसारा हा प्रत्यक्ष कर होय; कारण त्यांत कर भरणारा जो शेताचा मालक त्यालाच कर सोसावा लागत असतो. आयात-निर्यात कर हे अप्रत्यक्ष कर होत. कारण त्यांत कर भरणाऱ्या व्यक्ति बहुधा व्यापारी असतात व कर सोसणाऱ्या व्यक्ति गिऱ्हाईकें असतात.

उत्पन्नाची दुसरी बाब म्हणजे फीची. विद्यार्थी शिक्षणसंपादनार्थ, पक्षकार न्याय मिळण्याकरितां किंवा जमीन खरेदी करणारा खरेदीपत्र नोंदून घेण्याकरितां जो मोबदला देत असतो त्याला **फी** असें म्हणतात.

सरकारास स्वतःची शेतवाडी असली किंवा तें एकादा धंदा करीत असलें तर त्यापासून जो फायदा उरतो त्यास **खासगी उत्पन्न** असें म्हणतात.

राज्यकारभार चालविण्याकरितां सरकारास ठेवावीं लागणारीं खातीं आणि देशाच्या भरभराटीसाठीं योजावे लागणारे उपाय ह्या सरकारच्या **खर्चाच्या बाबी** होत.

सरकारास पुढील सालीं किती उत्पन्न येईल व किती खर्च करावा लागेल ह्याचा तपशीलवार अंदाज जमाबंदी खात्याचा प्रधान पांचसहा महिने अगोदर तयार करीत असतो. मागील तीन किंवा पांच वर्षांचें उत्पन्न व खर्च ह्यांची सरासरी काढून हा अंदाज करीत असतात. ह्या तपशीलवार अंदाजी आंखणीस **जमाखर्चाचें अंदाजपत्रक** असें म्हणतात.

पोर्तुगीज हिंदुस्थानांत हें अंदाजपत्रक गॉव्हेर्नादोर जरालच्या सल्ल्यानें जमाबंदी खात्याचा मुख्याधिकारी तयार करतो व तें दर वर्षाच्या जानेवारीच्या सुरुवातीच्या बैठकांत सरकार–सल्लागार मंडळानें पास केल्यावर वसाहतमंत्र्याच्या मंजुरीसाठीं पोर्तुगालास पाठविण्यांत येतें. आणि तेथून मंजूर होऊन येतें त्याप्रमाणें जुलै महिन्यांत अंमलबजावणींत घातलें जातें.

पोर्तुगीज हिंदुस्थान सरकारचा जमाखर्च काय आहे त्याची कल्पना यावी ह्यासाठीं सन १९२९–३० ह्या आर्थिक वर्षाकरतां जें अंदाजपत्रक सरकार–सल्लागार मंडळानें पास केलें होतें त्यांतील आंकडे खालीं दिले आहेतः—

| उत्पन्नाची बाब | रुपये | खर्चाची बाब | रुपये |
|---|---|---|---|
| **प्रत्यक्ष कर** | | दिवाणी राज्यकारभार, | |
| व्याजावरील कर | ११३००० | सरकारी छापखाना | |
| जमिनीवरील कर | ५५७००० | व वाचनालय | २९०९१३ |
| गोव्याबाहेर जाणाऱ्यांकडून | | प्राथमिक शिक्षण | १६३७१० |
| माणसी १० आणेप्रमाणें | | दुय्यम शिक्षण | १४८०५८ |

| उत्पन्नाची बाब | रुपये |
|---|---|
| घेण्यांत येणारा कर | ४१००० |
| नारळीची सूर काढण्यास परवाने | ५६०००० |
| दमण व दीव येथें ताडी काढण्यास दिलेले परवाने | ४९००० |
| तंबाकू विकण्यास परवाने | ११००० |
| इतर प्रत्यक्ष कर | १७७९०० |
| स्टँप व नोंदणी | ७०१५०० |
| **अप्रत्यक्ष कर** | |
| अबकारी | ४४९५४२ |
| आयात जकात | १७००००० |
| निर्यात जकात | ६०००० |
| जकातनाक्यांचें इतर उत्पन्न | ९००० |
| नार्व्हृगासांव फ्लुव्हियाल | ३०००० |
| टपाल खातें | १३४००० |
| तार-टेलिफोन | ४३५०० |
| सरकारी शेतवाडी | ११८००० |
| जंगली लांकडाची विक्री | १००००० |
| इतर किरकोळ | २४९३०० |
| माकाव व तिमोर या वसाहती देत असलेला व इतर मोबदला | १६०८७४ |
| मागील वर्षाची शिलक | ३३२१३० |
| एकंदर उत्पन्न | ५५९६७४६ |

| खर्चाची बाब | रुपये |
|---|---|
| उच्च शिक्षण | १७०६४ |
| खास शिक्षण | २२६२८ |
| शिक्षणसल्लागार मंडळ | २७१ |
| सार्वजनिक आरोग्य | २७१६१५ |
| जमाबंदी व हिशेब | २२२१५३ |
| जकातवसुली-व्यवस्था | १५२०९५ |
| न्याय-व्यवस्था | ३०६१४१ |
| बांधकाम व रेल्वे | ४३१६५२ |
| तार व टपाल | २१०५७८ |
| शेतकी व जंगल | १७१८७२ |
| जमीन-मोजणी | ६००१० |
| खडें लष्कर | ९१४९०९ |
| लष्करी नोकरांची पेन्शनें | ३९६३७२ |
| दर्यावर्दी लष्कर | ९९२०२ |
| पोर्तुगाल सरकारास द्यावयाचे | २४६४४९ |
| मुलकी नोकरांची पेन्शनें | ४३१२७५ |
| धर्म खातें | ६०३५० |
| कर्जव्याजाची फेड | २०५२०४ |
| इतर निरनिराळ्या बाबी | १८६९०० |
| देशसुधारणेचीं कामें | ५८७३२५ |
| एकंदर खर्च | ५५९६७४६ |

वर दिलेल्या उत्पन्नाच्या आंकड्यांत खास फंडांसाठी म्हणून काढून ठेवण्यांत येणाऱ्या ६६९६२६ रुपये उत्पन्नाचा आंकडाही जमा करतां येण्यासारखा आहे. पण खास उत्पन्नाप्रमाणें खास खर्चांसाठींच त्याचा विनियोग व्हावयाचा असल्यानें तो जमेस धरलेला नाहीं. तथापि तो धरून बोलावयाचें झालें तर पो. हिं. सरकारचा सन १९२९-३० सालच्या अंदाजी जमाखर्चांचा वट आंकडा ६२६६३७२ रु. होता असें म्हणतां येईल.

सरकारनें **काढलेल्या कर्जांचा आंकडा** १९२६ सालीं जो ४०१५५०४ वर होता तो ता. ३० जून १९२८ रोजीं ३८२०५८७ वर आला. अर्थात् मधल्या दोन वर्षांत ११९४९१७ रुपयांचें कर्ज फेडण्यांत आलें. हें कर्ज मुख्यतः बांकु नासियॉनाल उल्त्रामारीनु, मिझेरिकॉर्दिय व कायश इकॉनॉमिक पॉश्ताल ह्यांच्याकडून घेण्यांत आलें होतें. परंतु **सरकारास यावयाच्या असलेल्या कर्जांचा आंकडा** ह्यापेक्षां मोठा होता.ता. ३० जून १९२८ रोजी तो १३३२८२६ रु. होता. त्यांत बांकु नासियॉनालकडून सरकारास, त्याच्या मताप्रमाणें, यावयाच्या असलेल्या २० लाखांवरील रुपयांचा आंकडा जमेस धरला तर तो ३३॥ लाखांजवळ येण्यास हरकत नव्हती. अर्थात् आवकजावक कर्जांचो वजावाकी केल्यास सरकारी तिजोरींत ५ पासून ५॥ लाख रुपयांपर्यंत शिल्लक पडूं शकली असती. पोर्तुगीज वसाहतींकडून पो. हिं. सरकारास पुढीलप्रमाणें रकमा येणें होत्याः-काबु व्हेर्दि ३१४८६, गिनॅ १०३१५६, सां तॉमॅ इ प्रींसिपि १५०६०, आंगॉल ४६७२३६ व तिमोर ८१८५१२ मिळून एकंदर १४३५४५० रुपये.

माकाव सरकारला पोर्तुगीज हिंदुस्थान सरकारनें ३६६०९ रुपये कर्ज होतें. पण त्या सरकारनें नवीन गोव्याच्या रॅलासांवाऱ्या खर्चासाठीं जी वार्षिक रक्कम द्यावी लागते ती वजा करीत राहून तें फेडण्याची तजवीज करण्यांत आली होती.

धडा ४८ वा

# सरकारी बड्या कामदारांचे पगार

मागील धड्यांत सांगितलेल्या खर्चांत अधिक खर्च अर्थातच सरकारी नोकरांच्या पगाराचा आणि त्यांतल्या त्यांत बड्या अधिकाऱ्यांच्या पगाराचा असतो. *हा पगार सामान्यतः दोन जातींचा असतो:—एक* **हुद्द्याचा** किंवा जागेच्या लायकीचा आणि दुसरा **कार्यवाहकत्वाचा.** ह्या दोन्ही जातींच्या पगाराशिवाय गॉव्हेर्नादोर जराल व दमणदीवचे गॉव्हेर्नादोर ह्यांना बरदास्त, प्रवास, सामानदुरुस्ती, मोटार, दिवाबत्ती वगैरेंसाठीं तनखा देण्यांत येत असतो. तसेंच निरनिराळ्या खात्यांचे मुख्याधिकारी व इतर कांहीं कामदार ह्यांच्यापैकीं कोणाला अधिकारतःच जादा भत्ता, तर कोणाला अधिकारतःच घरभाडें आणि कोणाला जादा कामाबद्दल जादा वेतन तर कोणाला ठराविक शेंकडेवारी देण्यांत येत असते.

खर्चाच्या ह्या बाबीची कल्पना यावी म्हणून कांहीं बड्या कामदारांना, ह्या ना त्या नांवाखालीं, **प्रतिवर्षी** जितका पैसा मिळतोच मिळतो त्याचे आंकडे खालीं दिले आहेत:—

| अधिकाराचें नांव | | | पगार रुपये |
|---|---|---|---|
| गॉव्हेर्नादोर जराल | | | ३९५७१ |
| दमणचा गॉव्हेर्नादोर | | | १०६४२ |
| दीवचा | ,, | | १०६४२ |
| मुलकी व्यवस्था खात्याचा मुख्याधिकारी | | | १०००० |
| आरोग्य | ,, | ,, | १०१७५ |
| जमाबंदी | ,, | ,, | ९२८५ |
| जकात | ,, | ,, | ७८५७ |
| बांधकाम | ,, | ,, | १४००० |

| अधिकाराचें नांव | पगार रुपये |
|---|---|
| शेतकी-जंगल खात्याचा मुख्याधिकारी | ८५७१ |
| तार-टपाल ,, ,, | ५५९५ |
| जमीनमोजणी व खनिज खात्याचा मुख्याधिकारी | ६५४७ |
| मुरगांव बंदर व रेल्वे ,, ,, | १२५७१ |
| बहिर्गत व्यवस्था ,, ,, | ६८५७ |
| लष्कर खात्याचा मुख्याधिकारी | १३८९१ |
| नाविक ,, ,, | १५४६७ |
| न्याय ,, ,, | १४३८१ |

---

धडा ४९ वा

# पुरवणी खानेसुमारी

प्रस्तुत पुस्तकांतील खानेसुमारीसंबंधींचे आणि भाषा व साक्षरतेसंबंधींचे धडे ज्या वेळीं छापावे लागले त्या वेळीं त्यांच्यासंबंधींचे कांहीं आंकडे मिळाले नव्हते व म्हणून त्या धड्यांत प्रत्येक धर्माच्या लोकांची तालुकावार संख्या आणि प्रत्येक तालुक्यांतील धर्मवार साक्षरतेचा आंकडा मिळाला नाहीं, असें म्हटलें होतें. पण नंतर खानेसुमारीसंबंधींचे कांहीं आंकडे मिळाले. त्यांतील महत्वाचे असे ह्या धड्यांत देण्यांत येत आहेत.

## तालुक्यांची धर्मवार लोकसंख्या

| तालुका | हिंदु | कॅथो. ख्रिश्चन | मुसलमान | इतर धर्म |
|---|---|---|---|---|
| तिसवाडी | १८९८४ | ३७५७१ | ६८७ | २१ |
| बारदेश | ३१३३५ | ६८३८० | २०७ | ३ |
| सासष्टी | ९६०८ | ९०७७५ | ४५६ | ३ |
| मुरगांव | ४७४० | १४५५४ | ८६३ | १०० |
| पेडणें | २९८७४ | ६२९३ | २११ | — |

| तालुका | हिंदु | कॅथो. ख्रिश्चन | मुसलमान | इतर धर्म |
|---|---|---|---|---|
| सांखळी | २७०२१ | १८९२ | ८५२ | — |
| सत्तरी | १५९१५ | ४६६ | ७७४ | १५८ |
| फोंडें | ३८८४२ | ७९०८ | ६४५ | — |
| सांगें | १४९७८ | ४३०४ | ४१४ | — |
| केंपें | १२३९६ | ८५५७ | २५६ | — |
| काणकोण | १४५३० | ४७९९ | १२२ | — |
| दमण | १२८१३ | १४८० | २९८३ | २९० |
| नगरहवेली | ३०५७२ | २७१ | १२९ | ७६ |
| दीव | १२५७९ | २२८ | ८२१ | २१६ |

## तालुकानिहाय धर्मवार साक्षरांची लोकसंख्या

| तालुका | हिंदु | कॅथो. ख्रिश्चन | मुसलमान | इतर धर्म |
|---|---|---|---|---|
| तिसवाडी | २७९६ | ६१९१ | १७९ | २० |
| बारदेश | ३९०० | १२४४४ | ३५ | ३ |
| सासष्टी | २०१७ | १०९५२ | ७३ | २ |
| मुरगांव | ११०५ | १९८२ | २८५ | ८२ |
| पेडणें | २०६३ | १५१ | १५ | — |
| सांखळी | २४३३ | २९६ | ६९ | — |
| सत्तरी | ५४८ | ७३ | ५५ | — |
| फोंडें | २८८५ | ३०६ | ८१ | — |
| सांगें | १०७१ | १८२ | ६७ | — |
| केंपें | १०६५ | ३६९ | १३ | — |
| काणकोण | १२६५ | १८० | २८ | — |
| दमण | ५७८ | ५२२ | ३८९ | १४४ |
| नगरहवेली | ४९६ | ११९ | ३३ | ३८ |
| दीव | ७९६ | १४० | १५४ | ६० |

## नगरें, उपनगरें व कसबे ह्यांची लोकसंख्या

पणजी-९३८८, म्हापसें-७८५७, मडगांव-९४७९, व्हाक्कु दागाम-४५८०, पेडणें-३७८६, सांखळी-१४१३, डिचोली-२९८७, वाळपई-१३०७, फोंडें-५७५०, सांगें-२५०२, केपें-१५८२, कुडचडें-१५८५, काणकोण-४७२५, दमण-४१९३, सिल्व्हासा-१२६५ व दीव-३८६१.

समाप्त.

40845

REFBK-0004045

REFBK-0004045